
# विवेकनिष्ठ जीवनदृष्टी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र.

गो. मा. पवार



REFBK-0015117

गो. मा. पवार

# विवेकनिष्ठ जीवनदृष्टी

समाज प्रबोधन संस्था

निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 15117
(स्थळ प्रत)

REFBK-0015117

चुकीची दुरुस्ती

सम आकड्यांच्या डोक्यावर पुस्तकाचे नाव सर्वत्र ' विवेकनिष्ठ जीवनपद्धती ' असे पडले आहे; ते ' विवेकनिष्ठ जीवनदृष्टी ' असे हवे.

किंमत दोन रुपये

मुखपृष्ठ : बाळ ठाकूर

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

प्रथमावृत्ती : डिसेंबर १९६६, © समाज प्रबोधन संस्था, १९६६

प्रकाशक : शंकरराव देव, समाज प्रबोधन संस्था, ४३०/३१ शनिवार, पुणे २.

मुद्रक : वि. नी. पटवर्धन, साधना प्रेस, ४३०/३१ शनिवार पुणे २.

# पुरस्कार

एकेका माणसाचे वर्तन आणि त्यामागील प्रेरणा घ्या, किंवा कुटुंब, राष्ट्र इत्यादी समूहांचे वर्तन व प्रेरणा घ्या. तर्क आणि कल्पना, विचार आणि श्रद्धा, स्वार्थ आणि त्याग यांची सरमिसळ आपल्याला आढळून येते. केवळ पोटाला अन्न खाऊन माणसाचे आयुष्य पुरे होत नाही. त्याला इतर अनेक गोष्टी लागतात; तीच गोष्ट त्याच्या समग्र मानसिक जीवनाविषयी आहे. मानवी मनाची ही संकीर्णता लक्षात घेऊन माणसाने विवेकाने वागल्यास त्याला स्वतःचे व इतरांचे आयुष्य सुखी करता येईल अशी आपली अपेक्षा असते. प्रेषितांनी व साधुसंतांनी व्यवहारासाठी केलेला उपदेश म्हणजे विवेकाने वागण्याचा उपदेशच आहे. आज लोकशाहीच्या व समाजवादाच्या ध्येयाने वागणे सर्वसंमत आहे. कारण या ध्येयाचा आशय विवेकपूर्ण जीवन हाच आहे.

विवेकनिष्ठा म्हणजे काय हे सांगणे सोपे नाही. कारण खरी विवेकनिष्ठा ही मानवी तर्कबुद्धीबरोबरच श्रद्धेला, कल्पनाशक्तीलाही सामावणारी असते. ही संग्राहक भूमिका घेऊन विवेकनिष्ठेचा अर्थ व आशय समजावून देण्याचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकात केलेला आहे. तो प्रयत्न यशस्वी झालेला आहे. कारण लेखकाने आपले विवेचन मानसशास्त्रीय ज्ञानाच्या आधाराने व निराग्रही पद्धतीने केलेले आहे. अगदी बाल्यावस्थेतून हळू हळू मुलाच्या मनात विवेकाची जाणीव उत्पन्न होते. साध्या खेळासारख्या सामूहिक आचारातून तिला आकार व दृढता येत जाते. वास्तवाचे ज्ञान आणि आचरण यांचा मेळ घालण्याची प्रवृत्ती मुलामध्ये येते व सदाचरणाचा अर्थ व मूल्य त्याला समजू लागतात. हे सारे लेखकाने सोप्या भाषेत वर्णन केले आहे.

माणसाची स्वातंत्र्याची इच्छा, समतेची जाणीव व भ्रातृभावाची भावना विवेकाच्या जाणीवेशी कशी संबद्ध आहे? विवेकाला विघातक अशा कोणत्या प्रेरणा व वासना मानवी मनात आहेत? विवेक आणि श्रद्धा यांचे नाते काय? विवेकाचा आणि प्रचलित धर्मपंथांचा व एकदर पारलौकिकाच्या विचाराचा संबंध कसा येतो? या प्रश्नाची थोडक्यात पण सुबोध चर्चा लेखकाने केलेली आहे.

‘ विवेकवाद ’ म्हणून ज्याला ओळखले जाते त्याचा ऐतिहासिक दृष्टीने परामर्श घेणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे युरोपात व नंतर आधुनिक भारतात विवेकवादाचा ( किंवा ‘ बुद्धिवादा ’चा ) उदय व विकास कसकसा होता गेला याची माहिती लेखकाने दिली आहे.

पूर्वी आणि आजही माणसाचे सुख हेच साऱ्या विचारांचे इप्सित आहे. ते सुख लाभण्यासाठी माणसाने समंजस, म्हणजेच विवेकपूर्ण, व्हावयास हवे. ही गोष्ट वाचकांना साध्या भाषेत व चांगल्या युक्तिवादाने पटवून देण्याचे मोलाचे कार्य लेखकाने केलेले आहे. प्रबोधनाच्या सर्वांगीण आंदोलनात या कार्याचे महत्त्व मोठे आहे. म्हणून या पुस्तकाच्या लेखनासाठी लेखकाने जे श्रम घेतले आहेत त्यांचे चीज वाचकांकडून होईल अशी मी अपेक्षा करतो; तसेच या कार्याबद्दल लेखकास मी मनःपूर्वक धन्यवाद देतो.

पुणे, १९-१-६७ दि. के. बेडेकर

# ऋणनिर्देश

विवेकवादाचा विचार मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून डॉ. एरिक फ्रॉम, आर्. ऑस्बोर्न या विचारवंतांनी केलेला आहे. प्रस्तुत पुस्तकातील विवेचन करताना त्यांची मानसशास्त्रीय भूमिका मी स्वीकारलेली आहे. या दोघा विचारवंतांच्या प्रतिपादनाचा उपयोग विशेषत्वाने या पुस्तकातील तीन प्रकरणात केलेला आहे. या पुस्तकाचे लेखन करताना ज्या ग्रंथांचा व लेखांचा आधार घेतला त्यांची यादी पुस्तकाच्या अखेरीस दिलेली आहे. या विषयाचा अधिक अभ्यास करू इच्छिणाऱ्यांना ती उपयुक्त ठरेल ही अपेक्षा आहे.

या पुस्तकाचे हस्तलिखित सर्वश्री दि. के. बेडेकर, पन्नालाल सुराणा, वसंत पळशीकर, श्रीनिवास दीक्षित, अ. के. भागवत, म. द. पाध्ये व ग. प्र. पिंपरकर यांनी वाचले व अनेक उपयुक्त सूचना केल्या, म्हणून मी या सर्वांचा ऋणी आहे. विशेषतः श्री. दि. के. बेडेकर यांनी सुरुवातीपासूनच जे बहुमोल मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचा विशेष ऋणी आहे.

या पुस्तकाच्या हस्तलिखिताचे वाचन पंढरपूर येथे प्रातिनिधिक वाचकवर्गासमोर झाले. या शिबिराचे संयोजक श्री. दत्ता सावळे व श्री. मो. शा. बडवे; आणि शिबिरातील चर्चेत भाग घेतलेल्या व्यक्ती, या सर्वांचा मी आभारी आहे.

औरंगाबाद, २-१२-१९६६ गो. मा. पवार

# काही पारिभाषिक संज्ञा

| | |
|---|---|
| Amoral | नीतिनिरपेक्ष |
| Determinism | नियतिवाद |
| Ego | अहंमात्र |
| Egocentric | आत्मकेंद्रित, अहंकेंद्रित |
| Free will | संकल्पस्वातंत्र्य |
| Id | वासनापिंड |
| Irrational doubt | विवेकशून्य शंका |
| Irrational faith | विवेकशून्य श्रद्धा |
| Moral Judgement | नैतिक निर्णय |
| Moral freedom | नैतिक स्वातंत्र्य |
| Rational | विवेकशील |
| Rational doubt | विवेकयुक्त शंका |
| Rational faith | विवेकयुक्त श्रद्धा |
| Rationality | विवेकशीलता |
| Rationalist | विवेकवादी, विवेकनिष्ठ |
| Rationalism | विवेकवाद |
| Super Ego | नियंत्रक अहंमात्र |
| Unconscious Mind | प्रज्ञादुर्लभ मनस्तर |

# अनुक्रम


१ प्रास्ताविक १

२ विवेकशीलतेचा उगम आणि विकास ११

३ विवेक आणि सत्यनिर्णय २०

४ विवेक आणि सदाचरण ४०

५ विवेक आणि काही प्रश्न ५६

६ विवेकशीलतेचे विरोधी घटक ६८

७ विवेक आणि श्रद्धा ८८

८ विवेक आणि धर्मकल्पना ९४

९ विवेकवादाचा विकास १०७

१० भारतातील विवेकवाद ११७

११ उपसंहार १३५

# १ प्रास्ताविक

ग्रंथालय ठाणे १५११७

मनुष्य जातीची आजपर्यंत जी प्रगती झाली आहे ती मनुष्याच्या ठिकाणी असणाऱ्या विवेकबुद्धीमुळे. हजारो वर्षांपूर्वी मनुष्य इतर प्राण्यांप्रमाणेच जगत होता. आजही त्या प्राणिजाती त्याच स्थितीत आहेत. मनुष्याच्या स्थितीत मात्र पराकाष्ठेचे अतर पडले आहे. निसर्गाबद्दल आणि स्वतःबद्दल बरेच ज्ञान त्याने संपादन केले. निसर्गाच्या जुलुमापासून बऱ्याच प्रमाणात तो मुक्त झाला. मानवी व्यवहारात काही बाबतीत विवेकशील झाला. भौतिकदृष्ट्या संपन्न झाला .

परंतु मनुष्यजातीची ही प्रगती आपल्याला समाधानकारक वाटते काय ? भौतिकदृष्ट्या मनुष्य समृद्ध झाला ही गोष्ट खरी; परंतु सर्वच मानवी व्यवहारात तो विवेकशील झाला आहे काय ? सर्वार्थाने सुसंस्कृत म्हणता येईल असे त्याचे आचरण नेहमी घडते काय ? राष्ट्राराष्ट्रात सहकार्याची, सहजीवनाची निकोप भावना आजही दिसत नाही. जग युद्धाच्या छायेने काळवंडून गेले आहे. भिन्नभिन्न वंशात आजही श्रेष्ठ–कनिष्ठ भाव ऊग्र रूप धारण करतो. एकाच देशात धर्म, भाषा, संस्कृती यामुळे अनेक भेद निर्माण झालेले आणि कटुता वाढलेली दिसून येते. एका समाजातच जातीमुळे, संपत्तीमुळे निर्माण झालेली विषमता बघायला मिळते आणि स्वार्थावरच लक्ष केंद्रित करून व्यक्ती सामाजिक व्यवहार करताना दिसते.

असे का होते? याचे कारण हे की, मनुष्य जसा विवेकशील आहे तसाच विकारशीलही आहे. विकार विवेकावर अनेकदा मात करतो. मनुष्य विवेकाने वागतो त्याचप्रमाणे स्वार्थी, आत्मकेंद्रित, विवेकदुष्ट प्रेरणांच्या प्रभावानेही वागत असतो. समाधानाची गोष्ट ही की, स्वार्थी, आत्मकेंद्रित, विवेकदुष्ट प्रेरणांवरती मात करण्याचे सामर्थ्यही मनुष्याच्या विवेकशीलतेत आहे. ही विवेकशीलता जितक्या प्रमाणात वाढेल तितक्या प्रमाणात मानवी जीवन अधिकाधिक सुखावह, समृद्ध आणि विकसित होईल. यासाठीच जीवनाकडे पाहण्याचा विवेकवादी दृष्टिकोन अतिशय महत्वाचा ठरतो. हा विवेकवादी दृष्टिकोण समजून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकात आपण करणार आहोत.

### विवेकबुद्धीचे स्वरूप

मानवी विकासाच्या मुळाशी असणाऱ्या विवेकबुद्धीचे स्वरूप प्रथम पाहू. माणसाची सारासार विचार करण्याची शक्ती म्हणजे विवेकबुद्धी असे आपणास स्थूल मानाने म्हणता येईल. विवेकबुद्धी दोन क्षेत्रात काम करीत असते. ज्ञानाच्या क्षेत्रात आणि आचरणाच्या क्षेत्रात. ज्ञानाच्या क्षेत्रात विवेकबुद्धीला सत्य-असत्याचा विवेक करावयाचा असतो. सत्य काय याचा निर्णय घ्यावयाचा असतो. आचरणाच्या क्षेत्रात इष्ट-अनिष्ट अथवा चांगले-वाईट याचा विवेक करावयाचा असतो. या दोनही क्षेत्रात विवेकबुद्धी कोणत्या प्रकारे कार्य करते याचा विचार विस्ताराने आपण पुढे करणार आहोत. सध्या स्थूल मानाने विवेकबुद्धीच्या कार्यपद्धतीची वैशिष्टये पाहू.

विवेकबुद्धी एखाद्या प्रश्नाचा विचार करताना त्यात समाविष्ट असणाऱ्या सगळया घटकांचा समतोलपणे विचार करते. या विचारात पूर्वग्रहाला स्थान नसते. विचार सांगोपांग व्हावा यासाठी विशिष्ट प्रश्नांशी संबंध असणाऱ्या घटना शोधणे, त्यांची छाननी करणे, त्या

सुसंगत मांडणे व त्यातून निष्कर्ष काढणे या पद्धतीचा अवलंब करावा लागतो. पुरावा व निष्कर्ष यांची संगती लावणे हे महत्वाचे कार्य असते. विवेकशुद्ध विचार हा सुसंगत असतो, साधार असतो. जितका पुरावा असतो तितक्या पुरताच निष्कर्ष काढावा लागतो. पूर्वानुभव जमेस धरून विवेकबुद्धी नवीन अनुभवांची संगती लावीत असते. विकार, वासना इत्यादींचा आत्मनिष्ठ पुरावा विवेकबुद्धी मान्य करीत नाही. विवेकबुद्धीचा विचार हा जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ असतो.

सत्याचा निर्णय करताना विवेकवादी मनुष्य ही पद्धत वापरतो. सत्य निर्णयाबाबत ही पद्धत वापरणे एका दृष्टीने सोपे आहे. मानवी व्यवहारात आचरणाची दिशा ठरविताना हाच दृष्टिकोण स्वीकारणे आवश्यक आहे. सोपे मात्र नाही.

## विवेकशील वागणे म्हणजे काय ?

विवेकवाद्याचे आचरण आत्मकेंद्रित नसते. म्हणजेच तो वागताना जसा आपला विचार करतो. तसाच इतरांचाही करतो. केवळ स्वतःच्या सुखदुःखाचा, नफानुकसानीचा विचार करून वागणे हे आत्मकेंद्रित वागणे. इतरांचे काहीही नुकसान होवो, परंतु माझा मात्र फायदा झाला पाहिजे; इतरांना दुःख झाले तरी पर्वा नाही, मला मात्र सुख मिळाले पाहिजे, ही आत्मकेंद्रित वृत्ती. आत्मकेंद्रित मनुष्य दुसऱ्याच्या भाव-भावनांचा, सुखाचा विचार करीत नाही. विवेकशील मनुष्य आचरण करताना दुसऱ्याच्या भूमिकेचाही विचार करतो. दुसऱ्याचे व्यावहारिक नुकसान होणार नाही, दुसऱ्याच्या भावना दुखावणार नाहीत, दुसऱ्यावर अन्याय होऊ नये, याबद्दल विवेकशील मनुष्य स्वतः इतकाच दक्ष असतो. म्हणजेच त्याचा स्वतःबद्दलचा विचार स्वतःपुरताच मर्यादित राहत नाही तर इतरांचा समावेश करण्याइतका व्यापक होतो. सात-आठ वर्षांपर्यंतची लहान मुले पराकाष्ठेची आत्मकेंद्रित असतात. मानसिक प्रगल्भता येणे, मनोविकास होणे

अथवा आत्मकेंद्रितता नष्ट होऊन सामाजिकतेची जाणीव होणे म्हणजेच विवेकशीलता येणे. विवेकशीलता हा प्रगल्भ मनाचा धर्म आहे. आचरणाच्या क्षेत्रातील विवेकशीलता ती हीच.

विवेकाने वागणे ही मात्र सोपी गोष्ट नाही. माणसाच्या मनाची घडण विलक्षण गुंतागुंतीची आहे. मनुष्य जे आचरण करतो त्याच्या पाठीमागे अनेकविध प्रेरणा असतात. विवेकबुद्धीची प्रेरणा नसते असे नाही. परंतु अनेक वेळा इतर प्रेरणा प्रभावी ठरताना दिसतात. उपभोगाची लालसा, आत्मप्रौढीची हौस, कीर्तीची इच्छा, रूढी, अंधश्रद्धा, इत्यादि अनेक कारणे माणसाच्या कृतीला प्रेरणा देत असतात. उपभोगाची लालसा ही अखेर हानिकारक आहे, आत्मप्रौढी केल्याने प्रतिष्ठा वाढण्याच्या ऐवजी कमी होणार आहे, कीर्तीच्या इच्छेने एखादी गोष्ट केली तर दुष्कीर्ती होण्याचाच संभव आहे, इत्यादि गोष्टी माणसाच्या लक्षात येत नाहीत; किंवा, येऊनही योग्य वर्तन करणे त्याला जमत नाही. माणसाच्या या वर्तनात विवेकाला स्थान मिळत नाही. किंवा इतर घटक हे विवेकबुद्धीपेक्षा प्रबळ ठरतात. विवेकशीलाचे वागणे वेगळे असते. तो आचरण करताना आपला तात्कालिक स्वार्थ पाहात नाही. केवळ मला वाटते म्हणून मी असे वागणार ही प्रबल आत्मनिष्ठा त्याच्या ठायी नसते. वासनेच्या आहारी जाऊन तो वर्तन करीत नाही, किंवा इतर शंभर वागतात म्हणून आपणही असे वागूया, अशी अंध अनुकरणशीलता त्याच्या ठिकाणी नसते. अथवा आपले पूर्वज असेच वागत आले, आपल्या धर्मग्रंथात असेच सांगितले आहे म्हणून असे वर्तन करू अशी गतानुगतिकताही नसते. त्याच्या विचारात आणि कृतीत इतर घटकांपेक्षा विवेकबुद्धी हा एक घटक प्रभावी असतो. इतर घटकांचे तो नियंत्रण करतो. विचाराला आणि कृतीला विवेकाची बैठक प्राप्त करून देतो.

विवेकवाद हा जीवनाकडे बघण्याचा एक दृष्टिकोण असल्यामुळे

या विचाराला मूल्याचा दर्जा प्राप्त होतो. तसेच या दृष्टिकोणाने काही मूल्ये गृहीत धरलेली आहेत, असेही म्हणावे लागते. मानवी जीवनाची सर्वांगीण उन्नती करणे, ते जास्तीत जास्त संपन्न करणे हे या दृष्टिकोनाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल तर व्यक्तिविकास साधणे क्रमप्राप्त आहे. व्यक्तीची मानसिक प्रगल्भता वाढणे म्हणजे व्यक्तिविकास होणे. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तित्वाला स्वतंत्र मूल्य आहे. व्यक्ती म्हणजे केवळ एका मानवसमूहाचा एक सभासद नव्हे. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तित्वाची, बुद्धीची दखल विवेकवाद घेतो.

व्यक्तीची मानसिक प्रगल्भता या शब्दप्रयोगाने व्यक्तीचा समाजाशी असलेला संबंध सूचित होतो. कारण समाजात असल्याशिवाय मानव प्राण्याची मानवी व्यक्ती मुळी बनतच नाही. समाजात राहून परस्परांशी व्यवहार केल्यानेच व्यक्तीच्या मनाचा विकास होतो, मनाला प्रगल्भता प्राप्त होते. व्यक्ती ही समाजनिरपेक्ष असूच शकत नाही. तिच्या मनाची प्रगल्भता जी कळून येते ती समाजातील इतरांशी होणाऱ्या वर्तणुकीवरून. व्यक्तीचा विकास साधणे म्हणजे पर्यायाने सामाजिक जीवन विकसित करणे होय.

**वैज्ञानिक विचारपद्धती आणि विवेकवाद**

वैज्ञानिक विचारपद्धती ही ज्ञानपद्धती आहे. सत्यसंशोधन, सत्यनिर्णय हे तिचे उद्दिष्ट असते. (या पद्धतीचा विचार विस्ताराने तिसऱ्या प्रकरणात केलेला आहे.) ही ज्ञानपद्धती असल्याने मूल्यनिरपेक्ष आहे. या पद्धतीने सत्य काय? यासंबंधीचा निर्णय मिळतो. चांगले काय? वाईट काय? या संबंधीचा निर्णय देणे हे वैज्ञानिक विचारपद्धतीचे काम नव्हे.

विवेकवाद हा मानवी जीवनाकडे बघण्याचा मूल्याधिष्ठित दृष्टिकोण आहे असे म्हटल्यावर वैज्ञानिक विचारपद्धतीहून त्याचे वेगळेपण ध्यानात येते. विवेकवादी मनुष्य वैज्ञानिक विचारपद्धतीचा अवलंब करतो, मात्र

त्याचा विचार मानवी जीवनाबद्दलचा असतो. विवेकवादाच्या विचार-सरणीला मानवी मूल्याचा आधार असतो. म्हणून वैज्ञानिक सत्याबद्दल आपण शास्त्रीय ( सायंटिफिक ), तर्कशुद्ध ( लॉजिकल ) ही विशेषणे वापरू; त्यांना आपण विवेकशील ( रॅशनल ) हे विशेषण लावणार नाही. विवेकशीलता, विवेकवाद हे शब्द आपण मानवी जीवनाच्या संदर्भातच वापरतो.

गेल्या तीनशे वर्षांत मानवी जीवनात फार मोठा फरक पडत चालला आहे. ऐहिक जीवन समृद्ध होत चालले आहे. सामाजिक संस्थांमधील सदोषता कमी होत आहे. मानवी जीवनाच्या या प्रगतीचे एक कारण विज्ञानयुगाचा उदय झाला हे आहे, व दुसरे कारण पूर्वीच्या मानाने बऱ्याच प्रमाणात आजच्या मानवाने विवेकवादी दृष्टिकोण स्वीकारलेला आहे हे आहे.

यथार्थ ज्ञान ही कोणत्याही प्रकारच्या प्रगतीला अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे. पूर्वीच्या काळी ज्ञान प्राप्तीसाठी योग्य पद्धतीचा मानवाने अवलंब केला नाही. सृष्टीच्या घडामोडीचे यथार्थ ज्ञान झालेले नव्हते म्हणून भोळसर समजुतींचा सुकाळ झालेला होता. शास्त्रीय विचारपद्धतीचा अवलंब मोठ्या प्रमाणात सुरू झाल्यावर सृष्टीची रहस्ये उलगडायला लागली, आणि अज्ञाताबद्दलची भीती कमी झाली. मानवाचा स्वतःच्या सामर्थ्यावरचा विश्वास वाढीस लागला. मानवी जीवन हे कोणा एका परमेश्वरी सत्तेने नियंत्रित आहे ही समजूत खोटी पडली आणि मनुष्य आपले भवितव्य स्वतःच घडविण्यासाठी सिद्ध झाला.

पोथ्या-पुराणात सृष्टीच्या निर्मितीचे, नैसर्गिक घडामोडींचे जे वर्णन आहे हे चूक आहे हे माणसाला कळून आले. सृष्टी ब्रह्मदेवाने खपून तयार केली, राहू-केतू चंद्र-सूर्याला मिळतात, धूमकेतू अरिष्टाची पूर्वसूचना देतो, इत्यादी समजुती खोट्या ठरल्या. शास्त्राने याबाबत यथार्थ ज्ञान दिले

## चातुर्य आणि विवेकशीलता

तर्कशुद्ध आणि विवेकशील या दोहोत जसा आपल्याला फरक करावा लागतो, त्याप्रमाणेच चातुर्य आणि विवेकशीलता यामध्येही करावा लागतो. प्रत्येक बुद्धिमत्तानिदर्शक गोष्ट ही विवेकशील असेलच असे म्हणता येणार नाही. उदाहरणार्थ, काही हुषार चोरांनी दरोडा घालावयाचे ठरविले आणि अतिशय चातुर्याने तो पार पाडला. इथे चोरांनी तर्काचा अवलंब केलेला असतो. कोणती वेळ योग्य, कॅशियरला कसे फसवायचे, कोणते अडथळे येण्याची शक्यता आहे, वाहनाची व्यवस्था काय करावयाची इत्यादी गोष्टींचा विचार करून त्यांनी यशस्वीपणाने दरोडा घातलेला असतो. अशा प्रकारे दरोडा घालण्यात चातुर्य आहे, विवेक नाही. चातुर्य म्हणजे आपल्याला हवी ती गोष्ट साध्य करून घेण्यासाठी अनुकूल, फलदायी साधनांचा अवलंब करणे. चातुर्ययुक्त वागण्यात ती गोष्ट चांगली का वाईट, याचा विचार केलेला नसतो. विवेकबुद्धी मात्र चांगल्या–वाईटाचा विचार करून चांगल्याचा स्वीकार करते. विवेकबुद्धीचा रोख सदैव मानवाच्या प्रगतीकडे, परिपूर्णतेकडे असतो.

## बुद्धिवाद आणि विवेकवाद

प्रस्तुत विवेचनात इंग्रजीतील रॅशनॅलिझम या शब्दांसाठी मराठीतील ‘ बुद्धिवाद ’ या रूढ शब्दाऐवजी ‘ विवेकवाद ’ या पर्यायी शब्दाचा उपयोग केलेला आहे. ‘ बुद्धिवाद ’ शब्दातील बुद्धी या शब्दाने बुद्धीचे श्रेष्ठत्व, वर्चस्व सूचित होते. आणि ही बुद्धी म्हणजे बुद्धिमत्ता [इंटेलिजन्स], तर्कनिष्ठुरता असाही काहीसा अर्थ सूचित होतो. रॅशनॅलिझमच्या विचारात या बुद्धीचेच महत्त्व आहे अशी कल्पना होते.

वरील अर्थ येऊ नये यासाठी प्रस्तुत विवेचनात ‘ विवेकवाद ’ या शब्दाची योजना केली आहे. विवेकबुद्धी, बुद्धीने दिलेला निर्णय योग्य आहे किंवा नाही याचाही विवेक करते. मानवी जीवनातील सर्व अंगांचा–बुद्धीचा,

भावनेचा, मूल्यांचा, श्रद्धेचा–विवेक विवेकबुद्धी करते. बुद्धीचे एकांतिक महत्त्व अथवा वर्चस्व या विचारात अभिप्रेत नाही. म्हणून ' बुद्धिवाद ' या शब्दाऐवजी ' विवेकवाद ' या शब्दाचा उपयोग इथे केलेला आहे.

**विवेकवादच का ?**

विवेकवादात प्रत्येक व्यक्तीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला व त्यातल्यात्यात तिच्या विवेकबुद्धीला महत्त्व आहे. जीवनातील विविध प्रश्नांचा विचार करताना प्रत्येकाने स्वतःच्या विवेकबुद्धीच्या साहाय्याने निर्णय घ्यावा असे ही विचारप्रणाली सांगते. मग हा प्रश्न सत्य–असत्य, न्याय–अन्याय, नीति–अनीती, कर्तव्य–अकर्तव्य या कोणत्याही क्षेत्रातील असो. अगदी अलीकडच्या काळापर्यंत माणसे स्वतःच्या विवेकबुद्धीचा आणि पर्यायाने स्वतःचा फार मोठ्या प्रमाणात अवमान करीत होती. ज्ञानाच्या क्षेत्रातला प्रश्न असो की, आचरणाच्या क्षेत्रातला असो, माणसे धर्मग्रंथावर अथवा रूढीवर अवलंबून असत. बुद्धीच्या या परावलंबित्वामुळे माणूस सत्य ज्ञानाला आणि चांगल्या वर्तनाला पारखा झाला होता. आपल्या समाजाचाच विचार करायचा झाला तर या परावलंबित्वामुळे साध्यासुध्या निसर्गनियमांचे आपल्याला खरेखुरे ज्ञान प्राप्त झाले नव्हते. अतिवृष्टी होवो की अवर्षण होवो, रोगराई येवो की पूर येवो, ईश्वरी प्रकोप हे कारण समजण्यात येई. सती जाणे, बालविवाह, पुनर्विवाहावर निर्बंध, इत्यादी दुष्ट रूढी आपल्या समाजात मान्यता पावल्या होत्या. या गोष्टींच्या सत्यासत्यतेवाबत, चांगलेवाईटपणाबद्दल शंका उपस्थित करण्यापुरताही बुद्धीचा स्वतंत्रपणा दाखविला जात नसे. गेल्या पन्नास एक वर्षांत ही स्थिती काही प्रमाणात बदलली आहे. अनेक सामाजिक प्रश्नांकडे बघण्याचा दृष्टीकोण काहीसा विवेकशील होत चालला आहे.

सत्य निर्णय करताना अथवा आचरणाची दिशा ठरविताना धर्मग्रंथ, रूढी, अंतःप्रेरणा, आत्मनिष्ठा, वासना–भावना यांना प्रमाण मानू नये

तर विवेकबुद्धीला प्रमाण मानावे असे विवेकवादाचे सांगणे आहे.

धर्मग्रंथ आणि रूढी यांना प्रमाण मानल्याने सामूहिक मूर्खपणाला आणि दुष्टपणाला प्रतिष्ठा प्राप्त होते. अंत:प्रेरणेचा हवाला देणारे लोक एक प्रकारचे ढोंग वाढवतात. आणि केवळ आपल्याच भावनेला, वासनेला महत्त्व देऊन आचार–विचार करणारे लोक स्वार्थीपणाने तरी वागतात किंवा एकांगीपणाने तरी. अशा प्रकारच्या आचार–विचारात जीवनाबद्दलची वस्तुनिष्ठ दृष्टी, उच्चतर मूल्ये असत नाहीत, तसेच सहिष्णू अशी सामाजिकतेची जाणीव असत नाही. यासाठी रूढी, धर्मग्रंथ, आत्मनिष्ठ भावना–वासना यांचे प्रामाण्य न मानता प्रत्येकाने आपल्या विवेक बुद्धीचा उपयोग करावा असे विवेकवादाचे प्रतिपादन आहे.

**विवेकवादाची ऐहिकता**

सृष्टीच्या घडामोडीचे ज्ञान बुद्धीने शास्त्रीय पद्धतीमुळे होऊ शकते हा विवेकवादाचा विश्वास आहे. या विश्वासामुळे मनुष्य परमेश्वरी सत्तेच्या कल्पनांनिर्मित जाचापासून मुक्त झाला आहे. निसर्गावर विजय मिळविण्यास सज्ज झाला आहे. त्याला त्याच्या कर्तृत्वाचे विश्व मोकळे झाले आहे.

सामाजिक व्यवहाराचे ज्ञान बुद्धीमुळेच होऊ शकते. सामाजिक संस्थांची व निर्बंधांची इष्टानिष्टता पारखून मानवी विकासाच्या दृष्टीने त्यांची पुनर्रचना करावी व या सामाजिक संदर्भात वैयक्तिक आचरणाची दिशा ठरविताना विवेकबुद्धीचा आधार घ्यावा असे विवेकवादाचे म्हणणे आहे. पूर्वीच्या काळी मानवी जीवन हे पारलौलिक ध्येयांनी नियमित केले होते. मानवी जीवनाचा ऐहिक विचारच त्या वेळी अभिप्रेत नव्हता. सामाजिक संस्थांचे अस्तित्व आणि वैयक्तिक आचरण यांवर पारलौकिक हेतू लादला गेलेला होता. ब्राह्मण वर्णात जन्माला आलेल्या व्यक्तीने अध्ययन–अध्यापनच करावयाचे. अंत्यज वर्णात जन्मलेल्या व्यक्तीने मेलेली जनावरेच ओढायची. हे असे का तर स्वधर्म आचरण्यासाठी !

अकरा—बारा वर्षांच्या आत मुलीचे लग्न करावयाचेच. नाहीतर पितरांना नरकवास ! पुत्रप्राप्तीचा आनंद का ? तर पित्याला परलोकी सद्गती प्राप्त होते म्हणून. परोपकार करावयाचा तो अपंगाना जगता यावे म्हणून नाही, तर दात्यांना पुण्याचा ठेवा प्राप्त होतो म्हणून ! यामध्ये सामाजिक दृष्ट्या हितकर मूल्यांना ऐहिकतेऐवजी पारलौकिकतेवर अवलंबून ठेवलेले दिसते. हे अवलंबन परिणामी घातक ठरते, कारण अशा पारलौकिकतेवर मग समाजाला विघातक मूल्येही नांदू शकतात.

सामाजिक संस्था आणि वैयक्तिक आचरण यांमागे प्रेरणा होती ती पारलौकिक सुखाची. म्हणून आपल्या समाजात अस्पृश्यता, स्त्रियांची गुलामगिरी यांसारखे माणुसकीला काळिमा आणणारे दोष निर्माण झाले. विवेकवादाला मूल्यांच्या संदर्भात पारलौकिक कल्पना मंजूर नाहीत. विवेकवादी दृष्टिकोणात मनुष्याला केंद्रस्थान समजून मानवी जीवनाच्या समृद्धीचा विचार असतो.

व्यक्तित्वाच्या विकासासाठी आणि सामाजिक उन्नतीसाठी विवेकवादी दृष्टिकोण आवश्यक आहे. माणसाने केवळ आत्मसुखाचा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन आचरण करताना आपल्या प्रमाणेच इतरांचा विचार करावा. त्यामुळेच मानसिक प्रगल्भता येते. व्यक्ती आणि समाज यांचा अतूट संबंध असल्यामुळे व्यक्तिविकास साधणे म्हणजेच सामाजिक उन्नती होणे होय.

◎ ◎ ◎

# २ विवेकशीलतेचा उगम आणि विकास

चांगले आचरण कोणते याचा निर्णय माणसाची विवेकबुद्धी घेत असते. चांगल्याचा निर्णय घेणारी विवेकबुद्धी अथवा चांगल्या आचरणाला प्रेरणा देणारी विवेकशीलता व्यक्तीच्या ठिकाणी निर्माण कशी होते हे आपण पाहू. यासाठी आपणास बालमानसशास्त्राचा आणि मनोविश्लेषणशास्त्राचा आधार घेणे आवश्यक ठरते. व्यक्तीचा विकास आणि पर्यायाने समाजाचा विकास हा व्यक्तीच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या विवेकशीलतेवर अवलंबून आहे. माणसाच्या विवेकशीलतेला अथवा नैतिक प्रेरणेला आवाहन करूनच व्यक्तीविकास साधणे, मनुष्यातील संबंध सुधारणे व त्याला अनुकूल सामाजिक संस्थांची उभारणी करणे आवश्यक आहे. मानवी मनाशी निगडित असलेल्या प्रश्नांचा विचार मानवी मनाच्या शास्त्राने त्यासंबंधी जे ज्ञान दिले आहे त्याचा आधार घेऊन करणे हे सयुक्तिक, शास्त्रीय आहे. म्हणून विवेकवादाचा विचार येथे मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून केला आहे.

**मानसशास्त्रीय दृष्टिकोणावर घेतले जाणारे आक्षेप**

विवेकशीलतेचा विचार मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून करण्यासंबंधी काही जण आक्षेप घेतात. त्यांचे म्हणणे असे :

( १ ) मानसशास्त्र हे पदार्थविज्ञान, रसायन या शास्त्रांप्रमाणे वर्णनात्मक ( डिस्क्रिप्टिव्ह ) शास्त्र आहे. मानवी मनोव्यापार यथातथ्य

वर्णन करणे, त्यांचे वर्गीकरण करणे एवढेच मानसशास्त्राचे काम आहे. नैतिक मूल्यांचा विचार या शास्त्राला अप्रस्तुत आहे. हें आदर्शात्मक ( नॉरमॅटिव्ह ) शास्त्र नव्हे.

( २ ) मानसशास्त्र हे अद्यापि बाल्यावस्थेत आहे. त्यात इतकी मतमतांतरे आहेत की, अशा अस्थिर ज्ञानाला शास्त्र तरी का म्हणावे ? अशा अस्थिर ज्ञानाचा आधार घेणे चुकीचे ठरेल.

आपण सुरुवातीला पहिल्या आक्षेपाचा विचार करू. इतर भौतिक किंवा मानवीय शास्त्रांपेक्षा मानसशास्त्राची गोष्ट वेगळी आहे. नैतिक मूल्यांची निर्मिती व नैतिक आचरण हा देखील प्रत्यक्ष मानवी मनो व्यापारच आहे. आणि मानवी मनाचा सर्वांगीण अभ्यास हा या शास्त्राचा उद्देश असल्याने त्यात मूल्यांच्या अभ्यासालाही स्थान मिळते आहेच. म्हणूनच मानसशास्त्र विवेकशीलतेचा अभ्यास करू शकते. विवेकशीलता कशी निर्माण होते, तिचा विकास कसा होतो, तिच्या विकासात कोणते अडथळे निर्माण होतात, ते अडथळे दूर करणे शक्य आहे काय, माणसाची चांगल्याबद्दलची अथवा मूल्याबद्दलची कल्पना कशी निर्माण होते, इत्यादी प्रश्न मानसशास्त्राच्या कक्षेत येतात. मानवी मनाच्या वास्तव्याचे निरीक्षण व प्रयोग यांवर आधारलेले वस्तुनिष्ठ ज्ञान केवळ मानसशास्त्रच देऊ शकते. म्हणून वरील प्रश्नाचा विचार जर आपणास जास्तीत जास्त निर्दोषपणे करावयाचा असेल तर मानसशास्त्राने संपादित केलेल्या ज्ञानाचा उपयोग करणे नुसतेच इष्ट नाही, तर आवश्यक आहे.

अनेक ज्ञानशाखांना दुहेरी वैशिष्ट्ये असतात. ( १ ) त्यातील ज्ञान शुद्ध स्वरूपात असते, आणि ( २ ) ते उपयोजित स्वरूपात असते. पदार्थविज्ञान आणि शरीरशास्त्र ह्या ज्ञानशाखांतील तात्त्विक ज्ञानाचा अनुक्रमे स्थापत्य व वैद्यक या उपयोजित शास्त्रात उपयोग केलेला दिसतो. मानसशास्त्राचेही असेच दुहेरी वैशिष्ट्य आहे. उद्योग, शिक्षण, उद्योगधंदे अशा

क्षेत्रात मानसशास्त्रीय ज्ञानाचा यशस्वीपणे उपयोग केलेला दिसतो. म्हणून मनोविश्लेषणशास्त्र व बालमानसशास्त्र यांनी संपादित केलेल्या ज्ञानाचा, नैतिक मूल्यांच्या व विवेकशीलतेच्या संदर्भात उपयोग केला तर तो विचार जास्तीत जास्त निर्दोष होण्याची शक्यता आहे.

मानसशास्त्रीय अभ्यासात अनेक मतमतांतरे व संप्रदाय आहेत, मानसशास्त्राने संपादित केलेल्या ज्ञानाला काटेकोरपणा आलेला नाही, म्हणून नैतिक प्रश्नांच्याबाबत मानसशास्त्रीय दृष्टिकोण स्वीकारू नये, असा दुसरा आक्षेप आहे. मानसशास्त्रीय ज्ञानात मतमतांतरे आहेत ही वस्तुस्थिती आहेच. परंतु ह्यामुळे मानसशास्त्राने संपादिलेले सर्वच ज्ञान हे वादग्रस्त आहे असे ठरू शकत नाही. जे ज्ञान प्रत्यक्ष निरीक्षणाने, प्रयोगाने संपादित केलेले असेल ते ग्राह्य मानावेच लागते. म्हणून बालमानसशास्त्राने मिळविलेले जे ज्ञान प्रत्यक्ष निरीक्षणावर व प्रयोगावर आधारलेले आहे त्याचाच या प्रकरणात उपयोग केलेला आहे. पुढील एका प्रकरणात प्रज्ञादुर्लभ मनस्तर ( अन्कॉन्शस माइंड ), वासना-पिंड ( इद् ), अहंमात्र ( ईगो ), नियंत्रक अहंमात्र ( सुपर-ईगो ) अशा काही मनोविश्लेषण शास्त्रातील कल्पनांचा आधार घेतलेला आहे. या कल्पनांचे संपूर्ण ज्ञान झालेले आहे असे नाही. काही बाबतीत मतमतांतरेही आहेत. म्हणून ह्या कल्पना जितक्या प्रमाणात सर्वमान्य झालेल्या आहेत तेवढयाच प्रमाणात स्थूलपणे त्यांचा उपयोग केलेला आहे.

### विवेकशीलतेचा उगम आणि बालमानसशास्त्र

विवेकशीलतेचे स्वरूप कळण्यासाठी तिचा उगम कळणे आवश्यक आहे. विवेकशीलतेचा उगम व स्वरूप कळले म्हणजे मग तिचे संवर्धन करणे, हा दृष्टिकोण आत्मसात् करणे शक्य होईल. माणसाच्या नैतिक विचाराचा, विवेकशीलतेचा उगम व्यक्तीच्या बाल्यावस्थेतच होत असतो. मुलाच्या मानसिक वाढीत विवेकशीलता दिसून येते.

पिअॅजे, गेसेल, ऑस्बोर्न इत्यादी मानसशास्त्रज्ञांनी बालमनाचा अतिशय सूक्ष्मतेने व पद्धतशीर अभ्यास करून मुलाच्या विवेकबुद्धीचा आणि नीतिविचारांचा उगम आणि विकास कसा होतो ते दाखविले आहे. चांगले काय, वाईट काय? बरोबर काय, चूक काय? या विचारांच्या मुळाशी विवेक करणारी बुद्धी असते. नीतिविषयक विचार आणि निर्णय विवेकबुद्धी घेत असते. मुलांची आत्मकेंद्रित वृत्ती नष्ट होणे, वडिलधाऱ्यांच्या आदेशाबद्दलची अंधश्रद्धा नष्ट होणे, इतरांच्याबद्दल विचार करणे म्हणजेच विवेक करणाऱ्या बुद्धीच्या नैतिक विचाराला सुरुवात होणे, असा मानसशास्त्राच्या अभ्यासाचा निष्कर्ष सांगता येईल.

**खेळात व्यक्त होणारी विवेकशीलता**

मानसशास्त्रज्ञांनी आपल्या अभ्यासासाठी गोट्यांच्या खेळाची निवड केली. या खेळात अनेक गुंतागुंतीचे नियम असतात. मुले आपल्या निरीक्षणाने संकोचणार नाहीत ही दक्षता घेऊन खेळणाऱ्या मुलांच्या मानसिक प्रतिक्रियांचा त्यांनी अभ्यास केला. खेळाचे नियम मुले किती प्रमाणात बंधनकारक मानतात? वय वाढेल तसा मुलांचा नियमाकडे बघण्याचा दृष्टिकोण कोणता असतो? मुख्यतः त्यांनी ह्या गोष्टींचा अभ्यास केला.

अडीच तीन वर्षांपर्यंतची मुले हा खेळ खेळूच शकत नाहीत. तीन ते सहा वर्षांपर्यंतची मुले इतरांचे थोडेफार अनुकरण करून खेळण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यांना जिथपर्यंत जमते तिथपर्यंतच. नंतर स्वतःच्या कल्पनाशक्तीने ती स्वतःशी खेळत राहतात व केवळ स्वतःमध्येच रमतात. मुलांची ही अवस्था म्हणजे संपूर्ण अहंकेंद्रित ( ईगोसेंट्रिक ) अवस्था होय.

सातव्या-आठव्या वर्षांवरील मुले जिंकण्याचा उद्देश ठेवून खेळतात खेळाच्या नियमांबद्दलची कल्पना मात्र स्पष्ट झालेली नसते. नियमांची आवश्यकता भासायला सुरुवात झालेली असते. काही तात्पुरते नियम

मान्य करून ती खेळायला लागतात. परस्परांच्या अनुमतीने नियम बदलायलाही हरकत नाही, असे त्यांना वाटते. अशा प्रकारची जाणीव त्यांच्या ठिकाणी निर्माण होत असल्याने नियमाचे पालन करण्याकडे त्यांची प्रवृत्ती असते. नियम हे मोठ्या मुलांनी आपल्यावर लादलेले आहेत अशी त्यांची सुरुवातीला कल्पना असते; परंतु सहकार्याची जाणीव वाढीला लागल्यानंतर नियमांचे बंधनकारकत्व न जाणवता ती ते नियम उत्स्फूर्तपणे पाळतात. सहकार्याच्या जाणीवेतून परस्पर देवाणघेवाण करण्याची वृती निर्माण होते. व्यापक नैतिक जाणीव निर्माण होऊन सवंगड्यांशी उदारपणाचे वर्तन घडते. खेळ चांगला व्हावा यासाठी हे नियम पाळणे आवश्यक आहे; मी नियम न पाळता इतरांना फसविले तर त्यांच्यावर अन्याय होईल; मग ती मुलेही नियम पाळणार नाहीत व माझ्यावर अन्यय होईल; म्हणून प्रामाणिकपणे नियम पाळणे आवश्यक आहे अशी त्यांची प्रकट-अप्रकट धारणा बनत जाते. मुलांच्या खेळातील या वर्तनातच सारासार विचाराचा, विवेकबुद्धीचा व नैतिकतेचा उगम दिसतो.

अकरा ते तेरा या वयाची मुले या खेळाच्या बाबतीत पुष्कळच विवेकशील आणि उदार असतात. इतकी की, अशी विवेकशीलता प्रौढ माणसे राजकारण, समाजकारण यातही दाखवीत नाहीत ! याचे एक कारण हे असू शकेल : साधारणपणे तेराच्या पुढची मुले हा खेळ खेळत नाहीत. म्हणून ज्यांचा वचक वाटावा अशी त्यांच्याहून मोठी मुले या खेळात असत नाहीत. स्वाभाविकपणेच त्यांना एक प्रकारची स्वायत्तता प्राप्त झालेली असते. प्रौढांच्या प्रत्यक्ष व्यवहारात ही स्वायत्तता आणि मोकळीक प्रौढांना मिळत नाही. जुनी पिढी नव्या पिढीवर सत्ता गाजवीत असते आणि नवी पिढी या सत्तेच्या छायेखालीच वावरत असते.

अकरा ते तेरा या वयाच्या मुलांच्या ठिकाणी खेळाचे नियम दुर्लंघ्य

आहेत ही समजूत हळूहळू कमी व्हायला लागते. त्या ऐवजी नियम हे एकमेकांचे जास्तीत जास्त सहकार्य मिळावे यासाठी तयार केलेले असतात, हे त्यांना पटू लागते. नियम पाळायलाच हवेत; परंतु गरज वाटली तर इतरांच्या संमतीने ते बदलायलाही हरकत नाहीत, असेही त्यांचे मत असते.

**नीतिकल्पना**

मुले अमूक एक वागणे चांगले का वाईट याचा विचार कसा करतात? त्यांचे नैतिक मूल्यमापनाचे निकष कोणते, याचा अधिक अभ्यास मानसशास्त्रज्ञांनी केला. हा शोध घेण्यासाठी त्यांनी मुलांना गोष्टी सांगण्याची रीत अवलंबिली. पहिल्या प्रकारच्या गोष्टीत मुलाच्या हातून वेंधळेपणाने न कळत नुकसान होते. दुसऱ्या प्रकारच्या गोष्टीत मुलगा जाणून बुजून वाईट गोष्ट करायला निघालेला असतो आणि त्याच्याही हातून नुकसान होते परंतु थोडेसे नुकसान होते. गोष्ट सांगून झाल्यावर ऐकणाऱ्या मुलाला प्रश्न विचारावयाचा की, तू कोणत्या मुलाला किती शिक्षा करशील? उदाहरणार्थ, पहिली गोष्ट अशी : आई आपल्या मुलाला हाक मारते. तो धावत धावत स्वयंपाक घरात यायला निघतो. दाराजवळच्या खुर्चीवर पंधरा कप असतात. ते त्याला माहीत नसते. तो येताना त्याचा धक्का जोराने दाराला लागतो आणि पंधराही कप फुटतात. ही गोष्ट सांगून झाल्यावर दुसरी गोष्ट सांगायची ती अशा प्रकारची : आई बाहेर गेलेली आहे हे बघून एक मुलगा खाऊ चोरून घेण्यासाठी स्वयंपाक घरात जातो. खाऊचा डबा उंच फळीवर असतो. तो काढण्यासाठी तो घडवंचीवर चढतो. फळीवरचा खाऊचा डबा धुंडाळताना त्याचा हात एका कपाला लागतो आणि कप खाली पडून फुटतो.

या दोन प्रकारच्या गोष्टी सांगून झाल्यावर ऐकणाऱ्या मुलाला प्रश्न विचारायचा की, तुम्ही कुणाला किती शिक्षा द्याल? दहा पर्यंतच्या

२१९४९ १५-२० नि३१ १६/३१

वयाची मुले नुकसान किती झाले त्याच्या प्रमाणात शिक्षा सुचवितात. दहाच्या पुढची मुले मात्र गोष्टीतल्या मुलांकडून प्रत्यक्ष किती नुकसान झाले याचा विचार न करता हेतू लक्षात घेऊन शिक्षा सुचवितात. दहाच्या आतील मुलांकडून, ज्याने एक कप फोडला त्याला एक चपराक आणि ज्याने पंधरा फोडले त्याला जास्त चपराकी, अशा प्रकारचे उत्तर मिळते. अगदी लहान मुले केवळ नुकसानीचा विचार करून शिक्षा का सुचवितात याचे कारण स्पष्ट आहे. त्यांनी स्वतःच जास्त नुकसानीबद्दल जास्त शिक्षा आपल्या आईवडिलांकडून ( विशेषतः आईकडून ) भोगलेली असते. या वयात मूल हे केंद्रित असते, इतरांचा विचार करू शकत नाही. आणि वडीलधाऱ्यांकडून त्याला जी वागवणूक मिळालेली असते तीच त्याला योग्य वाटते.

वडीलधाऱ्यांनी जे निषिद्ध वा करू नये म्हणून सांगितलेले असते ते करणे वाईट, ही भावना सहा ते आठ वर्षांच्या मुलांत अधिक प्रमाणात दिसते. नऊ ते बारा या वयाच्या गटातील मुलांची ही भावना कमी प्रमाणात असते. ही मुले केवळ वडीलधाऱ्यांच्या आदेशाला प्रमाण मानीत नाहीत; तर इतर व्यक्तींशी असलेला संबंध विचारात घेतात.

समान वागणूक न देणे ही गोष्ट अयोग्य आहे ही जाणीव सहा ते आठ या वयाच्या गटातील मुलांत तितकीशी आढळत नाही. पाहाणीमध्ये शेकडा सत्तावीस मुलांत ती जाणीव आढळली; परंतु नऊ ते बारा या वयाच्या गटातील शेकडा त्र्याहात्तर मुलांत ही जाणीव आढळली. या मुलांना कोणते वर्तन अयोग्य वाटते याची काही उदाहरणे : दोन मुलांनी सारखेच काम केले असता एकाला मात्र जास्त बक्षीस देणे; सारख्याच चुकीबद्दल एकाला दुसऱ्यापेक्षा जास्त शिक्षा करणे; शिक्षकांनी आवडत्या मुलांना मार्क देणे; दणकट माणसाने अशक्त माणसाला मारणे; खेळाचा निर्णय देताना पंचाने पक्षपात दाखविणे, इत्यादी.

बारा वर्षांच्या मुलांना प्रौढ माणसांच्या वागण्यात सामाजिक, आर्थिक कारणांमुळे जी विषमता दिसून येते ती अयोग्य वाटते. या मुलांना अयोग्य वाटणाऱ्या गोष्टींची काही उदाहरणे : शिक्षिकेला एखादा मुलगा सुरेख पोशाख घालणारा, चांगल्या तब्येतीचा, अधिक हुषार म्हणून अधिक आवडणे; सुस्वभावी गरीब मित्रापेक्षा श्रीमंत मित्र अधिक पसंत करणे; गरीब मुलांबरोबर फिरायला, खेळायला आईने बंदी करणे, इत्यादी.

## खोटे बोलण्यासंबंधी मुलांचा दृष्टिकोण

सहा वर्षांपर्यंतच्या मुलांना खोटे बोलणे आणि शिवी देणे यामधला फरक समजत नाही. भाषेच्या वापरात काही एक चूक होणे, एवढीच त्यांची खोटे बोलण्यासंबंधी कल्पना असते. पाच-सहा वर्षांचा मुलगाही गंमत म्हणून, खेळ म्हणून, खोटे बोलतो. सहा-सात वर्षांच्या मुलाच्या दृष्टीने, विश्वास बसेल असे खोटे सांगितले तर कमी वाईट; परंतु विश्वास बसणार नाही असे खोटे सांगितले तर जास्त वाईट. खऱ्या-खोट्या संबंधी मुलांचा दृष्टिकोण कळावा म्हणून पुढीलप्रमाणे गोष्टी सांगितल्या गेल्या.

( १ ) शाळेतून घरी आल्यावर मुलगा आईला सांगतो की, आपण खूप मोठा कुत्रा पाहिला. अगदी बैला एवढा.

( २ ) दुसरा एक मुलगा शाळेतून घरी आल्यावर आपल्या आईला सांगतो की, शिक्षकांनी आपल्याला खूप चांगले मार्क दिले. आई आनंदून त्याला खाऊ देते. खरे म्हणजे त्याला शिक्षकांनी मुळीच मार्क दिलेले नसतात.

सहा ते नऊ वयाच्या मुलांच्या दृष्टीने पहिला मुलगा जास्त वाईट. कारण तो खरे बोलला नाही. दुसरा मुलगा मात्र तितका वाईट नाही. कारण आईने त्याच्यावर विश्वास टाकला. वडील माणसे ज्या खोट्यावर विश्वास ठेवतात ते तितकेसे वाईट नाही; परंतु त्यांना जे खोटे म्हणून

चटकन लक्षात येते ते वाईट. तशा प्रकारचे खोटे बोलणे वाईट, कारण त्यावरून मुलांना शिक्षा होते किंवा त्यांचा राग केला जातो. मुलांचा, वेंधळेपणाने नुकसान करण्याबाबत जो परिणामानुसारी दृष्टिकोण असतो, तोच खोटे बोलण्याबाबतही असतो.

दहा-अकरा वर्षांवरील मुले मात्र खोटे बोलण्यातला हेतू विचारात घेऊन त्याचा वाईटपणा ठरवितात. या वयात त्यांना परस्परसंबंधाची, देवाण-घेवाणीची जाणीव निर्माण होते. त्यांची आत्मकेंद्रितता नष्ट होऊन ती सामाजिक व्यक्ती म्हणून विचार करायला लागतात, वागायला शिकतात. ‘ खोटं बोलणं वाईट का ? ’ या प्रश्नाचे उत्तर दहा वर्षांचा मुलगा देतो, ‘ मग लोकांवर विश्वास टाकणं कठीण होऊन बसेल. ’

**विवेकशीलता व सामाजिक संबंध**

मुले नैतिक निर्णय कसा घेतात, चांगले-वाईट, खरे-खोटे, न्याय-अन्याय्य कसे ठरवितात याचा मानसशास्त्रज्ञांनी वरीलप्रमाणे शोध घेतला. यातूनच विवेकशीलता व सामाजिक संबंध यांचे नाते कोणत्या प्रकारचे आहे, याचे स्वरूप स्पष्ट होते.

मुलांच्या वागण्यात काही नियम असतात. हे नियम समाजाने घालून दिलेले असतात. ते सुसंगत अथवा ठराविकच असतात असे नाही. कारण समाज नावाची स्वतंत्र, एकच एक अशी वस्तू नाही. अखेर समाज म्हणजे व्यक्तीव्यक्तींच्या परस्परसंबंधांची गोळाबेरीज.

इथे प्रश्न उपस्थित होतो : मुले जे नियम पाळतात ते एकाच प्रकारचे असतात काय ? या नियमांच्या पाठीमागे एकाच प्रकारची मान्यता व सत्ता असते काय ? एकाच प्रकारच्या सामाजिक संबंधांतून हे नियम निष्पन्न झालेले असतात काय ?

या सामाजिक संबंधांचे दोन विभिन्न प्रकार आहेत. एक, मुले व वडिलधारे यांचा संबंध व दुसरा, मुले आणि मुले यांचा संबंध. पहिल्या

प्रकारचा जो संबंध आहे तो निर्बंधरूप संबंध आहे. निर्बंधरूप संबंधात नियम हे एखाद्या बाह्य सत्तेने व्यक्तीवर घातलेले असतात व ते आदेश पाळावेत ही अपेक्षा असते. या बाह्य सत्तेचा आधार मोठ्यांच्या शब्दा-बद्दल आदर हा असतो. बाह्य सत्तेबद्दल एकपक्षी आदराची भावना असते. मूल जोपर्यंत आत्मकेंद्रित असते, त्याला स्वतःच्या व्यक्तित्वाची जाणीव झालेली नसते, आपला इतरांशी असलेला संबंध ध्यानात आलेला नसतो, तोपर्यंत ते वडिलधाऱ्यांचा शब्द प्रमाण मानते. वडिलधाऱ्यांचे आदेश हे चांगलेच आहेत अशी त्याची समजूत असते. साधारणपणे वयाच्या आठव्या वर्षापर्यंत मुलांची ही आत्मकेंद्रित अवस्था विशेषत्वाने दिसते. या अवस्थेत योग्य-अयोग्य काय या बद्दलची मुलांची जी कल्पना बनते ती वडीलधाऱ्यांच्या आज्ञा, त्यांच्या इच्छा, त्यांच्या मनाचा कल, इत्यादी गोष्टींचा प्रभाव पडून.

मुलांचे वागण्याचे नियम ज्यातून निष्पन्न होतात असा दुसरा एक सामाजिक संबंध आहे आणि तो म्हणजे, मुलामुलांचा संबंध. हा जरी लहान मुलामुलांचा संबंध असला तरी त्याची सामाजिकता कमी दर्जाची मानता येत नाहीं. हा सामाजिक संबंध सहकार्यावर व समतेवर आधार-लेला असतो. वयाच्या आठव्या वर्षानंतर मुलाच्या ठिकाणी या सामा-जिक संबंधाची जाणीव विशेषत्वाने दिसून येते. या अवस्थेत मुलाची आत्मकेंद्रीयता कमी होऊ लागते. स्वतःबद्दल जाणीव होऊ लागल्याने स्वतःच्या मर्यादा व स्वतःचे सामर्थ्य ध्यानात येऊ लागते व त्यातूनच सहकार्याची भावना वाढीला लागते. मुलामुलांची, समाजात एक प्रकारची स्वायत्तता असते. वागण्याचे नियम त्यांच्यावर कोणी बाहेरून लादीत नाहीत; तर ते त्यांच्या अंतःकरणातून उत्स्फूर्तपणे निर्माण होतात. या नियमांची मान्यता अथवा त्यांच्या पाठीमागे असणारी सत्ता म्हणजे मुलांचेच सामूहिक एकमत होय. इथे आदराची

भावना एकपक्षी नसते; तर एकमेकांबद्दलची असते. चांगल्या-वाईटाचा निर्णय वडीलधाऱ्यांच्या मतांचा आधार घेऊन मुले करीत नाहीत, तर आपला इतरांशी असलेला संबंध ध्यानात घेऊन करतात. एखाद्या गोष्टी-बद्दल किती शिक्षा होते, यावरून चांगले-वाईटपणा न ठरविता इतरां-बद्दल कोणता हेतू मनात ठेवून कृती केली जाते यावरून ठरवितात. मुलांच्या या वागण्यातच—या विशिष्ट प्रकारच्या सामाजिक संबंधातच—विवेकशीलतेचा उगम दिसून येतो.

◎ ◎ ◎

## ३ विवेक आणि सत्य निर्णय

माणसाचा विवेक दोन क्षेत्रात कार्य करीत असतो, असे आपण सुरवातीलाच म्हटले आहे. अमुक एक विधान सत्य आहे काय? आणि अमुक एक आचरण चांगले आहे काय? या दोहोंचा निर्णय विवेकबुद्धीला करावयाचा असतो. मानवी जीवन हा विवेकवादाचा विषय आहे. त्यातून विवेकवादाच्या दृष्टीने ~~गले आचरण कोणते हाच खराखुरा महत्त्वाचा प्रश्न आहे; परंतु आचरण हे मानवी जीवनाच्या यथार्थ आकलनावर, सत्य ज्ञानावर आधारल्यावाचून ते चांगले आचरण होऊ शकत नाही. म्हणून मानवी जीवनासंबंधी, मानवी व्यवहारासंबंधी आणि मानवी मनासंबंधी यथार्थ आकलन होणे ही विवेकशील वर्तनाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. म्हणूनच विवेकवादाचा सर्वांगीण विचार विवेकवाद सत्य निर्णय अथवा खरे-खोटे यातील निवड कशी करतो, हे पाहिल्यावाचून होणार नाही.

**ज्ञानाची तीन वैशिष्ट्ये**

यथार्थ ज्ञानाचे महत्त्व तीन कारणांमुळे आहे. एकतर ज्ञानाला स्वतःसिद्ध असे मूल्य आहे. ज्ञान मिळविण्याची धडपड मनुष्य स्वभावात स्वाभाविक आहे. केवळ जिज्ञासेची तृप्ती होण्यात, नवीन काही ज्ञान मिळविण्यात मनुष्यमात्राला आनंद वाटतो. एव्हरेस्ट शिखराचा माथा पाहावा, पॅसिफिक महासागराचा तळ गाठावा, चंद्राचे स्वरूप न्याहा-

ळावे, यासाठी माणसाने जिवाची पर्वा न करता प्रयत्न केले आहेत. यातून काही लाभाची प्राप्ती होण्यासारखी आहे, अशातला मुळीच भाग नाही. माणसाच्या हृदयात ज्ञानाला स्वतःसिद्ध मूल्य आहे, हीच गोष्ट यातून निष्पन्न होते. गणिती, पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ, खगोलशास्त्रज्ञ, आपल्या विषयातील कूट प्रश्न घेऊन आयुष्यभर ते सोडवीत बसतात ते यामुळेच.

यथार्थ ज्ञान महत्त्वाचे ठरते याचे दुसरे कारण हे की त्या ज्ञानावर आधारलेल्या तंत्रविद्येमुळे मानवी जीवन अधिक समृद्ध, अधिक सुखदायक व अधिक निरोगी झाले आहे. उत्पादनाची साधने, वाहतुकीची साधने, वैद्यक शास्त्रातील प्रगती इत्यादी गोष्टी ध्यानात घेतल्यावर याचे सहज प्रत्यंतर येते.

यथार्थ ज्ञान महत्त्वाचे ठरते याचे तिसरे आणि महत्त्वाचे कारण म्हणजे या ज्ञानाने मानवी जीवनाबद्दलच्या आकलनात फार मोठी भर घातली आहे. एकंदर विश्वाच्या संदर्भात मनुष्याला आपले स्थान समजून घेण्यात मदत झाली आहे. निसर्गाची कोडी काही प्रमाणात सुटू लागली. माणसाला स्वसामर्थ्याचा अधिकाधिक प्रत्यय येऊ लागला. अनेक चुकीच्या कल्पनांपासून तो मुक्त होऊ लागला. मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इत्यादी शास्त्रांच्या ज्ञानामुळे मानवी व्यवहाराचे अधिकाधिक आकलन होऊ लागले. मानसशास्त्र, मनोविश्लेषणशास्त्र या शास्त्रांनी तर सर्व मानवी व्यवहारांच्या मुळाशी असणाऱ्या मनाचा अभ्यास सुरू केला. अशा तऱ्हेने, माणसाच्या भोवती असणारी जड सृष्टी, मानवी व्यवहार आणि मानवी मन यांबद्दलची सत्ये शास्त्रांनी जास्त जास्त उमगत चालली आहेत.

सामाजिक संस्था ही मनुष्याची स्वाभाविक निर्मिती आहे. आपला विकास करून घेण्यासाठी मनुष्याने संस्था निर्माण केल्या. या सामाजिक संस्थांमध्ये जेव्हा जेव्हा अज्ञानाचा अंश मिसळला, चुकीच्या कल्पनांचा

प्रभाव पडू लागला तेव्हा तेव्हा त्या मानवी विकासाला अनुकूल न ठरता प्रतिकूल ठरल्या. मानवी मनासंबंधी आणि व्यवहारासंबंधी अधिकाधिक यथार्थ ज्ञान उपलब्ध झाल्यामुळे विवेकाच्या पायावर संस्थांची उभारणी करणे आवश्यक वाटू लागले आहे. माणसाचे वर्तन जर अधिकाधिक विवेकशील व्हावयाचे असेल, सामाजिक संस्था माणसाच्या व्यक्तित्वाचा विकास करण्यासाठी उपयोजावयाच्या असतील, तर मानवी जीवनाबद्दलचे सत्य, मानवी व्यवहाराबद्दलचे सत्य काय आहे याचा निर्णय करणे अत्यंत आवश्यक आहे. या सत्याचा निर्णय केल्याशिवाय चांगल्या आचरणाचा विवेक करता येणार नाही. म्हणून विवेकवादाच्या विचारात सत्य-निर्णयाला महत्त्व आहे.

विवेकवाद मानवी जीवनात सत्याचा निर्णय कसा घेतो ते आपण पाहणार आहोत. सत्य-निर्णयासाठी वैज्ञानिक विचार-पद्धतीचाच अवलंब विवेकवाद करतो. कारण वैज्ञानिक विचार-पद्धती हीच एकमेव सत्य-संशोधनाची व सत्य-निर्णयाची पद्धती आहे. विवेकशील मनुष्य मानवी जीवनातील सत्य शोधण्यासाठी, खऱ्याखोट्याचा निवाडा करण्यासाठी या पद्धतीचा अवलंब करीत असतो.

आपण या वैज्ञानिक विचारपद्धतीची वैशिष्टये पाहू; शास्त्रीय संशोधनात या पद्धतीचा अवलंब कसा केला जातो ते पाहू व त्याबरोबरच मानवी जीवनातही हीच विचारपद्धती कशी अवलंबिता येईल, व अवलंबिणे कसे आवश्यक आहे, हेही पाहू.

**वैज्ञानिक विचारपद्धतीची वैशिष्टये**

या विचारपद्धतीचा गाभा असा : ( १ ) अवलोकनासाठी 'वैशिष्टयपूर्ण घटना' निवडून त्याचे निरीक्षण करणे; ( २ ) या निरीक्षणावर कार्यकारण-भावात्मक उपपत्ती बसवून निष्कर्ष काढणे; व ( ३ ) निष्कर्ष प्रयोगाने पडताळून पाहणे.

व्यापक स्वरूपाचा सिद्धान्त बनविण्यासाठी ज्या घटना उपयोगी पडतात त्या निवडक घटनांना ‘ वैशिष्ट्यपूर्ण घटना ’ म्हणण्यात येते. पुढील विवेचनात या वैशिष्ट्यपूर्ण घटनांसाठी निरीक्षणाचा ‘ विषय ’, ‘ पुरावा ’ असाही शब्द वापरण्यात आला आहे.

वस्तुनिष्ठता हे या सत्यनिर्णयाच्या पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे आणि तीमुळेच सत्यनिर्णयाची ही पद्धती निर्दोष ठरली आहे. पुढील तीन गोष्टींवर ही वस्तुनिष्ठता अवलंबून असते : ( १ ) पुरावा ( अथवा वैशिष्ट्य पूर्ण घटना ) अनुभवनिष्ठ असतो; ( २ ) पुरावा आणि निष्कर्ष यात संगती असते; व ( ३ ) निष्कर्ष पडताळून पाहता येतो.

ही तीन वैशिष्ट्ये शास्त्रीय विचारपद्धतीत कशी दिसून येतात ते पाहू व त्याचबरोबर मानवी जीवनाचे आकलन जास्तीत जास्त निर्दोष व्हावयाचे असेल तर हीच वैशिष्ट्ये कशी आवश्यक ठरतात ते पाहू.

## पुरावा अनुभवनिष्ठ असणे

पुरावा अनुभवनिष्ठ असणे याचा अर्थ, बाह्य परिस्थितीतील विशिष्ट अशा घटना आपल्याला पाहायला, अनुभवायला मिळालेल्या असणे, असा आहे. शास्त्रीय विचारपद्धतीत पुरावा अथवा संबंधित वैशिष्ट्यपूर्ण घटना या निष्कर्षाच्या आधारभूत असतात. त्यावरूनच वस्तुनिष्ठ असा निष्कर्ष काढावयाचा असतो. हा पुरावाच जर गृहीत धरलेला असेल तर त्यावरून काढलेला निष्कर्ष बरोबर ठरणे कठीण. वरून खाली टाकलेला जड पदार्थ त्याहून कमी वजनाच्या पदार्थापेक्षा लवकर खाली येतो ही गोष्ट गॅलिलिओच्या समकालीनांनी गृहीत धरली होती. ही गृहीत गोष्ट त्यांच्या मनात इतकी पक्की बसलेली होती की, प्रत्यक्ष सिद्ध घटनेवर विश्वास ठेवायलाही ते तयार नव्हते गॅलिलिओच्या समकालीनांचा आधार काय ? तर ॲरिस्टॉटलने म्हणून ठेवले होते की, एकाच वेळी खाली टाकलेल्या पदार्थांपैकी जड पदार्थ लवकर खाली येतो व हलका उशिरा

खाली पोचतो. अत्यंत कुशाग्र बुद्धीचा मनुष्यही परंपरेने चालत आलेल्या गोष्टींवर कसा डोळे झाकून विश्वास ठेवतो याचे उदाहरण म्हणून ॲरिस्टॉलच्याच एका गोष्टीचा उलेख करता येईल. त्याची अशी ठाम समजूत होती की, बायकांना पुरुषांपेक्षा कमी दात असतात. आपले हे मत पडताळून पाहण्यासाठी स्वतःच्या बायकोचे दात मोजून पाहण्याचेही त्याला सुचले नाही. ॲरिस्टॉटलला आपले मत पडताळून पाहण्याची संधी किमानपक्षी दोनदा घेता आली असती, कारण त्याने दोनदा लग्न केले होते !

माणसे अनेक चुकीच्या गोष्टी गृहीत धरतात आणि त्या पाठीमागे आधार असतो तो एखाद्या पूर्वाचार्यांचा, धर्मग्रंथांचा वा स्वतःच्या इच्छेतून निर्माण झालेल्या दुराग्रहाचा. पारलौकिक बाबतीत तर काल्पित, गृहीत गोष्टी विचारात घेऊनच विवेचन केलेले असते. स्वर्ग, पाताळ असे आणखी दोन लोक आहेत; मृत्यूनंतर पुनर्जन्म प्राप्त होतो; विधवा स्त्रीने पतीबरोबर स्वतःला जाळून घेतले म्हणजे पतीला स्वर्गप्राप्ती होते;अशा अनेक निष्कर्षांत स्वर्ग, पाताळ, पुनर्जन्म, इत्यादि गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. बरे, या गोष्टी पडताळून पाहण्याची सोय नाही. स्वर्गात चार दिवस मौजेत राहून आपला अनुभव सांगण्यासाठी अद्याप कुणी खाली आलेला नाही.

वैज्ञानिक विचारपद्धतीला हा प्रकार मंजूर नाही. केवळ अनुभवास आलेल्याच घटना विचारासाठी ग्राह्य मानल्या जातात. प्राणीविकासाचा सिद्धान्त प्रतिपादन करणाऱ्या डार्विनने सतत पाच वर्षेपर्यंत ताहिती, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, मालदिव बेटे, मॉरिशस, दक्षिण अमेरिका प्रदेश पालथे घालून पशुपक्ष्यांचे हजारो नमुने गोळा करून त्यांचे निरीक्षण केले व मग त्यावरून आपला सिद्धान्त मांडला.

ज्वलन क्रियेसंबंधी शास्त्रीय उपपत्ती मांडताना स्टॉल नावाच्या शास्त्रज्ञाने ' फ्लॉजिस्टन ' नावाचा एक पदार्थ गृहीत धरला होता. फ्लॉजिस्टन हा पदार्थ ज्या वस्तूत असतो ती वस्तू जळते असे त्याचे मत होते. मग

एखाद्या धातूच्या ज्वलनानंतर त्या धातूचे वजन का वाढते? या शंकेवर स्टॉलच्या शिष्यांनी मोठे मौजेचे उत्तर दिले. ' एखाद्या वस्तूत जोपर्यंत फ्लॉजिस्टन अंतर्भूत असते तोपर्यंतच तिचे वजन कमी असते. पोहणारा मनुष्य जड असला तरी भोपळे बांधल्यावर हलका होतो. भोपळे काढून घेतले म्हणजे जड होतो. ' लाव्हासीए (इ. स १७४३–१७९४) या शास्त्रज्ञाला हे मत मान्य झाले नाही. सतत अकरा वर्षे त्याने प्रयोग केले. ज्वलनाची प्रक्रिया घडते म्हणजे जळणाऱ्या पदार्थाशी ऑक्सीजन वायूचा संयोग घडून येतो हे सप्रमाण सिद्ध करून त्याने ज्वलन म्हणजे ऑक्सिजनशी संयोगीकरण होय हे दाखविले.

**आत्मनिष्ठ पुरावा अग्राह्य**

अनुभवास न येणारा कल्पित, गृहीत पुरावा जसा वैज्ञानिक विचार-पद्धतीत ग्राह्य मानला जात नाही तसाच आत्मनिष्ठ पुरावाही ग्राह्य धरता येत नाही. स्वतःचे विकार, भावना, पूर्वग्रह इत्यादीबाबतचा आत्मनिष्ठ पुरावा शास्त्रीय निष्कर्ष काढण्याच्या दृष्टीने वापरणे चूक ठरते. स्वतः-च्या भावनाविकारातून निर्माण होणाऱ्या मतांचा आधार स्वतःचे भावना-विकारच असतात. त्यांना आपल्या मनाच्या बाहेर अस्तित्व नसल्यामुळे तेही वस्तुनिष्ठ कधीच होऊ शकत नाहीत आणि अशा पुराव्यावरून काढलेले निष्कर्ष केवळ चुकीचे असतात एवढेच नव्हे, तर अनेकदा मानवहितविरोधी असतात. ज्यू लोकांच्या नीचपणाबद्दल नाझींची खात्री झाली होती. याला पुरावा म्हणजे, त्यांना तसे वाटत होते एवढेच. आणि त्यामुळे ज्यूंच्या हत्याकांडाला प्रारंभ झाला. आजही अनेक अमे-रिकनांना नीग्रोंच्याबद्दल असेच वाटते. हिंदू समाजात सवर्णीयांकडून शूद्रांना लांच्छनास्पद वागणूक मिळाली. याचे कारण शूद्रांच्या ठिकाणी योग्यता नव्हती असे नाही; तर सवर्णीयांना वाटत होते की, त्यांच्या ठिकाणी ती नाही. स्त्रियांना दास्यात ठेवले याचे कारण स्त्रियांनी

दास्यात राहावे ही पुरुषांची इच्छा आणि तीमधूनचा निष्कर्ष 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।' सामाजिक जीवन जर नीट न्याहाळून पाहिले तर व्यक्तीची मते ही तिच्या प्रबल आत्मनिष्ठेतून बनलेली असतात असे दिसून येईल. व्यक्तीच्या मानसिक वाढीच्या काळात तिच्या मनावर जे संस्कार झालेले असतात ते अत्यंत प्रबल स्वरूपाचे असतात. तिच्या भावना या संस्कारांशी निगडित असतात आणि या भावनेतूनच ठाम अशी मते तयार होतात. शास्त्रीय विचारपद्धतीत मात्र आत्मनिष्ठ पुरावा व मते वस्तुनिष्ठेच्या अभावी ग्राह्य मानता येत नाहीत.

ज्या वेळी भावनेसंबंधीच विधान केलेले असते तेथे मात्र या आत्मनिष्ठ भावनेला स्थान असते. उदाहरणार्थ, 'किती सुंदर आहे हे चित्र !' 'किती भव्य आहे हा देखावा !' यासारखी विधाने वक्त्याची भावना व्यक्त करीत असतात. त्यावरून त्यांना सर्वसामान्य स्वरूपाचा निष्कर्ष काढावयाचा नसतो; तर एखाद्या घटनेबद्दल प्रतिक्रियाच व्यक्त करावयाची असते. म्हणून ही विशिष्ट स्वरूपाची विधाने ग्राह्य मानावी लागतात. त्यांच्या सत्यासत्यतेचा निर्णय अशा ठिकाणी आपल्याला करावयाचाच नसतो.

**पुरावा आणि निष्कर्ष यांमध्ये संगती असणे**

शास्त्रीय विचारात ज्यामुळे वस्तुनिष्ठता येते असे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे पुरावा आणि निष्कर्ष यात संगती असणे, कार्यकारणभाव प्रस्थापित करणे, हे होय. शास्त्रीय विचारपद्धतीमधील हा अत्यंत महत्त्वाचा असा भाग आहे. पाण्याच्या अणूचे विभजन केले असता हैड्रोजनचे दोन व ऑक्सिजनचा एक परमाणू उपलब्ध होतो. यावरून पाण्याच्या घटनेविषयी सुसंगत निष्कर्ष मांडता येतो. पृथ्वीवर दिवस आणि रात्र असा क्रम आपल्या अनुभवास येतो. या पुराव्यावरून पृथ्वी स्वतःभोवती फिरते आहे असा कार्यकारणभावयुक्त निष्कर्ष काढता येतो. 'परमेश्वराने दिवस

काम करण्यासाठी व रात्र विश्रांतीसाठी निर्माण केली ' हे धर्मग्रंथातील वचन मग आपणास मान्य करता येत नाही.

विश्वासंबंधी आणि विश्वातील व्यवहारासंबंधी व्यापक सिद्धान्त सांगण्याची ऊर्मी माणसाच्या ठिकाणी पहिल्यांपासून प्रबळ आहे; परंतु पुरावा आणि निष्कर्ष यात सुसंगती निर्माण न करता आल्यामुळे माणसे अनेक चुकीचे निष्कर्ष काढीत होती, असे आपणास दिसते. निसर्गनियमांचे माणसाला आकलन होत नव्हते. ऊन, वारा, पाऊस का व कसे निर्माण होतात हे माहीत नसल्यामुळे त्यांनी देवतांचे कार्य कल्पिले. निसर्गाची दारुण उग्रता अनुभवास येत होती. या सबंध विश्वाचे नियमन कसे घडते हे कळत नव्हते. म्हणून माणसाने ' परमेश्वर ' ही आदिशक्ती असावी, असा निष्कर्ष काढला. रोग होतात ही तर प्रत्यक्ष वस्तुस्थिती. तेव्हा परमेश्वरी प्रकोपाने रोग होतात असाही निष्कर्ष काढला. पूर्वजन्मीची कर्मे या जन्मीच्या सुखदु:खाला कारणीभूत होतात हा निष्कर्षही अशाच प्रकारचा.

मानवी व्यवहारातही असे चुकीचे निष्कर्ष काढले जात होते व त्यालाच सत्य समजून आचरण केले जात होते. पित्याचे गुण संपूर्णपणे पुत्रात उतरतात आणि माणसांची ' पावित्र्याच्या ' दृष्टीने उतरंड रचता येते, या चुकीच्या कल्पनांवर आपल्या समाजाची जन्मसिद्ध जातिव्यवस्था टिकून राहिली. माणसाची योग्यता जन्मानेच ठरली जात असे. त्याच्या स्वतंत्र कर्तृत्वाला मुळी अवसरच ठेवला गेला नाही. म्हणून शूद्र शतकानुशतके दु:स्थितीत खितपत पडले. माणुसकीच्या साध्या हक्काला मुकले. अन्नोदक-व्यवहार, विवाह याबाबत कडक निर्बंध आले. अन्य जातीत विवाह करू नयेत, विधवांनी पुनर्विवाह करू नयेत, परदेशगमन करू नये, इत्यादी निर्बंध चुकीच्या पायावर उभारले गेले. हे निष्कर्ष-स्वरूप-निर्बंध आणि त्यांच्या आधारभूत कल्पना यांमध्ये कार्यकारणभाव दिसत नाही.

आजचा काळ विचारात घेतला तर काय दिसते ? शास्त्रज्ञानाची एवढी प्रगती झाली असली तरी शास्त्रीय विचारपद्धती मात्र आपण आत्मसात केलेली नाही असेच म्हणावे लागते. आपल्या वागण्यातून आणि बोलण्यातून चुकीचे पूर्वग्रह व्यक्त होतात आणि या चुकीच्या पूर्व-ग्रहाच्या मुळाशी चुकीचा कार्यकारणभाव असतो. आपण परक्या जाती-विषयी, समाजाविषयी, धर्माविषयी, प्रदेशाविषयी चुकीची मते व्यक्त करीत असतो. पुरावा नसताना अथवा अत्यल्प पुराव्यावरून व्यापक निष्कर्ष काढण्याची चूक करीत असतो. उदाहरणार्थ, आपण अशा स्वरूपाचे विधान करतो : ‘ घाऱ्या डोळ्याची माणसे स्वार्थी असतात. ’ या विधानातून ‘ सर्व घाऱ्या डोळ्यांची माणसे स्वार्थी असतात ’ असे बोलणाऱ्याला सूचित करावयाचे असते, आणि तेच सूचित होते. वस्तुतः विधान करणाराने फारच थोडी घाऱ्या डोळ्याची माणसे बघितलेली असतात. म्हणून सगळ्यांबद्दल वस्तुतः तो विधान करू शकत नाही. शिवाय बिनघाऱ्या डोळ्याची माणसेही स्वार्थी असतात; परंतु घाऱ्या डोळ्याच्या माणसाबद्दल त्याचा चुकीचा ग्रह झालेला असतो आणि बोलणारा तो व्यक्त करीत असतो. त्याला योग्य विधान करावयाचे झाले तर असे म्हणावे लागेल : ‘ घाऱ्या डोळ्याची काही माणसे इतर बिनघाऱ्या डोळ्याच्या काही माणसापेक्षा काहीशी स्वार्थी असतात ” आणि हे वस्तुनिष्ठ विधान ऐकले तर घाऱ्या डोळ्याच्या माणसालाही राग यावयाचा नाही.

शूद्र हे गुणवत्तेत कमी असतात; जन्मनःच ते बुद्धीने मंद, गुणाने हीन असतात या दुराग्रहाचे समर्थनही अशाच दुबळ्या कार्यकारण-भावावरती आधारलेले होते. या दुराग्रही लोकांचा युक्तिवाद असा असायचा : शूद्र कुळात एक तरी पंडित, एक तरी कवी, एक तरी शास्त्रज्ञ निघाला आहे काय ? या युक्तिवादातला कार्यकारणभाव स्पष्टपणे

चुकीचा आहे. कोणत्याही व्यक्तीच्या गुणविकासाला संधी दिल्याशिवाय गुणांचा आविष्कार होणे शक्य नाही. शूद्रांना अशी संधी पूर्वी कधीच दिली गेली नाही. म्हणून या उदाहरणात जो निष्कर्ष काढलेला दिसतो त्यात चुकीचा कार्यकारणभाव कल्पिलेला आहे.

चुकीच्या कार्यकारणभावावर आधारलेल्या निष्कर्षांची उदाहरणे समाजजीवनात किती तरी लहान मोठ्या बाबतीत बघायला मिळतात. एका व्यक्तीच्या गुन्ह्यासाठी सबंध जातीला किंवा समाजाला जबाबदार समजून त्याचा छळ केला जातो. व्यक्तीच्या गुन्ह्यासाठी सबंध समाजाला गुन्हेगार समजणे यात काही तर्कशास्त्र असेल तर ते लहान मुलाचे तर्कशास्त्र आहे. कारण मुले केवळ परिणामांचे मोजमाप घेऊन, हेतूंचा विचार न करता, ढोबळ निष्कर्ष काढतात.

**निष्कर्ष पडताळून पाहाणे**

वैज्ञानिक विचारपद्धतीला ज्यामुळे वस्तुनिष्ठता प्राप्त होते असे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे, पुराव्यावरून काढलेले निष्कर्ष पडताळून पाहाणे, सूचित सिद्धान्तात आवश्यक असेल तर फेरफार करणे वा भर घालणे. शास्त्रीय संशोधनात ही गोष्ट कटाक्षाने पाळली जाते. शास्त्रज्ञाला खरेखुरे निर्दोष ज्ञान संपादन करण्याची तळमळ असते. म्हणून आपल्या निष्कर्षांत सुधारणा करण्याची त्याची सदैव तयारी असते. पदार्थविज्ञानशास्त्र हे जास्तीत जास्त बिनचूक निष्कर्ष प्रस्थापित करणारे शास्त्र समजले जाते, तरीहि पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ आपल्या उत्तरात मोजमापाच्या ‘चुकीची शक्यता’ किती आहे हेही सांगतो. खरी शास्त्रीय दृष्टी असलेला शास्त्रज्ञ आपल्याला त्रिकालाबाधित सत्य सापडल्याचा आव कधीच आणीत नाही. काटेकोर अंतिम सत्याकडे जाण्याचा प्रयत्न करणे हीच त्याची भूमिका असते आणि त्यामुळे शास्त्रीय संशोधनात एखाद्या सिद्धान्तात भर घालणे वा फरक करणे असा प्रकार सतत घडत असतो.

गुरुत्वाकर्षणासंबंधी गॅलिलिओने मांडलेल्या सिद्धान्तात न्यूटनने भर घातली आणि आइन्स्टाइनने न्यूटनच्या सिद्धान्तात फरक करून त्याला अधिक व्यापक स्वरूप दिले. न्यूटनचा गुरुत्वकर्षणाचा नियम केवळ जड वस्तूंसंबंधी होता. आइन्स्टाइनने प्रकाशादी इतर शक्ती प्रकारांचाही समावेश या सिद्धान्तात केला.

शास्त्रीय विचारपद्धतीत संवेदित इंद्रियसंवेद्य अनुभवगम्य पुराव्याला महत्त्व असते. इंद्रियांनी विनामदत केलेले निरीक्षण व उपकरणांच्या मदतीने केलेले निरीक्षण या दोन्हींना 'इंद्रियसंवेद्य'च म्हणावे लागेल. पुरावा जमा करण्याची अधिक प्रभावी साधने निर्माण झाली म्हणजे नवीन उपयुक्त पुराव्याची भर पडत असते. पुरावा आणि निष्कर्ष यात सुसंगती असणे ही गोष्ट ज्ञानाच्या सत्यतेच्या दृष्टीने अतिशय आवश्यक असते. शास्त्रज्ञाला यात निर्माण झालेल्या विसंगतीचे एक जरी उदाहरण सापडले तरी तो मान्य सिद्धान्ताविषयी पुन्हा विचार करायला लागतो आणि त्या विसंगतीचा निरास करण्यासाठी मूळ सिद्धान्तात योग्य ते फेरफार करतो, व पुरावा आणि निष्कर्ष यात नव्या पातळीवर योग्य तो कार्यकारणभाव प्रस्थापित करतो. शास्त्रज्ञाची ही वस्तुनिष्ठ विचारपद्धती असल्यामुळे अमूक एका बाबतीत मला अंतिम सत्य गवसले आहे असा त्याचा दावा नसतो, तर 'अमूक अमूक पुराव्यावरून आता असा निष्कर्ष निघतो म्हणून या बाबतीत हे सत्य असावे असे मला वाटते' अशी त्याची अनाग्रही आणि वस्तुनिष्ट भूमिका असते. सत्याच्या जवळ जाणाऱ्या शास्त्रज्ञाची भूमिका नम्र आणि अनाग्रही असते; तर, या उलट, आपलेच सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञान बरोबर, आपलेच मत रास्त असा आग्रह आणि अभिनिवेश राजकारणी लोकांच्या व समाज नेत्यांच्या ठिकाणी बघायला मिळतो.

वैज्ञानिक विचारपद्धतीची वैशिष्ट्ये कोणती आहेत हे आपण पाहिले.

या विचारपद्धतीवर धर्मनिष्ठ साक्षात्कारवादी लोकांचे काही आक्षेप आहेत. त्यांचा आपण येथे विचार करू.

वैज्ञानिक विचारपद्धतीवर ज्यांना आक्षेप घ्यावयाचा असतो असे आध्यात्मिक प्रवृत्तीचे साक्षात्कारवादी शास्त्राच्या या सत्यसंशोधनाच्या पद्धतीकडे साशंकतेने पाहतात. त्यांचा आक्षेप असा असतो की, शास्त्रीय सिद्धान्त डळमळीत असतात; त्यातील सत्य बदलते. असे जर आहे तर अशा अस्थिर शास्त्राने दिलेले ज्ञान प्रमाण मानायचे कसे? या ज्ञानाला अनुसरून समाजरचना केली तर ती हितकारक कशी होणार? आज जे सत्य म्हणून स्वीकारले जाते, ते उद्या असत्य ठरण्याची शक्यता असते.

शास्त्रीय पद्धतीतील उणीव म्हणून ज्या गोष्टीचा आक्षेपक उल्लेख करतात ती गोष्ट वस्तुतः या पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे आणि यथार्थ ज्ञान मिळविण्याची निष्ठाच त्या द्वारा व्यक्त होते. जे सिद्धान्त निरपवादपणे सिद्ध झालेले नाहीत ते स्वीकारण्याचा आग्रह शास्त्र करीत नाही. आक्षेपक सुचवितात त्याप्रमाणे सगळे शास्त्रज्ञान काही अस्थिर नाही. भौतिक शास्त्रेच विचारात घेतली तर गति, विद्युत्, रसायन, वैद्यक इत्यादि शास्त्रांतील काही सिद्धान्त पूर्णपणे प्रस्थापित केले गेलेले आहेत असेच म्हणावे लागेल आणि त्याबाबतचा पुरावा म्हणून या ज्ञानाचा उपयोग करून निर्माण केलेल्या रेडिओ, विमान, चलच्चित्रपट, दूरचित्रवाणी, इत्यादि गोष्टींकडे बोट दाखविता येईल.

मानवसमाजविषयक शास्त्रांचा उदय होऊन फार काळ लोटलेला नाही. तरीही या शास्त्रांनी जे ज्ञान प्राप्त करून दिलेले आहे ते धर्मग्रंथांच्या तुलनेने प्रचंड आहे. मानवसमाजविषयक काटेकोर अचूक ज्ञान आज प्राप्त झालेले आहे असा या शास्त्रांचाही दावा नाही. त्या दिशेने शास्त्रज्ञांचा प्रयत्न चाललेला आहे. या ज्ञानात फरक पडत आहे, भर पडत आहे, हीच गोष्ट सत्य ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीने आशादायक आहे.

शास्त्रज्ञानाच्या प्रामाण्यावर आक्षेप घेणाऱ्या धार्मिकांना सुचवायचे असते ते हे की, ही भौतिक शास्त्रे अद्याप बाल्यावस्थेत आहेत. म्हणून या शास्त्रावर न विसंबता स्थिर, प्रगल्भ अशा धर्मशास्त्रावर विसंबून असावे. आपल्या आचरणाला आधार धर्मशास्त्राच्या ज्ञानाचा आणि आदेशाचा असावा. स्थिरतेचा मुद्दाच जर विचारात घेतला तर असे दिसून येईल की, धर्मशास्त्रातही वारंवार बदल होत गेले आहेत. वेग-वेगळ्या धर्मशास्त्रात मतैक्याची स्थळे फार थोडी दाखविता येतील. सगळ्या धर्मशास्त्रांनी एकच ज्ञान दिले असे काही म्हणता येणार नाही. म्हणून अखिल मानवाच्या उन्नतीसाठी धर्मशास्त्र प्रमाण आहे असे मानता येत नाही. धर्मशास्त्र प्रमाण मानावयाचे ठरविले तर या जगाच्या पाठीवर जितके म्हणून धर्म आहेत तितक्या भिन्न प्रकारचे ज्ञान आणि आचरण मानव समूहांना प्रमाण मानावे लागेल. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की, धर्मशास्त्र वादातीत असे ज्ञान देऊ शकत नाहीत; अबाधित असे आचरणाचे नियम सांगू शकत नाही. शास्त्रज्ञानाला निश्चितता, काटे-कोरपणा असतो. रसायन, पदार्थविज्ञान, इत्यादी शास्त्रांचे एकच ज्ञान सर्वत्र मान्य होते.

आपल्या सनातन हिंदूधर्माचा विचार केला तर त्यातील आध्यात्मिक ज्ञान तरी स्थिर राहिल्याचे दिसते काय ? इंद्र-वरूणादी देवता प्रमाण मानल्या; सगुण परमेश्वररुप कल्पिले; निराकार निर्गुण परमात्मा महत्त्व पावला. आत्मा व परमात्मा यांचे अद्वैत मानले गेले, त्याचप्रमाणे द्वैतही मानले गेले. त्या परम-तत्त्वाची प्राप्ती कशी करून घ्यायची याबद्दल भक्ती, योग, इत्यादी भिन्न भिन्न मार्ग सांगण्यात आले. तात्पर्य, ज्ञानाच्या बाबतीत अनेक स्थित्यंतरे झालेली दिसतात.

आचरणाबाबत धर्मशास्त्राने जे आदेश दिले त्यातही फरक पडत गेले. विशिष्ट गाईचे मांस खाणे हा एकेकाळी धर्म होता तर

नंतरच्या काळात ते महापाप ठरले. अशी अनेक उदाहरणे आपल्याला सापडू शकतात.

धर्मशास्त्रात झालेले बदल आणि शास्त्रीय सिद्धान्तात होणारे फरक यात महत्त्वाचा भेद आहे. शास्त्रज्ञ सिद्धान्तात जो बदल करतात तो ज्ञान जास्तीत जास्त परिपूर्ण व्हावे यासाठी; परंतु धर्मशास्त्रात झालेले बदल हे सहेतुकपणे झाल्यासारखे दिसत नाहीत. वस्तुतः मनुष्य-जातीच्या ऐहिक आणि पारलौकिक उन्नतीसाठी नियम सांगणारे शास्त्र म्हणजे धर्मशास्त्र. इथे पारमार्थिक विचार आपण बाजूस ठेवू आणि ऐहिक उन्नतीचाच विचार करू. धर्मशास्त्राला मानवाची ऐहिक उन्नती करावयाची असेल तर त्याची उभारणी समाजशास्त्रावर वा समाजाच्या यथायोग्य ज्ञानावर होणे इष्ट असते. तसे झाले असते तर धर्मशास्त्रातील ज्ञानाची अथवा बदलाची दिशा योग्य होती असे म्हणता आले असते; परंतु असे घडल्याचे दिसत नाही. काही राजे लोक अत्यंत क्रूर, दुराचरणी, स्वार्थांध आणि भोगलोलुप आहेत हे पाहिल्यावर धर्मशास्त्राने राजा हा ईश्वराचा अंश आहे, हे मत बदलायला पाहिजे होते. शूद्र वर्गात कर्तबगार, बुद्धिमान व्यक्ती जन्मास येतात हे पाहिल्यावर त्यांच्या-वरचे निर्बंध काढून टाकावयास पाहिजे होते. परंतु धर्मशास्त्राची ही दृष्टीच नव्हती असे म्हणावे लागते. धर्मशास्त्रात बदल होत गेले; परंतु ते वस्तुनिष्ठ ज्ञानावर आधारलेले नव्हते.

**अनुभवनिष्ठ पुराव्यावर ग्रंथप्रामाण्यवाद्यांचा आक्षेप**

पुरावा इंद्रियगम्य, अनुभवनिष्ठ असणे आवश्यक आहे, हे वैज्ञानिक विचारपद्धतीचे एक वैशिष्ट्य आपण विचारात घेतले आहे. धर्मनिष्ठ लोकांचा या वैशिष्ट्यावर पुढील आक्षेप आहे : ज्या इंद्रियगम्य अनुभवा-वर वैज्ञानिक विचारपद्धतीचा भर आहे तो अनुभवच प्रमाण मानता येत नाही. ज्ञानेंद्रिये वस्तूंचे यथार्थ दर्शन घडवितीलच असे नाही.

डोळ्याला अंधारात एक दिसते,उजेडात दुसरे दिसते. वालुकामय प्रदेशात पाणी नसताना पाण्याचा भास होतो. दोरीच्या ठिकाणी सर्पाची भ्रांती होते. म्हणजे वस्तू जशी आहे तशी दिसेलच याची खात्री देता येत नाही. ढोबळ गोष्टींचे आकलन करायलाही ही ज्ञानेंद्रिये असमर्थ आहेत; मग गूढतर सत्ये कळण्याच्या दृष्टीने ही ज्ञानेंद्रिये उपयोगी कशी पडणार ? म्हणून ज्ञानासाठी अंतःप्रेरणेवर विसंबणे योग्य.

या आक्षेपात फारच थोडे तथ्य आहे. आक्षेपक जी उदाहरणे घेतात ती एकान्तिक स्वरूपाची असतात. या आक्षेपाचा फोलपणा आपणास दाखवून देता येतो. ज्ञानेंद्रिये जे ज्ञान देतात ते यथार्थ आहे किंवा नाही हेही आपणास ज्ञानेंद्रियांच्या द्वाराच ठरविता येते. वालुकामय प्रदेशात उन्हाच्या वेळी पाण्याचा आभास होतो; तिथे पाणी नसते हे आपण प्रत्यक्ष अनुभवाने ज्ञानेंद्रियाच्या आधारेच ठरवितो. अंधारात वस्तू नीट दिसत नाही, हे समजलेले असल्यामुळे आपण प्रकाशाची योजना करतो. अंधारात वस्तू जशी दिसते तशीच ती आहे, असे आपण समजत नाही; आणि हा सावधपणा देखील आपल्याला इंद्रियानुभवाच्या द्वाराच आलेला असतो. एवढेच नव्हे तर ज्ञानेंद्रियाची शक्ती वाढविण्याचेही प्रयत्न शास्त्रज्ञांनी केलेले आहेत. लाखो मैल दूर असलेला चंद्र दुर्बिणीच्या साहाय्याने कासराभर अंतरावर असल्यासारखा दिसतो; त्याच्या वरच्या दऱ्या-पर्वत आपल्याला डोळ्यांनी पाहता येतात. चंद्रावर हरणाचे पाऊल उमटल्यामुळे तो कलंकित दिसतो, हे पुराणातले ज्ञान खोटे ठरते. सूक्ष्मातिसूक्ष्म जंतू सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साह्याने दहाहजारपट मोठा दिसतो, देवीचा जंतू आपल्याला डोळ्यांनी पाहता येतो व या जंतूंमुळे रोगाचा प्रादुर्भाव झाला हे सांगता येते. एखाद्या देवीचा प्रकोप होऊन रोग निर्माण झाला ही समजूत मग खोटी ठरते.

इंद्रियांच्या द्वारा येणारा अनुभव हा सर्वांना सारखा येतो, हे त्यांच्या

विश्वसनीयतेचे महत्त्वाचे प्रमाण आहे. चांगली दृष्टी असणाऱ्या हजारो माणसांनी एकच गोष्ट पाहिली तर तिच्या स्वरूपाबद्दल त्यांच्यात मतभेद होत नाहीत. यासाठी अशा इंद्रियनिष्ठ अनुभवाचा आधार घेऊन पुढचा विचार करणे युक्त ठरते.

**वैज्ञानिक विचारपद्धती आणि साक्षात्कारी मार्ग**

सत्यसंशोधनाच्या व वैज्ञानिक विचारपद्धतीचा अवलंब करण्याच्या बाबतीत साक्षात्कारी मार्गाचा फार मोठा अडथळा अलीकडच्या काळापर्यंत झाला होता. अंतिम व श्रेष्ठ ज्ञान बुद्धीच्या साहाय्याने होत नसून साक्षात्काराने अतींद्रिय अनुभवाच्या द्वारा प्राप्त होते असे तत्त्वज्ञानात आणि धर्मविचारात मानले गेले. भारतातील आणि भारताबाहेरील धर्मनिष्ठ लोकांची हीच श्रद्धा होती. धर्मसंस्थापकांना आणि विभूतींना असे ज्ञान प्राप्त झाले आहे असा त्यांचा विश्वास होता. जीवनाचे अंतिम व श्रेष्ठ ज्ञान बुद्धीने होत नाही या समजुतीमुळे बुद्धीला ज्ञानसाधनेत गौण स्थान मिळाले. वस्तू व घटना यांच्याबद्दल शास्त्रीय व वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त करून घेण्याचा आग्रह समाजातील बुद्धिमान लोकात राहिला नाही; कारण साक्षात्कारी ज्ञान श्रेष्ठ मानले गेले. याचा दुसराही एक लोकशाहीविघातक परिणाम झाला. साक्षात्कारी ज्ञान हे सर्वांनाच प्राप्त होऊ शकत नाही; ती एक विशेष प्रकारची सिद्धी आहे हे प्रमाण मानले गेल्याने समाजात ज्ञानी, अधिकारी पुरुष व सर्वसामान्य भक्तगण असे दोन वर्ग निर्माण झाले. गुरुसंप्रदाय फोफावत गेला. सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने, वैयक्तिक साक्षात्काराच्या अभावी, परंपरेने चालत आलेल्या व अधिकारी पुरुषांनी निरूपण केलेल्या ज्ञानाचा स्वीकार करणे हाच एकमेव मार्ग उरला. शब्दप्रामाण्य व व्यक्तिप्रामाण्य रूढ झाले. बुद्धिगम्य ज्ञान गौण ठरल्याने भौतिक घटनांचे अनुभवनिष्ठ निरीक्षण व कार्यकारणभावनिश्चिती या गोष्टींकडे दुर्लक्ष होऊ लागले.

विज्ञानाच्या उत्कर्षाला आवश्यक असणारी मनोभूमिकाच तयार होऊ शकली नाही.

साक्षात्कारी ज्ञानमार्गाचे हे स्वरूप ध्यानात घेतल्यावर वैज्ञानिक विचार-पद्धतीची निर्दोषता व श्रेष्ठता पटते. वैज्ञानिक विचारपद्धतीचे फल म्हणून जे ज्ञान उपलब्ध होते ते सर्वांसाठी असते. शास्त्रज्ञ मागील ज्ञान जमेस धरून त्याचा विस्तार करीत असतो. हे ज्ञान आणि ज्ञानपद्धती कोणा-चीही मिरासदारी नसते व मूठभर व्यक्तींनाच ज्ञान होते, ही कल्पना प्रभावी ठरत नाही.

**विवेकवादाची ऐहिकता**

विवेकवादाने पूर्णपणे ऐहिक दृष्टिकोण स्वीकारलेला असल्यामुळे त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणून सत्याचा निणय करण्यासाठी वस्तुनिष्ठ अशा वैज्ञानिक विचारपद्धतीचा अवलंब केलेला आहे. ऐहिकतेचा अर्थ असा की, विवेकवाद पारमार्थिक ध्येय आपल्या डोळ्यासमोर ठेवीत नाही; तर इहलोकीच्या मानवी जीवनाचाच विचार करतो. मनुष्य मृत्यू पावल्या-नंतर त्याला स्वर्गप्राप्ती कशी होईल, मोक्ष अथवा निर्वाण कसे मिळेल, हा विचार विवेकवादाच्या दृष्टीने भ्रामक ठरतो, कारण जी गोष्ट अनुभव-गम्य नाही तिचे अस्तित्वच विवेकवाद मान्य करीत नाही. मनुष्य गेल्या-नंतर त्याचे काय व्हावे याचा विचार न करता माणसाने सुखाने, सदा-चाराने चांगले जगावे कसे हा विचार विवेकवादाचा विषय आहे.

पारमार्थिक ध्येय डोळ्यासमोर ठेवल्याने माणसाची ऐहिक दृष्ट्या उन्नती तर झाली नाहीच; उलट अनेक मुखांनी त्याची परागती झाली. त्याच्या ठिकाणी उदात्त गुणांचा प्रादुर्भाव तर झाला नाहीच; उलट अनेक वेळा तो माणुसकीला मुकला. त्याला ज्ञानाची प्राप्ती तर झाली नाहीच; उलट अधिकाधिक अज्ञानाची पटले त्याने स्वतःभोवती निर्माण केली व प्रगतीचा मार्ग अधिक कठीण केला. ऐहिकाची अवहेलना व

परमार्थाची उपासना करून मानवी जीवन अधिक शृंखलाबद्ध झाले होते, हा सोळाव्या शतकापर्यंतचा मानवजातीचा इतिहास आहे. म्हणून विवेकवाद पारलौकिकाचा विचार त्याज्य समजून माणसाच्या ऐहिक जीवनाचा विचार करायला प्रवृत्त झाला.

मनुष्याच्या व्यक्तित्वाचा विकास व्हावा आणि त्याला अनेक परींनी समृद्ध जीवन जगावयाला मिळावे, हे विवेकवादाचे उद्दिष्ट आहे. जीवन समृद्ध व्हावयाचे असेल तर त्यासाठी चांगले, इष्ट आचरण करणे आवश्यक आहे. चांगले आचरण करण्यासाठी त्याला चांगले आचरण कोणते हे समजणे आवश्यक असते आणि ते सत्य वैज्ञानिक विचारपद्धतीचा अवलंब केल्यानेच समजू शकते. म्हणून विवेकवादाची सत्य निर्णयाची ही वस्तुनिष्ठ, ऐहिक, वैज्ञानिक पद्धती आहे.

# ४ विवेक आणि सदाचरण

विवेकबुद्धीला महत्त्वाचा निर्णय घ्यावयाचा असतो तो आचरणाच्या, विवेकबुद्धीच्या दृष्टीने चांगले आचरण कशास म्हणावे या बाबतीत. विवेकवाद चांगल्या आचरणाच्या बाबतीत कोणते मार्गदर्शक मूल्य सांगतो याचा विचार आपण या प्रकरणात करू.

## नैतिक विचाराच्या मुळाची विवेकबुद्धी

मानवी समाजाच्या स्थैर्यासाठी, मानव जातीच्या हितासाठी माणसांनी चांगले, योग्य प्रकारचे आचरण करावे, असे नीतिशास्त्र सांगते. अर्थातच, कोणत्या प्रकारचे आचरण चांगले ? चांगले, योग्य, कर्तव्य अशा संज्ञांचा अर्थ काय ? या संज्ञांचा वापर कशा प्रकारे केला जातो ? इत्यादी प्रश्नांचा विचार नीतिशास्त्रज्ञ करीत असतात. चांगले-वाईट, हितकारक-अहितकारक, योग्य-अयोग्य काय आहे, याचा निवाडा करण्याचे काम माणसाची विवेकबुद्धी करीत असते.ही विवेकबुद्धी जितकी प्रगल्भ असेल तितक्या प्रमाणात तिचा निवाडा योग्य ठरत असतो. म्हणून आचरणाच्या क्षेत्रात कार्य करणारी विवेकबुद्धी ही नैतिक कृत्याच्या मुळाशी असणारी नैतिक प्रेरणा होय. जे विवेकशील असते ते नैतिक असते. आचरणाच्या क्षेत्रातील विवेकबुद्धीचा विषय आणि नीतिशास्त्राचा विषय एक होय.

## नैतिकतेचा दुसरा अर्थ

श्रेष्ठ नीतिमूल्यांचा विचार आणि विवेकवादाचा विषय हे एकरूप असतात. असे जरी असले तरी 'नैतिक वागणे' या शब्दप्रयोगाचा वापर संकुचित अर्थानेही केला जातो. नैतिकतेच्या कल्पना स्थल-काल परिस्थितिसापेक्ष असतात, कालांतराने त्यात बदल होत जातो असे आपणास दिसते. तीन चार हजार वर्षांपूर्वी आर्यावर्तात ज्यावेळेस मनुष्य-बळाची अधिक जरूरी होती त्या वेळी एखाद्या स्त्रीचा पती दिवंगत झाला तर तिने दिरापासून प्रजोत्पत्ती करून घ्यावी ही गोष्ट नीति-संमत होती. नंतरच्या काळात ही मान्यता राहिली नाही. काही रानटी टोळ्यात स्त्रीला अनेक पती असणे ही गोष्ट नैतिक गणली जाते. सुधारलेल्या देशात तीच गोष्ट अनैतिक ठरल्यावाचून राहणार नाही. मुसलमानी धर्मात एका पुरुषाने अनेक बायका करणे ही गोष्ट नीतिसंमत आहे, तर ख्रिश्चन धर्मात हीच गोष्ट नीतीविरुद्ध समजली जाते. तात्पर्य, काही नीतिकल्पना स्थलकालपरत्वे बदलणाऱ्या असतात. म्हणून आजचे नीतिशास्त्र 'कोणकोणते आचरण चांगले' हे सांगण्याचा प्रयत्न करीत नाही; तर 'अमुक एक वागणे चांगले' अशा प्रकारची विधाने करताना 'चांगले' म्हणण्यात आपला अभिप्राय काय असतो, या प्रश्नाचा विचार करीत आहे. 'चांगले,' 'इष्ट', 'कर्तव्य', इत्यादी संज्ञांचा अर्थ काय हे पाहण्याचा प्रयत्न करीत आहे व अशा प्रकारे अधिक व्यापक बनू पाहात आहे. मग या पातळीवरून विचार करणारे नीतीशास्त्र व विवेकवाद यांचा विषय एक होतो. चांगले कशास म्हणावे? चांगल्याचा निर्णय कसा करावा? याच प्रश्नांचा विचार विवेकवादास प्रस्तुत आहे.

## वस्तुनिष्ठता व मूल्यनिष्ठता

विवेकशील मनुष्य चांगल्या आचरणाचा निर्णय कसा घेतो? केवळ

' मला चांगले वाटते ' अशी त्याची आत्मनिष्ठ भूमिका नसते. चांगल्या आचरणाचा निर्णय म्हणजे काही वैयक्तिक रुचीचा प्रश्न नव्हे. विवेकशील माणसांच्या वर्तनात काही एक समानता दिसते. याचाच अर्थ चांगल्या आचरणाचा निर्णय वस्तुनिष्ठपणे घेतला जातो; चांगल्या आचरणाचे काही एक मार्गदर्शक तत्त्व विवेकवादाने प्रमाण मानले आहे.

वस्तुनिष्ठता हे विवेकवादी निर्णयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ज्ञानाच्या क्षेत्रातील सत्ये वस्तुनिष्ठ पुराव्यावरुन शोधलेली असतात. म्हणून त्या सत्याचा प्रत्यय जगात कोणत्याही स्थळी-काळी येत असतो. गुरुत्वाकर्षणाचा नियम न्यूझीलंडमध्ये एक व मालदीव बेटात वेगळा असे घडत नाही. तपमान वाढून हवा विरळ झाली म्हणजे आजूबाजूचे वारे कमी दाबाच्या पेट्यात घुसतात हे सत्य सर्वत्र अनुभवास येणारे आहे. हैड्रोजनचे दोन व ऑक्सिजनचा एक परमाणू यांचे एकत्र येणे कुठेही घडले तरी त्यापासून पाण्याचा एक अणू निर्माण होणारच. शास्त्रीय सत्यांना जी सार्वत्रिक निरपवादता प्राप्त झाली आहे तिचा मूळ आधार म्हणजे वस्तुनिष्ठता. ' चांगले ' म्हणजे काय ? या संबंधीचा विचार जर जास्तीत जास्त वस्तुनिष्ठपणे करता आला तरच त्याला सार्वत्रिकता लाभू शकेल.

प्रथम वस्तुनिष्ठ विचार म्हणजे काय ते पाहू. वस्तुनिष्ठ विधान अथवा मन हे एखाद्या व्यक्तीच्या भावना, पूर्वग्रह अथवा कोणत्याही व्यक्तीविशिष्ट गोष्टीवर आधारलेले नसते, तर ते व्यक्तीनिरपेक्ष प्रत्यक्ष वस्तुस्थितीवर आधारलेले असते. परिस्थितीचे आकलन जर यथार्थ झालेले असेल तर ते विधान बरोबर ठरेल; आकलन अपुरे अथवा चुकीचे असेल तर ते विधानही चूक ठरेल. ' नदीला पूर आलेला आहे ' हे विधान कोणी त्राग्याने किंवा सभयतेने उच्चारील. त्या माणसाची मोटर अडकून पडल्याने खोळंबा झाला असेल किंवा नदीकाठी त्याचे घर असल्याने त्याला काळजी वाटत असेल. हे विधान करताना त्याच्या काही भावनाही

व्यक्त होतील. या माणसाला जर आपण विचारले की कशावरून तुम्ही म्हणता पूर आला आहे, तर तो ' मला संताप आलेला आहे ' किंवा ' मला फार भीती वाटते ' अशा प्रकारचे उत्तर देणार नाही. एखाद्या घटनेचे कारण म्हणून आपल्या भावनांचा किंवा वाटण्याचा उल्लेख करणार नाही; तर प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे (म्हणजे पाणी वाढले आहे, इत्यादी ) याचा तो उल्लेख करील. या उदाहरणात विधानाच्या अनुषंगाने भावना व्यक्त होतात हे खरे; परंतु विधानाचा आधार या भावना नव्हेत, तर प्रत्यक्ष वस्तुस्थितीतील घटक आहेत.

चांगले काय ? याचा निर्णय वस्तुस्थितीचा आधार घेऊन करता आला तरच तो विवेकशुद्ध, वस्तुनिष्ठ विचार ठरेल. अमूक एक वागणे चांगले का या प्रश्नाचे उत्तर देताना ' मला तसे वाटते ', ' वडिलांनी मला तसे सांगितले ' किंवा ' माझा आतला आवाज तसे सांगतो ' अशा प्रकारे विचार केला तर तो आत्मनिष्ठ होईल.

आचरणासंबंधीचा निर्णय अखेर एका व्यक्तीने घेतलेला निर्णय असतो. परिस्थितीचे आकलन त्या व्यक्तीनेच केलेले असते. म्हणून चांगल्या आचरणासंबंधीचा निर्णय तात्त्विक दृष्ट्या, अंशतः का होईना, आत्मनिष्ठ राहणारच; परंतु वस्तुस्थितीचा विचार न करता केवळ ' मला वाटते ' या भूमिकेवरून विवेकवादी मनुष्य निर्णय घेत नसल्याने त्याचा निर्णय–वरील तात्त्विक अंश वगळता–आत्मनिष्ठ नसतो. परिस्थितीतील वास्तव घटकांचा त्याच्या निर्णयावर परिणाम झालेला असल्याने तो वस्तुनिष्ठ असतो.

परंतु केवळ परिस्थितीचे यथार्थ आकलन झाल्याने आचरणाचा निर्णय होत नाही. ते आकलन निर्णयाला आधारभूत असते. हे आकलन झाल्यावर ' अमूक वागणे चांगले ठरेल का ? ' असा तो विचार करतो. म्हणजेच आचरणाला तो चांगलेपणाचा निकष लावीत असतो. 'चांगले' कशास म्हणावे याबद्दलची त्याची जी कल्पना असते तिच्या आधारे,

म्हणजेच या मूल्याच्या आधारे तो विशिष्ट निर्णय घेत असतो. म्हणजे विवेकशील माणसाचा निर्णय मूल्यनिष्ठही असतो. सारांश, विवेकवादाचा आचरणाचा निर्णय आत्मनिष्ठ नसतो; तर तो वस्तुनिष्ठ व मूल्यनिष्ठ असतो.

विवेकशील आचरण मूल्यनिष्ठ असते एवढे म्हटल्याने पुरेसा अर्थ स्पष्ट होत नाही. कारण अनेकांची मूल्यकल्पना ही विपरीत असते. काहींच्या मते वंशश्रेष्ठत्व सत्तासंपादन, द्रव्यार्जन हीही मूल्ये असू शकतात म्हणून विवेक चांगल्या मूल्यांचा निवाडा करीत असतो. चांगले आचरण हे विवेकाचे उद्दिष्ट असते.

**व्यापक मार्गदर्शक तत्त्व**

विवेक दृष्टया ' चांगले ' या संज्ञेचा अर्थ पाहणे आवश्यक ठरते. भौतिक घटनांचा विचार केला तर असे दिसते की त्या त्या घटनेत अंतर्भूत असणाऱ्या घटकांचे वर्तन ठराविक प्रकारे घडत असते. म्हणून खगोल, पदार्थविज्ञान, इत्यादि शास्त्रांतील नियम निरपवादपणे खरे ठरतात. मानवी आचरणासंबंधी असे नियम बांधणे शक्य आहे काय ? भौतिक शास्त्रात असतात त्या प्रकारचे निरपवाद नियम बांधणे व त्याप्रमाणे आचरण करणे अशक्य आहे. मानवी समाजातील परिस्थिती बदलत असते. माणसाचे आचरण काही नियमांनी बद्ध नसते. हेतूंची भिन्नता असते. परिणामात अनपेक्षितता असते. ज्या परिस्थितीत आचरण करावयाचे असते ती परिस्थिती प्रत्येक वेळेस भिन्न असते. म्हणून आचरणाच्या नियमांचे निरपवादपणे पालन करता येणे अशक्य आहे.

चांगले आचरण कोणत्या प्रकारचे असते याबद्दलच्या कल्पना मानव जातीच्या अनुभवातून व्यक्त झालेल्या आहेत. चांगल्या आचरणाचे आदेश बहुतेक धर्मप्रवर्तकांनी दिलेले आहेत. सत्य बोलावे, हिंसा करू नये, दयाभाव बाळगावा, प्रेम करावे, इत्यादि नीतिनियम सद्भावपोषक, सामाजिक गुणांची वाढ करणारे आहेत. या नियमांची आवश्यकता आणि

उपयोगित्व नाकारता येणार नाही. धर्मांचा महत्त्वाचा व उपकारक भाग हाच आहे. परंतु मानवी जीवनातील परिस्थितीत कधी कधी इतकी अनपेक्षितता असते की, अशा नीतिनियमांवर निर्वाह करता येत नाही; अथवा कधी कधी या नीतिनियमांना बाध आणण्यावाचून गत्यंतर उरत नाही. सत्य बोलावे, हे तत्त्व ठीक आहे; परंतु आसन्नमरण रोगी ज्या वेळेस स्वतःच्या प्रकृतीबद्दल विचारतो त्या वेळेस सत्य सांगणे योग्य ठरत नाही. घरात विषारी साप हिंडायला लागला तर अहिंसेचे पालन करणे योग्य ठरत नाही. दुष्टांवर दया करण्यापेक्षा त्याचे दंडन करणेच हितकारक ठरते.

या ढोबळ उदाहरणांवरून लक्षात येते की, चांगल्या आचरणाचे नियम निरपवादपणे अवलंबिता येत नाहीत. हे नीतिनियम व प्रत्यक्ष आचरण यांमध्ये कधी कधी मेळ घालता येत नाही. तेव्हा या विसंगतीचा निरास करणारे, सगळ्या इष्ट नीतिकल्पनांना सामावून घेणारे एखादे व्यापक तत्त्व असणे आवश्यक आहे. वरील नीतिनियमांचे पालन करावे असे म्हणण्यात हेतू असतो तो हा की, हे नियम चांगले आहेत. विशिष्ट परिस्थितीत सत्य बोलावे की, बोलू नये? हिंसा करावी की, करू नये ? याबद्दल मतभेद असू शकतील. परंतु कोणत्याही परिस्थितीत माणसाने चांगले वागावे, याबद्दल मतभेद असत नाही. कोणकोणते वागणे चांगले याची मोजदाद करणे अशक्य आहे. त्यापेक्षा ‘ अमुक वागणे चांगले ’ अशाप्रकारची विधाने करताना, ‘ चांगले ’ या शब्दाने कोणता अर्थ सांगितला जातो, कोणता अभिप्राय व्यक्त केला जातो हे पाहणे अधिक उपयुक्त ठरते. ‘ चांगले ’ या संज्ञेचा अर्थ म्हणजेच विवेकवादाचे समावेशक, व्यापक तत्त्व होय.

**अर्थनिश्चितीची आवश्यकता**

आचरणाबाबतचे विवेकवादाचे मत वस्तुनिष्ठ असावयास पाहिजे

'चांगले' या संज्ञेचा अर्थ म्हणजेच जर विवेकवादाचे आचरणविषयक व्यापक तत्त्व ठरणार असेल तर 'चांगले' या संज्ञेच्या अर्थाला जास्तीत जास्त निश्चितता देता येते काय, हे आपणास पाहावे लागेल.

'आपण स्वतःवर करतो तसेच आपल्या बांधवांवर प्रेम करणे चांगले' असे जर कुणी विधान केले, तर त्यावर प्रश्न विचारता येतो 'हे चांगले का ?' प्रेम करण्यात काही मानसिक, सामाजिक घटक समाविष्ट असतात. प्रेम करण्यात विशिष्ट व्यक्तीच्या मनाची वृत्ती प्रकट होत असते हा मानसिक घटक. त्याचप्रमाणे प्रेम करण्यात आपला जो इतरांशी संबंध आहे त्याची जाणीव, आपण इतरांशी कसे वागावे याबद्दलची कल्पना व्यक्त होत असते हा सामाजिक घटक. व्यक्तीच्या मनाची वैशिष्ठ्ये व इतरांशी असलेल्या संबंधांची जाणीव या दोन घटकांचा निर्देश मानसिक-सामाजिक घटक या शब्दाने करता येतो. 'प्रेम करणे चांगले का' या प्रश्नाचे उत्तर देताना 'अशा प्रकारे प्रेम करण्यात मनाचा मोठेपणा, प्रगल्भता दिसून येते. आपण अशा प्रकारे प्रेम केले तर इतरही आपल्यावर प्रेम करतील व आपले जीवन सुखावह होईल' असे सांगावे लागते. 'इतरांना मदत करणे', 'खरे बोलणे' इत्यादी सर्वच कृत्यांबद्दल 'हे चांगले का ?' अशा प्रकारचा प्रश्न विचारता येतो. प्रत्येक आचरणात कोणते ना कोणते मानसिक-सामाजिक घटक असतात. वरील प्रकारे प्रश्न करताना, मानसिक-सामाजिक घटकांहून चांगलेपणा, इष्टता या गोष्टी भिन्न आहेत, असे गृहीत धरण्यात येते. म्हणजे, चांगलेपणा ही जणू काय स्वतंत्रपणे अस्तित्वात असणारी गोष्ट आहे, असे समजावे लागेल ,आणि कोणत्याच मानसिक-सामाजिक घटकांचा नैतिक संज्ञांमध्ये (चांगलेपणा, इष्टता, कर्तव्य, इ.) समावेश करता येणार नाही. नैतिक संज्ञांचा अर्थ आणि आचरणात समाविष्ट असणारे सामाजिक-मानसिक घटक यात आपण असाच फरक करीत

राहिलो, तर नैतिक अथवा विवेकशील विचार हा कमालीचा आत्मनिष्ठ बनेल; कारण आचरणाची योग्यायोग्यता ठरविणारे व्यापक सूत्र आपल्याला गवसणार नाही; नीतीविषयक विचाराला व्यापकता, वस्तुनिष्ठता, सुसंगती लाभणार नाही. विवेकवादाला शास्त्रीय, तात्त्विक बैठक न लाभता या दृष्टिकोणाच्या उद्दिष्टाचाच पराभव होईल. यासाठी चांगलेपणा आणि काही मानसिक-सामाजिक घटक यांचा मेळ घालता आला तरच या विचाराला जास्तीत जास्त वस्तुनिष्ठता प्राप्त होईल.

## मानसिक प्रगल्भता व सामाजिक जाणीव

'चांगले', 'योग्य', इत्यादी नैतिक संज्ञांच्या विचाराला सुरुवातच वस्तुतः सामाजिक संदर्भापासून करणे आवश्यक आहे. व्यक्तीच्या ठिकाणी मानसिक प्रगल्भता निर्माण होणे, चांगल्या–वाईटाचा विचार स्वतःच्या बुद्धीने करणे, आत्मकेंद्रितता नष्ट होऊन इतरांचा विचार करावयास प्रवृत्त होणे ,म्हणजे विवेकशीलता निर्माण होणे, हे आपण मागील एका प्रकरणात पाहिले आहे. मनुष्य हा विचार करणारा प्राणी आहे व स्वभावतःच तो समाजशील आहे, या दोन वैशिष्ट्यात त्याच्या विवेकशीलतेचा उगम आहे. माणसाच्या मानवी गुणांचा विकास केवळ समाजातच शक्य आहे. या विचारापासून जर आपण सुरुवात केली तर चांगले, योग्य या नैतिक संज्ञांना काही एक अर्थ देणे शक्य आहे. तेव्हा विवेकशीलतेचा उगम सामाजिक संदर्भात आहे हे ध्यानात घेऊन विवेक-दृष्ट्या 'चांगले' या संज्ञेचा अर्थ निश्चित करण्याचा प्रयत्न करू.

## 'चांगले' या संज्ञेचा अर्थ

आपल्या मनातील आशय व्यक्त करण्यासाठी आपण भाषेचा, शब्दांचा वापर करतो. शब्दांचा वापर आपण अगदी काटेकोरपणे करतो असे नाही. भिंतीत खिळा ठोकायचा असेल तर आपण हातोडीसाठी अडून बसत नाही. हाताशी असलेल्या कोणत्याही जड पदार्थाचा आपण

उपयोग करतो. शब्दांच्या वापराचेही असेच असते. अगोदर आठवणारा त्यातल्या त्यात बरा शब्द आपण वापरतो. उच्चारण, संदर्भ यांमुळे ऐकणाराही आपल्या मनातील आशय जाणतो. 'चांगला' या शब्दाचेही असेच आहे. हा शब्द आपण केवळ नैतिक अर्थ व्यक्त करण्यासाठी वापरतो असे नाही. नीतिनिरपेक्ष अर्थानेही हा शब्द वापरला जातो. चांगला रस्ता, चांगले पेन, चांगला चाकू, चांगला दिवस इत्यादी शब्द-प्रयोग नीतिनिरपेक्ष अर्थाने केले जातात. 'चांगला' शब्दाचा नीतिनिरपेक्ष अर्थाने केला जाणारा वापर व नैतिक अर्थाने केला जाणारा वापर या-मध्ये काही एक साधारण धर्म आहे. चांगला चाकू म्हणताना जो चाकू गंजत नाही, कापण्याचे काम आपल्या अपेक्षेप्रमाणे करतो असा चाकू, असा आशय आपल्या मनात असतो. चांगले पेन म्हणताना ज्याच्यामुळे आपल्याला नीट लिहिता येते, डाग पडत नाही, असा काहीसा अभिप्राय आपल्या मनात असतो. तात्पर्य, एखादी वस्तू आपणास जशी असावीशी वाटत असते व आपली ती अपेक्षा पुरी होते, तेव्हा आपण त्या वस्तूबद्दल चांगला हा शब्द वापरतो. एखाद्या वस्तूबद्दलचे अपेक्षित गुणधर्म एकवटून त्या वस्तूच्या आदर्शाबद्दलची कल्पना आपण करीत असतो. आदर्श चाकू, आदर्श पेन अशा कल्पना आपल्या मनात असतात. चाकूची निवड करताना आपल्या आदर्शाच्या कल्पनेशी जुळणारा जो चाकू असेल त्याचीच आपण निवड करतो. नीतिनिरपेक्ष 'चांगला' या शब्दात ही जी आदर्शाची कल्पना आपणास पाहता येते तीच आदर्शाची कल्पना 'चांगले' या नैतिक संज्ञेचा अर्थ निश्चित करतानाही उपयोगी पडते.

आपला आदर्श मनुष्य हा समाजार्तलच आहे. मानसिक-सामाजिक वैशिष्ट्याच्या आधारे त्याचे चित्र कल्पिता येते. ज्यावेळी माणसाची आत्मकेंद्रितता नष्ट होऊन इतरांबद्दलची जाणीव निर्माण व्हायला लागते,

४११०१ ... नोंद ५
१७२०... ४१ ... ९.८१.१९६०

इतरांचा तो आत्मौपम्यबुद्धीने विचार करायला लागतो त्याच वेळी तो विवेकशील व्हायला लागतो. इतरांकडे तो आपली गरज पुरविणारी माणसे या दृष्टीने पाहत नाही. तर आपल्याबरोबर माणुसकीचा अनुभव घेणारी, जीवनाची गुंतागुंत अनुभवणारी, माणुसकीच्या एकाच भावबंधनांनी बद्ध असणारी माणसे आहेत, या दृष्टीने बघतो. सारांश, ' चांगला ' मनुष्य असा शब्दप्रयोग करताना आपण आदर्श माणसाची कल्पना व्यक्त करीत असतो; व त्याचे आदर्शत्व हे वर म्हटल्याप्रमाणे त्याच्या मानसिक वैशिष्ट्यावर व सामाजिक जाणिवेवर आधारलेले असते. चांगलेपणा व ही मानसिक-सामाजिक वैशिष्ट्ये एकरूप असतात. चांगला माणूस पाहून आपण उद्गारतो, ' अशी माणसे समाजात हवीत. ' असे म्हणताना आपल्या मनात, संदिग्ध स्वरूपात का होईना, तो मनुष्य आपला आदर्श आहे, ही कल्पना तरळत असते. त्याच्या ठिकाणी असणारी प्रगल्भता, स्वार्थ ओलांडण्याची वृत्ती आपल्याला पटलेली असते. तसेच होण्याची आपलीही धडपड चाललेली असते.

**चांगले आचरण**

कोणत्या आचरणाला चांगले आचरण म्हणावे हे चांगल्याच्या वरील कल्पनेवरून स्पष्ट होते. आदर्श आचरणाच्या कल्पनेशी जुळणारे आचरण ते चांगले आचरण म्हणता येईल आणि या आदर्श आचरणाचा संबंध वर दाखविलेल्या मानसिक – सामाजिक घटकांशी पोहोचतो. या मानसिक–सामाजिक जाणिवेतून घडणारे आचरण ते चांगले आचरण म्हणता येते.

विवेकबुद्धी ही चांगल्यावाईटाचा विचार करून चांगले वागणे कोणते याबद्दल निर्णय देते. हा चांगलेपणाचा निर्णय केवळ त्या व्यक्ती-च्या दृष्टीने नसतो; तर आपल्या आणि इतरांच्याही दृष्टीने चांगले काय

याचा विचार करून घेतलेला निर्णय असतो. विवेकवादाचा रोख अखिल मानवजातीची सर्वांगीण समृद्धी करण्याकडे आहे. प्रत्येक व्यक्तीचे आचरण या ध्रुव ताऱ्याकडे दृष्टी ठेवून घडणे आवश्यक आहे. विवेकवाद हा एकान्तिक व्यक्तिवाद नाही की निरंकुश सुखवाद नाही. विवेकवादी दृष्टिकोणात व्यक्तीच्या विकासाचा विचार सामाजिक संदर्भात केलेला असतो. इतरांच्या काय गरजा आहेत, अपेक्षा आहेत, इतरांबद्दल आपली काय कर्तव्ये आहेत या जाणिवांचा समावेश विवेकशीलतेत होतो. तात्पर्य, आत्मकेंद्रिततेचे सामाजिक जाणिवेत रूपांतर होणे, तात्कालिक स्वसुखाच्या मर्यादा ओलांडून व्यापक, विश्वात्मक पातळीवर जाणे म्हणजे विवेकशील होणे. इतरांकडे बघण्याची ही वृत्ती हे विवेकशीलतेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. चतुर वागणे व विवेकशील वागणे यात फरक पडतो तो इतरांबद्दलच्या वृत्तीमुळे. इच्छित हेतू साध्य करण्यासाठी अनुकूल, फलदायी साधनांचा अवलंब चतुर वागण्यात केला जातो. दरोडा घालणे, खून करणे या कृतींमध्ये गुन्हेगार बुद्धी वापरतो, तर्कशुद्ध विचार करतो. गुन्हेगाराचे हे कृत्य चातुर्ययुक्त असते; परंतु विवेकशील नाही. आपण ते विवेकदृष्ट्या अतिशय निंद्य समजू. कारण गुन्हेगारांनी केवळ आत्मकेंद्रित, स्वार्थी विचार केलेला असतो. इतरांच्या जिवाची, संपत्तीची पर्वा केलेली नसते. विवेकशील वागण्यात आणि चतुर वागण्यात परिस्थितीचे आकलन यथायोग्य असते. विवेकशील वागण्यात इतरांचा आत्मौपम्य बुद्धीने विचार केलेला असता. चतुर वागण्यात तसा तो केलेला असेलच असे म्हणता येत नाही.

### विवेकवादाची सर्वव्यापकता

परिस्थितीचे यथार्थ आकलन करून निष्ठा, प्रेम, प्रामाणिकपणा, बंधुभाव, औदार्य, इत्यादि नैतिक सद्‌गुणांनी प्रेरित होऊन इतरांशी वर्तन करण्यात विवेकशीलता दिसून येते, असे आपले प्रतिपादन आहे. येथे

असा प्रश्न उपस्थित होतो की हे ‘ इतर ’ कोण? कोणाकोणाचा समावेश या इतरात करावयाचा ? कोणाशी आत्मौपम्यबुद्धीने वागावयाचे याचे उत्तर असे : निदान तात्त्विक दृष्ट्या तरी अखिल मानवजातीचा समावेश या इतरांमध्ये होतो. विवेकवाद हा संपूर्ण मानवजातीच्या आचरणाची दिशा ठरविणारा, सर्व प्रकारच्या वागण्यामध्ये सुसंगती निमाण करणारा सर्वव्यापक विचार आहे.

परस्पर सहकारित्व, निष्ठा, इत्यादी गुण एखाद्या समाजाच्या किंवा समुदायाच्या स्थैर्यासाठी आवश्यक असतात. रानटी टोळ्यांतील व्यक्तींच्या ठिकाणी सुद्धा हे गुण असतात, परंतु या गुणांचा आविष्कार ते फक्त आपल्याच टोळीतील व्यक्तींशी वागताना करतात. परस्पराशी निष्ठेने आणि प्रामाणिकपणाने वागणारे हे लोक संपत्ती लुबाडण्यासाठी निरपराध व्यक्तींचा सहज जीव घेतात. शहरामध्ये गुन्हे करणाऱ्या लोकांचे कंपू असतात. त्या कंपूतील व्यक्ती इतर अज्ञात माणसाचा खून करतील, संपत्ती लुबाडतील; परंतु कंपूतील इतर व्यक्तींशी मात्र प्रामाणिकपणाने, निष्ठेने व सहकार्याने वागतील. या लोकांमध्ये सहकारित्व, प्रामाणिकपणा या गुणांचा आविष्कार होतो तो एका छोट्याशा वर्तुळात; त्यांच्या कंपूतील व्यक्तींशी वागताना सगळ्या मानवी व्यक्तींकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोण एक नाही. कंपूतील व्यक्तींचे एकमेकांशी होणारे वर्तन संघभावनेचे असते; परंतु त्यांचे टोळीबाहेरील इतर लोकांशी घडणारे वर्तन विवेकदुष्ट असते.

समाजातील अनेक व्यक्ती आपल्या कुटुंबियांशी, नातलगांशी जातीतील माणसांशी वागताना त्यांच्या हिताचा विचार करतात. मात्र आपल्या व्यक्तीचे हित करताना असंबंधित इतरांचे अनहित झाले तरी त्यांना पर्वा नसते. ‘ आपल्या ’ व्यक्तीशी वर्तन आणि ‘ इतर ’ व्यक्तींशी वर्तन यांमध्ये तफावत पडते. या दोन्ही वर्तनांत सुसंगती असत नाही. आत्मीय-

तेची दृष्टी इतरांबद्दल विचार करताना असत नाही. एखाद्या राष्ट्रातील व्यक्तींमध्ये परस्पर सहकारित्वाची भावना असेल; राष्ट्रप्रेम असेल, परंतु ते राष्ट्र वर्ण-श्रेष्ठत्वाच्या कल्पनेने वा विशिष्ट राजकीय प्रणालीने भारून जाऊन जर आक्रमक बनले, तर त्या राष्ट्राचे वर्तन एखाद्या दरोडेखोराच्या टोळीसारखेच विवेकदुष्ट आहे असे म्हणावे लागेल. कारण त्या राष्ट्रातील व्यक्तींचा इतरांबद्दलचा विचार त्या राष्ट्रापुरताच मर्यादित राहतो. त्यांच्या विचाराला विश्वात्मक पातळी लाभत नाही.

या उदाहरणाच्या संदर्भातच विवेकवादी दृष्टिकोन कसा व्यापक असतो हे स्पष्ट करता येईल. प्रत्येक व्यक्तीने आपल्या आई-वडिलांवर, कुटुंबावर, देशावर प्रेम करावे, ही गोष्ट युक्त आहे. आपल्या देशावर शत्रूने आक्रमण केले तर ते आक्रमण परतवून लावण्यासाठी प्रयत्न करणे ही गोष्ट विवेकाला धरून आहे; परंतु एखादे वेळेस आपल्या देशाने दुसऱ्या देशावर आक्रमण केले आहे अशी जर सर्व परिस्थितीचा विचार करून आपली खात्री पटली असेल तर विवेकशील व्यक्ती या नात्याने अशा प्रकारे आक्रमण करण्याला विरोध करणे हे आपले कर्तव्य ठरेल. सारांश, विशिष्ट वर्तुळात अथवा मर्यादेत काही सामाजिक सद्गुणांचा आविष्कार केल्याने आचरण विवेकशील ठरत नाही. आपल्या आचरणाचा ज्या ज्या व्यक्तींशी संबंध पोहोचतो त्या सर्वांचा आत्मौपम्यबुद्धीने विचार करून आचरण केले तरच ते विवेकशील, चांगले आचरण ठरते. विवेकवादाचा चांगल्या आचरणासंबंधीचा दृष्टिकोन हा असा सर्वव्यापक आहे. केशवसुतांच्या ‘ नवा शिपाई ’ या कवितेत या विवेकवादी दृष्टिकोनाची सर्वव्यापकता, ‘साकल्यता’ फार चांगल्या तऱ्हेने व्यक्त झालेली आहे. त्यांचा ‘ नवा शिपाई ’ म्हणतो, ‘ जे साकल्याचा प्रदेश आखडतात, व्यापक आहे त्याचा संकोच करतात, ते ‘ पतित ’ होत ’,

**“ जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत,**
**सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;**

कोठेही जा—पायांखाली तृणावता भू दिसते;
कोठेही जा– डोईवरते दिसते नीलांबर ते !
सावलीत गोजिरी मुले,
उन्हात दिसती गोड फुले,
बघता मन हर्षून डुले;
ती माझी, मी त्यांचा – एकच ओघ अम्हातुनि वाहे !
नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे !

पूजितसे मी कवणाला ? तर मी पूजी आपुल्याला,
अपुल्यामध्ये विश्व पाहुनी पूजी मी विश्वाला;
' मी ' हा शब्दच मजला नलगे; संपुष्टी हे लोक
आणुनि तो, निजशिरी ओढिती अनर्थ भलते देख ।
लहान-मोठे मज न कळे,
साधू-अधम हे द्वयही गळे,
दूर-जवळ हा भाव पळे;
सर्वच मोठे–साधू-जवळ, त्या सकली मी भरुनी राहे !"

चांगले आचरण म्हणजे काय यासंबंधी एक गैरसमज मात्र होऊ देऊ नये. इतरांच्यासाठी केवळ स्वार्थत्याग करणे, परोपकार करणे, झिजत राहणे म्हणजेच चांगले आचरण; स्वतःच्या हिताचा, सुखाचा विचार विवेकशील नव्हे; तो स्वार्थी विचार होय; खरीखुरी नैतिकता केवळ स्वसुखाचा त्याग करून इतरांची उन्नती करण्यासाठी झटण्यात आहे,अशी जी कांही जणांची कल्पना दिसून येते ती बरोबर नाही. अशी कल्पना होण्याला बहुतेक धर्मांची शिकवणही कारणीभूत झालेली आहे. मनुष्य स्वतःचे हित स्वाभाविकपणे पाहतोच. ते शिकविण्याची गरज नाही. म्हणून परोपकारादी सद्गुणांची शिकवण धर्मांनी आवर्जून दिली. कालांतराने याहीपुढे जाऊन आत्मक्लेशाला व आत्मनाशालाही सद्गुणाचे स्थान व पावित्र्य प्राप्त झालेले दिसते.

विवेकवादी दृष्टिकोण असा विचार सांगत नाही. इतरांचा विचार आत्मौपम्य बुद्धीने करावा असे विवेकवादी प्रतिपादन आहे. आपण आपल्या विकासाचा, उन्नतीचा, समृद्धीचा जसा विचार करतो त्याचप्रमाणे इतरांचाही करावा. आपले आचरण आत्मकेंद्रित असू नये याचा अर्थ, स्वतःचा विचार करू नये असा नसून तो केवळ आपल्यापुरताच मर्यादित असू नये असा आहे. सामान्यपणे कोणत्याही कृतीचा संबंध कमीअधिक प्रमाणात इतरांशी पोहोचत असतो. म्हणून आपण कृती करताना इतरांचे अहित होऊ नये ही दक्षता घेणे आवश्यक असते. मी श्रीमंत व्हावे यासाठी लबाडी करून इतरांचे नुकसान करणे, माझा फायदा व्हावा यासाठी लबाडीने दुसऱ्याचे नुकसान करणे, मला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी दुसऱ्याची अप्रतिष्ठा करणे ही आत्मकेंद्रित वृत्तीची उदाहरणे होत. अशी आत्मकेंद्रितता असू नये. मात्र स्वतःचा विकास, उन्नती, समृद्धी करणे हे प्रत्येक विवकेशील व्यक्तीचे कर्तव्य आहे. इतरांसंबंधी आपली काय कर्तव्ये आहेत असा जसा आपण विचार करतो त्याचप्रमाणे स्वतःसंबंधी कर्तव्ये काय असाही विचार करीत असतो. एखादा मनुष्य स्वतःच्या आरोग्यासंबंधी, निर्वाहासंबंधी निष्काळजी राहिला तर आपण त्याला दोष देतो. कारण तो स्वतःसंबंधी कर्तव्य पार पाडीत नाही. वस्तुतः ते त्याचे आद्य कर्तव्य आहे. आरोग्य, शिक्षण, नैपुण्य संपादून व्यतीने शारीरिक, मानसिक व बौद्धिक दृष्ट्या स्वतःचा विकास करणे आवश्यक आहे. अशा व्यक्तींमुळेच समाजाचेही हित होते.

शिवाय मी इतरांच्या चांगल्याचा विचार करावा आणि स्वतःच्या चांगल्याचा विचार करू नये, अथवा स्वतःकडे दुर्लक्ष करावे यात विवेकशीलता नाही. तर्कदृष्ट्याही यात फोलपणा दिसेल. इतरांचे हित जसे चांगले तसेच माझेही हित चांगले. खिश्चन धर्मात इतरांवर प्रेम करण्याचा

जो आदेश दिला तो असा " तू स्वतावर करतोस तसेच शेजाऱ्यावरही कर. " तू स्वतःवर प्रेम करू नकोस, नुसते शेजाऱ्यावर कर अशी काही धर्माची मुळात शिकवण नाही.

तात्पर्य, विवेकवादी दृष्टिकोणात केवळ इतरांसंबंधीच्या विचाराला महत्व नाही तर स्वतः संबंधीच्या विचारालाही महत्त्व आहे. किंबहुना 'मी' चा विस्तार होऊन त्यात इतरांचा समावेश व्हावा, मी आणि इतर हा भेदच उरू नये ही अपेक्षा आहे.

◎ - ◎

# ५ विवेक आणि काही प्रश्न

चांगले आचरण म्हणजे काय, त्याची वैशिष्ट्ये कोणती याबद्दल आपण विचार केला. चांगल्या आचरणाच्या संदर्भात जे इतर प्रश्न उपस्थित होतात त्याचा आपण आता विचार करू.

**नैतिक स्वातंत्र्य**

माणसाने चांगले आचरण करावे असे आपण म्हणतो हे ठीक. आपण माणसाची योग्यता त्याच्या कृतीवरून अथवा कृती करण्याच्या हेतूवरून ठरवितो. त्याची कृती काही एका इच्छेने वा संकल्पाने घडत असते; परंतु चांगली–वाईट इच्छा करण्याचे स्वातंत्र्य माणसाला आहे काय ? ते स्वातंत्र्य असेल तरच मनुष्याची नैतिक दृष्ट्या योग्यता ठरविणे शक्य आहे आणि ते स्वातंत्र्य नसेल तर माणसाची नैतिक दृष्ट्या योग्यता ठरविणे शक्य होणार नाही. मग आचरणाच्या परिणामाला अथवा हेतू-लाही महत्त्व देणे योग्य होणार नाही. कारण संकल्प-स्वातंत्र्य हाच नैतिकतेचा गाभा आहे; पण हे स्वातंत्र्य माणसाला खरोखर आहे का ? अशी ही समस्या आहे.

नैतिकदृष्ट्या योग्यता ठरविण्याचा प्रश्न हा संकल्प-स्वातंत्र्य व नियति-वाद ( डिटर्मिनिझम ) यांच्याशी निगडित आहे. या बाबतीत एक दृष्टिकोन असा आहे की, मनुष्य बनतो तो परिस्थितीच्या प्रभावाने आणि परिस्थिती वर त्याचे नियंत्रण नसते. म्हणून माणसाला आपण अमुक वागावे असा

संकल्प वा इच्छा करण्याचे स्वातंत्र्य असते हीच गोष्ट मुळात चूक ठरते. तो जसा बनलेला असतो त्याचप्रमाणे तो वागणार ही गोष्ट अपरिहार्य असते. म्हणून असा निष्कर्ष काढावा लागतो की, मनुष्याच्या कृतीवरून त्याची योग्यता ठरविणे चूक. याच्या विरुद्ध दुसरा दृष्टिकोन असा की, मनुष्याला संकल्पस्वातंत्र्य आहे. त्याची मानसिक घडण वा बाह्य परिस्थिती कशीही असो तो आपल्या इच्छेप्रमाणे वागू शकतो. त्याच्या कृतीला तोच जबाबदार असतो. म्हणून माणसाची नैतिक दृष्टया योग्यता ठरविणे, त्याला चांगला-वाईट ठरविणे शक्य आहे.

मानसशास्त्रातील काही सिद्धान्त बघितल्यावर नियतिवादी विचार बरोबर आहे की काय अशी शंका येणे शक्य आहे. कारण व्यक्तित्वाची घडण अभ्यासताना असे दिसते की, मुलाचे जीवन सुरू होते ते नीती-निरपेक्ष अशा अवस्थेत. मुलाला बाह्य परिस्थितीचे ज्ञान नसते, तीमध्ये फरक करण्याचे सामर्थ्य नसते तेव्हापासूनच त्याचे व्याक्तितत्व घडू लागते. बाह्य परिस्थिती त्याचे व्यक्तित्व घडवीत असते आणि ज्या वयात बाह्य परिस्थितीमध्ये फरक करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी कदाचित् आलेले असेल, त्या वेळेस त्याचे व्यक्कित्व आधीच घडलेले असणार. म्हणून ज्या परिस्थितीत तो जगतो ती बदलण्याची प्रेरणा त्याला होणे कठीण. चांगल्या, नैतिक वागणुकीचे मूळ व्यक्तित्वात असते हे जर मान्य असेल तर माणसाचे नैतिक दृष्टया मूल्यमापन करणे कसे शक्य आहे? कारण आपले व्यक्तित्व विशिष्ट प्रकारे घडविण्याचे स्वातंत्र्य त्याला असते कुठे?

वरील दोन दृष्टिकोणांपैकी, माणसाला संकल्प-स्वातंत्र्य असते हाच दृष्टिकोन आपल्याला स्वीकारावा लागतो. मानसशास्त्रातील सिद्धान्तांचा अधिक बारकाईने विचार केला तर नियतिवादी दृष्टिकोण चुकीचा आहे, हे ध्यानात येते. माणसाला कृती करण्याचे स्वातंत्र्य असते. कारण

त्याला आपल्या इच्छा ज्ञात असतात. इच्छांच्या पाठीमागे असणारी प्रेरणा (मोटिव्हेशन) मात्र अज्ञात असते. इच्छांच्या पाठीमागे असणारी ही प्रेरणा म्हणजे माणसाच्या व्यक्तित्वात असणाऱ्या अनेकविध प्रेरणांचा परिपाक अथवा मेळ होय. एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी ह्या प्रेरणा प्राधान्याने चांगल्या असतील, वाईट असतील वा संमिश्र असतील व प्राधान्याने चांगल्या अथवा वाईट प्रेरणा असणारी माणसे विशिष्ट परिस्थितीत कशी वागतील याचा अंदाज बांधता येतो; परंतु चांगल्या-वाईट प्रेरणांचा मेळ ज्याच्या व्यक्तित्वात झालेला असतो असा माणूस कसा वागेल याचा अंदाज करता येत नाही. मात्र त्याचेही वर्तन त्याच्या व्यक्तित्वातूनच स्फुरत असते.

इच्छा अथवा संकल्प ही व्यक्तित्वापासून वेगळी असणारी स्वतंत्र कार्यशक्ती नाही. उलट इच्छा अथवा संकल्प हा माणसाच्या व्यक्तित्वाचाच आविष्कार आहे. स्वतःच्या विवेकबुध्दीवर विश्वास ठेवणारा मनुष्य सदाचाराचा संकल्प करून चांगले वागतो. अविवेकी माणसाने आपल्या आंतरिक सामर्थ्यांचा विकास केलेला नसल्याने वासनांचा तो गुलाम बनून राहतो. चांगल्या आचरणाचा संकल्प तो करीत नाही.

आपले व्यक्तित्व आपल्या आचरणाचे स्वरूप ठरवीत असते. हा विवेकवादी विचार नियतिवादी असत (डिटर्मिनिस्टिक) नाही. बाह्य परिस्थिती सगळ्याच प्राण्यांना घडवीत असते; परंतु मनुष्य हा एकमेव प्राणी असा आहे की, ज्याच्या ठिकाणी विवेकबुद्धी आहे. कोणत्या शक्ती आपल्यावर प्रभाव पाडतात, आपल्याला घडवितात, हे त्याला कळू शकते. चांगला पुरुष होण्याच्या दृष्टीने आपण कसे असावयास पाहिजे हे त्याला समजू शकते व या आकलनाच्या साह्याने तो स्वतःचे भविष्य घडविताना त्यात सक्रिय भाग घेऊ शकतो. आपल्या दृष्टीने ज्या शक्ती चांगल्या आहेत त्यांचा विकास करून घेऊ शकतो. मानवी जीवनाचे

ध्येय त्याला विवेकामुळे समजते. त्याच्या सिद्धीसाठी आपण कसे असणे आवश्यक आहे हेही त्याला कळते. मनुष्य केवळ परिस्थितीचा दास नाही. आपल्या ठिकाणी असणाऱ्या आंतरिक शक्ती आणि बाह्य परिस्थिती यांना तो वळण लावू शकतो. निदान त्यांवर नियंत्रण ठेवू शकतो.

माणसाच्या जीवनात अनेकदा नीतीदृष्टया वाईट इच्छा निर्माण होतात; परंतु विवेकशील मनुष्य हे मोह टाळतो. अमूक अमूक वागणे वाईट आहे असा विवेक तो करतो व तसे न वागण्याचा नवा संकल्प करतो. वाईट वर्तनापासून परावृत्त होतो. याचाच अर्थ माणसाला संकल्प स्वातंत्र्य आहे. अविवेकी माणसाचा वाईट संकल्प आचरणात रूपांतरित होतो. विवेकी माणसाचे चांगले संकल्प, चांगल्या इच्छा आचरणात उतरतात. चांगले आचरण घडते ते विवेकामुळे. म्हणून माणसाची नैतिक दृष्टया योग्यता ठरविता येते असेच आपल्याला म्हणावे लागेल.

**चांगले का वागावयाचे ?**

माणसाने चांगले का वागावयाचे असाही एक प्रश्न उपस्थित करण्यात येतो. मी केवळ माझ्यापुरता विचार करून का वागू नये ? मी इतरांच्या भल्याचा का विचार करायचा ? माझ्या वासनांची तृप्ती होण्याने मला सुख होत असेल तर इतरांच्या हिताहिताचा विचार मी काय म्हणून करावा ?

आपण असे गृहीत धरू या की, माणसांनी चांगले वागण्याचे सोडून वाईट वागण्याचे ठरविले. इतरांना सहकार्य द्यावयाचे नाही, कशावर निष्ठा ठेवायची नाही, कुणावर प्रेम करायचे नाही. कधी खरे बोलावयाचे नाही, हिंसेचा निषेध पाळगायचा नाही, मग मानवी व्यवहार केवळ अशक्यप्राय बनेल. एवढेच नाही तर मानवी जीवन संपुष्टात येईल. वाईट वागण्यासाठीही मनुष्य जिवंत राहणार नाही. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, चांगले वागल्यावाचून गत्यंतर नाही म्हणून चांगले वागावयाचे.

माणसाने चांगले का वागावे यासाठी धर्माने पारलौकिक कल्पनांचा आधार घेतला. चांगले वागण्यासाठी स्वर्गाचे आमिष दाखविले व वाईट वागणाऱ्याला नरकाचे भय घातले. सदाचरणासाठी आज तरी हा धर्माचा आधार उरलेला नाही.

विवेकवादी या प्रश्नांचा विचार करतो तो काहीही गृहीत न धरता. जीवन जसे आहे तसे वस्तुनिष्ठपणे विचारात घेऊन जगणे ही मूलभूत प्रवृत्ती आहे व जगणे ही गतिमानता व विकास सुचविणारी गोष्ट आहे. माणसाच्या बाबतीत त्याचे अस्तित्व म्हणजे त्याच्या ठिकाणच्या सुप्त शक्तींचा आविष्कार. मानवी जीवनाचे ध्येय त्याच्या ठिकाणी असणाऱ्या सुप्त सामर्थ्याचा विकास व आविष्कार करणे हे होय.

मानवाच्या ठिकाणी आसणाऱ्या सुप्त सामर्थ्यांचा विकास व आविष्कार घडण्यासाठी चांगले वागणे आवश्यक ठरते. कारण व्यक्ती ही समाजाशिवाय अस्तित्वात राहूच शकत नाही. ती मानवी गुणांनी संपन्न बनते ती समाजामुळेच होय. कुटुंब, समाज, गाव, राष्ट्र आणि अखिल मानवजात हे सामाजिक घटक होत. कुटुंबापासून मानवजातीपर्यंतचे सर्व घटक व्यक्तीचे पालनपोषण करतात. मानसिक-बौद्धिक विकास करतात. या ना त्या प्रकारे व्यक्ती या सामाजिक घटकांवर अवलंबून असते. मानवी व्यक्तींचा विकास करण्यासाठी हे घटक स्थिर असणे आवश्यक आहे. या घटकातील व्यक्ती आत्मकेंद्रित, स्वार्थी वर्तन करू लागल्या, सहकार्यादी गुणांचा त्यांच्या ठिकाणी लोप झाला, तर मग हे घटक टिकणे अशक्य. मग तो घटक कुटुंब असो, राष्ट्र असो अथवा मानवजात असो. हे घटक टिकण्यासाठी त्यातील व्यक्तींनी चांगले आचरण करणे आवश्यक ठरते.

हे घटक नुसतेच टिकूनही चालणार नाहीत. तर ते संपन्न असणे आवश्यक असते. तरच माणसांची व्यक्तित्त्वे संपन्न बनतील. समाजाची संपन्नता ही व्यक्तीच्या संपन्नतेवर अवलंबून असते. अशा तऱ्हेने व्यक्ती

आणि समाज परस्परावलंबी असतात. म्हणून समाज टिकून राहावा, संपन्न व्हावा यासाठी व्यक्तींनी चांगले आचरण करणे आवश्यक ठरते.

**लोकशाही : विवेकनिष्ठ सत्ता**

मानवाचा सर्वांगीण विकास व समृद्धी हे विवेकवादी दृष्टिकोणाला अनुसरून मानवी जीवनाचे ध्येय आहे. ते साध्य करावयाचे असेल तर प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या व्यक्तित्वाचा विकास स्वतःच्या कल्पनेप्रमाणे करण्याचे स्वातंत्र्य व संधी मिळणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे स्वातंत्र्य व संधी देणारी लोकशाही ही एकमेव राज्यपद्धती आहे.

माणसाच्या ठिकाणी असणारी असणारी विवेकशीलता हा लोकशाहीचा आधार आहे. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी काही सुप्त सामर्थ्ये आहे. योग्य संधी आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या सामर्थ्यांचा आविष्कार होऊ शकतो. चांगले काय, वाईट काय हे ठरविण्याची विवेकशीलता प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी आहे. ती स्वतःच्या व्यक्तित्त्वाचा विकास करून घेऊ शकते, चांगले वागून आपली आणि इतरांची उन्नती करून घेऊ शकते असा लोकशाही तत्त्वज्ञानाचा विश्वास आहे.

कोणतीही राजवट म्हटली म्हणजे तिथे सत्ता ही असतेच. हुकूमशाही राजवटीत एखादा हुकूमशहा सगळ्या नागरिकांवर ही सत्ता गाजवीत असतो. कम्युनिस्ट राजवटीत पक्षाचा नेता अथवा पक्षातील काही थोड्या व्यक्ती इतरांवर सत्ता गाजवितात. आपल्या दृष्टीने चांगले काय हे ठरविण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य लोकांना नसते. सत्ताधारी हुकूमशहाच लोकांच्या दृष्टीने चांगले काय हे स्वतःच्या मते ठरवीत असतो व ते लोकांवर लादीत असतो. लोकांच्या मताला, त्यांच्या विवेकाला अशा राजवटीत स्थान नसते. हुकूमशाही सत्ता ही अविवेकी सत्ता होय. सक्ती आणि भीती यांवर ती आधारलेली असते. सत्ताधारी स्वतःला श्रेष्ठ समजतो. जनतेने त्याच्या आज्ञा निमूटपणे पाळाव्यात ही अपेक्षा

असते. हुकूमशाही राजवटीत लोकांना हीं अविवेकी बाह्य सत्ता प्रमाण मानावी लागते.

हुकूमशाहीच्या उलट लोकशाही ही विवेकनिष्ठ सत्ता आहे. बाह्य सत्ता प्रमाण मानणे हीच गोष्ट विवेकशीलतेच्या विरुद्ध आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या गुणवत्तेची दखल घेतलेली असते. प्रत्येक व्यक्तीच्या विवेकशीलतेला मान्यता दिलेली असते. सर्वश्रेष्ठ राज्यसत्ता ही लोकांच्या ठायीच असते. लोकच शास्ते आणि शासित असतात. आपला राज्य-कारभार कसा करावा, कोणती ध्येय धोरणे असावीत हे लोकच ठरवित असतात. मत देऊन प्रतिनिधी निवडण्याचा, राज्यकारभारविषयक प्रश्नां-वर मत देण्याचा, आपल्या मताचा सरकारवरती प्रभाव पाडण्याचा अधि-कार प्रत्येकाला असतो व अशा तऱ्हेने प्रत्येकजण राज्यकारभारात सह-भागी होतो. आपले राज्य कसे असावे हे लोक स्वतःच्या विवेकानुसार ठरवीत असल्यामुळे लोकशाही ही विवेकनिष्ठ राज्यपद्धती आहे.

**स्वातंत्र्य : नागरिक, राजकीय व आर्थिक**

व्यक्ती विकासासाठी स्वातंत्र्य ही महत्वाची अट आहे. लोकशाही-मध्येच हे स्वातंत्र्य व्यक्तीला लाभू शकते. व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी नागरिक, राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य असणे आवश्यक ठरते. स्वातंत्र्य म्हणजे बंधनापासून मुक्तता असा अर्थ असला तरी त्याला भावरूप बाजू आहे. व्यक्तीविकासासाठी बंधनापासून मुक्तता हवी त्याच बरोबर अनुकूल संधीही हवी.

नागरिक स्वातंत्र्यामध्ये प्रामुख्याने पुढील गोष्टींचा समावेश होतो. वैयक्तिक सुरक्षितता, खाजगी मालमत्ता बाळगण्याचे स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, आपले विचार, लेख वा भाषण रूपाने व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, अन्याय तुरुंगवासाची भीती नसणे, धार्मिक स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य वरील स्वातंत्र्ये असल्याशिवाय मनुष्य नागरिक या दृष्टीने स्वतःचा विकास करून

घेऊ शकणार नाही. हुकूमशाही राज्यवटीत व्यक्ती विकासाला हा अवसर दिलेला नसतो. सगळी व्यक्तित्वे एका ठशाची व्हावीत, सत्तेला प्रमाण मानणारी बनावीत यासाठी नागरिक स्वातंत्र्याची गळचेपी केलेली असते. तर लोकशाहीमध्ये व्यक्ती विकासाला पूर्णतया स्वातंत्र्य दिलेले असते.

लोकशाहीमध्ये लोकच अंतिमतः राज्यकर्ते असतात. म्हणून ते राजकीय स्वातंत्र्याचा पूर्णपणे उपभोग घेऊ शकतात व विकासाला अनुकूल राज्यकारभार करू शकतात. राजकीय स्वातंत्र्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो. राज्यकारभार करण्यासाठी गुप्त मतदानपद्धतीने प्रतिनिधी निवडण्याचे स्वातंत्र्य, कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याचे स्वातंत्र्य, सरकारी धोरणावर टीका करण्याचे स्वातंत्र्य आणि लायक न ठरलेल्या प्रतिनिधीला निवडणुकीत पराभूत करण्याचे स्वातंत्र्य.

नागरिक अथवा राजकीय स्वातंत्र्याइतकेच आर्थिक स्वातंत्र्यही महत्त्वाचे आहे. जन्मल्यापासून मरेपर्यंत जर व्यक्तीला उदरनिर्वाहाची चिंता करावी लागली, सतत जर तिचे आर्थिक शोषण चालू राहिले, श्रमाधिक्याचा ताण जर सतत पडत राहिला, तर ती व्यक्ती आपला विकास करायला असमर्थ ठरते. लोकशाही राज्यपद्धतीत व्यक्ती निर्वाहाच्या चिंतेपासून मुक्त राहू शकते. तिचा रोजगार निश्चित असतो व गुणवत्तेप्रमाणे उत्कर्ष करून घेण्याची तिला संधी असते.

**समतेची जोड**

व्यक्तीला दिलेल्या या स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त व्हावयाचा असेल तर त्याला समतेची जोड मिळणे आवश्यक ठरते व म्हणूनच लोकशाहीत या दोन्ही तत्त्वांना महत्त्व दिलेले आहे. नागरिक राजकीय स्वातंत्र्याचा उपभोग सगळ्या व्यक्ती समानपणे घेऊ शकतात. कायद्याच्या दृष्टीने सगळ्या व्यक्ती समान असतात. चांगल्या लोकशाही राज्यात एका वर्गाने

दुसऱ्या वर्गाचे आर्थिक शोषण करू नये ही दक्षता घेतलेली असते. हवे तसे वागण्याची मुभा हा स्वातंत्र्याचा अर्थ नाही. दुसऱ्याचे अनहित न करता स्वतःचा विकास करणे व दुसऱ्याच्या विकासाला अवसर ठेवणे हा स्वातंत्र्याचा अर्थ आहे. यासाठीच लोकशाहीत स्वातंत्र्याला समतेची जोड दिलेली असते.

**स्वातंत्र्य आणि समता**

१७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीत स्वातंत्र्याबरोबरच समतेचा उद्घोष झाला. १९१७ मध्ये झालेल्या रशियन राज्यक्रांतीनंतर समतेच्या तत्त्वाचा विशेषत्वाने पुरस्कार होऊ लागला. स्वातंत्र्य आणि समता या दोन तत्त्वात असणारी एक विसंगती यामुळे जास्त जास्त स्पष्ट होऊ लागली. विशेषतः आर्थिक बाबतीत स्वातंत्र्य आणि समता या तत्त्वांमधील संघर्ष तीव्र झाला.

समतेच्या पुरस्कर्त्यांचे प्रतिपादन असे की, माणसाची योग्यता समान आहे हे ध्यानात घेऊन जीवनाची नव्याने घडी बसविणे आवश्यक आहे. उद्योगधंद्याची खाजगी मालकी, व त्यातून नफ्यासाठी उद्योग चालविण्याचा हक्क या पद्धतीचा त्याग करायला हवा. माणसाची माणसाकडून होणारी पिळवणूक बंद व्हायला पाहिजे. श्रीमंत-गरीब, धनी-चाकर हा भेद उरता कामा नये. सगळ्यांची योग्यता समान आहे हे ध्यानात घेऊन कामाचा मोबदला सगळ्यांना सारखा मिळावयास पाहिजे.

स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारांचा यावर आक्षेप आहे तो असा : बौद्धिक–शारीरिकदृष्ट्या माणसामाणसात फरक असतो. समता निसर्गतःच अशक्य. योग्यतेच्या दृष्टीने माणसामाणसात फरक असता सर्व माणसे समान योग्यतेची मानणे हे चूक. ही वस्तुस्थिती असताना समता प्रस्थापित करणे म्हणजे जे अधिक लायक व कष्टाळू आहेत त्यांच्या विकासावर बंधने घालण्यासारखे आहे. जे मागासलेले आहेत, त्यांच्यासाठी

इतरांनी मागे रहावे असा याचा अर्थ होतो. अधिक योग्यता संपादन करण्यासाठी अधिक कष्ट करण्यासाठी यामुळे प्रोत्साहनच राहणार नाही.

केवळ तात्त्विक दृष्टीने पाहिले तर स्वातंत्र्य आणि समता या दोन तत्त्वांमध्ये विरोध आहे, हे मान्य करावे लागेल. एकाच वेळी सगळ्या व्यक्ती सामाजिक, आर्थिक व्यवहारात अनिर्बंध स्वातंत्र्याचा उपभोग घेताहेत, आपल्या इच्छेनुसार व्यवहार करताहेत आणि तरीही त्या समान योग्यतेच्या आहेत, समान अधिकाराचा उपभोग घेताहेत ही परिस्थिती येणे अशक्य आहे.

स्वातंत्र्य आणि समता यांना स्वतःसिद्ध मूल्य नाही. निरपवादपणे अमलात आणावयाची ही तत्त्वे नव्हेत. त्यांना जे मोल आहे ते व्यक्तीच्या आणि एकंदर समाजाच्या हिताच्या दृष्टीने.

व्यक्तीला अनिर्बंध स्वातंत्र्य इतरांच्या हितासाठी देणे युक्त ठरत नाही, याबद्दलचे एक उदाहरण पाहू. विड्या तयार करण्याच्या यंत्राचा एकाने शोध लावला व ती यंत्रे तयार करण्यासाठी सरकारकडे परवानगी मागितली. सरकारने ती परवानगी दिली नाही. कारण हे यंत्र जर वापरात आले असते तर देशातील हजारो विडीकामगारांचे चरितार्थाचे साधन नष्ट झाले असते. इथे एका व्यक्तीच्या, आपल्याला पाहिजे तो कारखाना काढण्याच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घातला गेला. समतेचे तत्त्वही निरपवादपणे अवलंबिणे चुकीचे ठरते. रशियासारख्या कम्युनिस्ट देशातही कामगारांच्या कौशल्यानुसार, व्यक्तीच्या योग्यतेनुसार श्रेणी आहेत व त्याप्रमाणे त्यांना मिळणाऱ्या मोबदल्यात फरक पडतो. अप्रगत व्यक्तींचा व समाजाचा विकास होण्याच्या दृष्टीने त्याला अधिक सवलती देणे न्याय्य ठरते.

माणसाच्या ठिकाणी असणाऱ्या गुणांचा, सामर्थ्याचा विकास करण्यासाठी स्वातंत्र्य आणि समता या तत्त्वांचा अवलंब होणे आवश्यक असते

या दोन तत्त्वांचा समतोल साधून अवलंब होण्यासाठी लोकशाही अधिक विवेकनिष्ठ करणे, तिची सत्ता अधिक व्यापक आणि विकेंद्रित करणे आवश्यक आहे. उपभोग्य वस्तूंचे वैपुल्याने उत्पादन करून जास्तीत जास्त लोकांच्या जास्तीत जास्त गरजा भागविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व्यक्तीला तिची जितकी पात्रता असेल तिथपर्यंत शिक्षण दिले पाहिजे. या गोष्टी शक्य झाल्या तर स्वातंत्र्य आणि समता या तत्त्वांचा समन्वय साधणे शक्य होईल.

**कायद्याची गरज का ?**

समाजातील व्यक्तींनी सद्हेतूने प्रेरित होऊन वर्तन करावे ही आदर्श स्थिती होय. परंतु असे घडत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच कायद्याची गरज भासते.

विशिष्ट बाबतीत कसे वागावे अथवा वागू नये याबद्दल समाजाने मान्य केलेले आणि व्यक्तीला घालून दिलेले नियम वा निर्बंध म्हणजे कायदे. समाजात एकात्मता राहावी, सगळ्यांना सारखा न्याय मिळावा, समाजजीवनाचे नियंत्रण व्हावे हा कायद्याचा हेतू असतो. व्यक्तीला स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा, तिच्या हक्काचे संरक्षण व्हावे, सुरक्षितपणाची भावना निर्माण व्हावी व शांतता नांदावी यासाठी कायद्याची गरज असते. कायद्याचे राज्य असेल तरच व्यक्तीला सुख मिळू शकेल, तिला प्रगती करून घेता येईल. कायद्याच्या दृष्टीने सगळे नागरिक सारख्या योग्यतेचे असतात, मग त्यांचा सामाजिक दर्जा कोणताही असो. एका अर्थाने कायदा हा सरकारपेक्षाही श्रेष्ठ असतो. सरकार कोणत्याही नागरिकाला लहरीप्रमाणे शासन करू शकत नाही. कायद्याचे उल्लंघन केले तरच सरकार शासन करू शकते.

लोकशाही राज्यपद्धतीत कायद्याचा अधिकार मानणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. कारण कायद्याच्याद्वारा लोकांची इच्छा व्यक्त

झालेली असते. कायदा हा सामाजिक सुखाचे व प्रगतीचे साधन असल्यामुळे लोकांच्या गरजांप्रमाणे व परिस्थितीप्रमाणे त्यात बदल केला तरच कायद्याचा हेतू सफल होईल. लोकशाहीत लोकच कायदे बनविणारे असतात. आपल्या विकासाला अनुकूल असे कायदे बनविणे त्यांना शक्य असते. कायद्यामध्ये लोकांच्या विवेकशीलतेचे प्रतिबिंब पडणे आवश्यक असते.

o o

## ६ विवेकशीलतेचे विरोधी घटक

आपले दैनंदिन व्यवहारातील वर्तन जर तपासून पाहिले तर असे दिसून येईल की, अनेक लहान मोठ्या बाबतीत आपण अविवेकानेच वागतो. विवेकशील वर्तनापेक्षा अविवेकी वर्तनच आपल्याकडून जास्त घडत असते. स्वतःचा फायदा व्हावा यासाठी आपण दुसऱ्याचे नुकसान करतो. नातलगाला नोकरी मिळवून द्यावी यासाठी दुसऱ्या एखाद्या लायक माणसाची नोकरी हिरावून घेतो. आपली प्रतिष्ठा वाढावी यासाठी दुसऱ्याची निष्कारण बेअब्रू करतो आणि यात काही वावगे केले अशी जाणीवही आपल्या मनाला होत नाही. आपण कमालीचे आत्मकेंद्रित असतो. आपल्याला अज्ञात असणाऱ्या प्रेरणांमुळे असे वर्तन घडते. त्या मुळे आपल्या आत्ममग्नतेची जाणीवही बहुधा आपल्याला होत नाही.

आपण ज्या समाजात वावरतो, ज्या कुटुंबात वाढलेलो असतो त्या समाजाची व कुटुंबाची सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याच्या दृष्टीचाच स्वीकार आपण केलेला असतो. रूढ नीतिकल्पना आपण स्वीकारलेल्या असतात आणि त्याही न कळतपणे. त्यांचाच अविष्कार आपल्या वागण्यातून होत असतो. ही मते, हा दृष्टिकोन आपण आपला म्हणून मांडीत असतो. परंतु तो खराखुरा आपला नसतो, तर इतरांपासून स्वीकारलेला असतो. हा दृष्टिकोन कसा आत्मसात केलेला असतो याचीही आपल्याला जाणीव नसते. वर्तनाच्या पाठीमागे असणाऱ्या प्रेरणा अज्ञात असतात. म्हणून

त्यातील विवेकशून्यता आपल्या ध्यानात येत नसते. अनेक सामाजिक रूढींना धरून आपले जे वर्तन घडत असते त्यात विवेकशून्यतेचा बराच भाग असतो.

विवेकशून्य वागण्याचा आणखी एक प्रकार असतो. काही गोष्टी आपल्या विवेकबुद्धीला तत्त्वतः पटलेल्या असतात. चांगले, योग्य व न्याय्य काय याचे बौद्धिकदृष्ट्या आकलन झालेले असते; तसे आपल्याला वागता यावे असेही वाटत असते. मात्र तशा प्रकारचे वर्तन मात्र आपल्याकडून घडत नाही. अस्पृश्यता वाईट, मिश्रविवाहाला प्रत्यवाय नसावा, लायक उमेदवाराला मत द्यावे, जातीचा श्रेष्ठ-कनिष्ठ भाव मानू नये, संकटाच्या काळात परमेश्वर मदत करीत नाही या गोष्टी आपल्या विवेकबुद्धीला पटलेल्या असतात; परंतु प्रत्यक्ष वर्तन पाहिले तर काय दिसते? खेड्यापाड्यात ( आणि अनेकदा शहरातही ) धार्मिक कार्यात हरिजनांना वगळण्यात येते. इतर जातीतील व्यक्तींशी आपल्या मुला-मुलींची लग्ने लावायला आपला सक्त विरोध असतो. राजकीय निवड-णुकीत उमेदवारांच्या राजकीय विचारप्रणाली ऐवजी त्याच्या जातीचा विचार करून मत दिले जाते. नेहमीच्या बोलण्यात स्वतःच्या जाती-बद्दलचा अभिमान, मोठेपणा व्यक्त केला जातो. स्वतःचे मूल आजारी असताना डॉक्टरी उपायाबरोबरच परमेश्वराचा धावाही केला जातो. आजार फार गंभीर असेल तर शिकल्यासवरलेल्या व्यक्तीही नवस बोलतात, शिकलेले लोक साईबाबाची भक्ती करतात. या वागण्याच्या पाठीमागे विवेकबुद्धीची प्रेरणा नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. मनुष्य विवेक-बुद्धीला डावलून तिच्या विरूद्ध वर्तन करताना दिसतो. याचाच अर्थ अन्य मानसिक घटक विवेकबुद्धीपेक्षा प्रबळ असल्याने असे वर्तन घडत असले पाहिजे.

माणसे नेहमीच विवेकशील वर्तन का करीत नाहीत? विवेकशीलतेच्या

विरुद्ध कोणत्या गोष्टी येतात ? त्यांचा परिहार करून मनुष्याला अधिकाधिक विवेकशील होता येणे शक्य आहे काय ? या प्रश्नांचा आपण विचार करणार आहोत. वरील प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी मनाची घडण कशी बनते, या घडणीतच कोणते विवेकविरोधी घटक अंतर्भूत होतात, हे समजणे आवश्यक आहे. इथे पुन्हा आपल्याला मानसशास्त्राचा आधार घ्यावा लागतो.

विवेकशीलतेच्या विचाराबाबत मनोविश्लेषणशास्त्रातील दोन कल्पनांची फारच मदत होते. प्रज्ञादुर्लभ मन (अन्कॉन्शस माइंड) व नियंत्रक अहंमात्र ( सुपर ईगो ) या त्या दोन कल्पना होत.

फ्राईडने मांडलेली नियंत्रक अहंमात्राची ( सुपर ईगोची ) कल्पना नैतिक विचाराच्या अथवा विवेकशीलतेच्या बाबत फार महत्त्वाची ठरते. ही कल्पना समजून घेण्यासाठी वासनापिंड ( इड ) आणि अहंमात्र ( ईगो ) या कल्पनाही माहीत असणे आवश्यक आहे. मनो· विश्लषणशास्त्रातील हा भाग समजून घेण्याआधी या संज्ञांच्याबाबत थोडेसे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. या संज्ञा मनाचे विभाग अथवा कप्पे बोधित करण्यासाठी वापरल्या गेलेल्या नाहीत, हे फ्राईडने स्पष्ट केले आहे. मनाचे हे वेगवेगळे भाग नसून एकाच मनाच्या विविध कार्यशक्ती आहेत.

**वासना पिंड**

आपल्या मनातील मूलभूत प्रेरणा, विकार, वासना इत्यादी कार्यशक्तींचा समुच्चयाने बोध करण्यासाठी फ्राॅईडने वासनापिंड ( इड ) ही संज्ञा वापरली आहे. ही कार्यशक्ती ( प्रज्ञेला दुर्लभ ) असून वासना-विकाराची तात्काळ पूर्ती व्हावी याकडे तिचा कल असतो. वासनापिंड म्हणजे मनाचे अगदी प्राथमिक, असंस्कृत, मूळ रूप होय. पशू आणि मनुष्य यांच्या मानसिक जीवनात समान असणारी गोष्ट म्हणजे वासनापिंड. तिचे स्वरूप

विवेकपूर्व आणि नीतिनिरपेक्ष असते. वासनापिंडावर नियंत्रण नसते तर माणसावर सदैव संकटे कोसळल्यावाचून राहिली नसती. किंबहुना ज्याला सुसंस्कृत, सुरक्षित जीवन म्हणता येईल तेच अशक्यप्राय झाले असते. वासनापिंडाची तुलना अगदी लहान मुलाच्या मनाशी करता येईल. लहान मुलांना रेडिओची बटने मोडाविशी वाटतात, दिव्याची ज्योत हातात धराविशी वाटते. त्याचा परिणाम काय होईल ? अशा इच्छा करणे चांगले का ? असा विचारच त्यांच्या मनात येत नसतो. कारण त्यांना कशाचेच आकलन नसते आणि त्यांच्या इच्छा आंधळ्या असतात. वासनापिंडाच्या प्रेरणाभावाचे स्वरूप ध्यानात यावे एवढया पुरतीच ही तुलना आहे. वासनापिंड फक्त लहान वयातच असतो असे नाही. आयुष्यभर, प्रगल्भ मनातही तो असतो. मात्र तो प्रज्ञा दुर्लभ असल्यामुळे त्याचे अस्तित्वही प्रौढ माणसाच्या ध्यानात येत नाही. अहंमात्र ( ईगो ) त्याच्यावर नियंत्रण करीत असतो. वास्तवाच्या पातळीवर पूर्ण करता येतील अशाच इच्छांचे समाधान अहंमात्र करीत असतो.

**अहंमात्र ( इगो )**

अगदी लहानपणीच वासनापिंडाच्या काही अंशाचे रूपांतर होते व नंतर अहंमात्राचा उदय व्हायला सुरुवात होते. त्याचे एक कारण बाह्य परिस्थिती आणि दुसरे मुलाचे मन प्रगल्भ व्हायला लागते, त्याच्या जाणिवांची वाढ व्हायला लागते, हे होय. वासनापिंडाच्या कांही अंशाचे झालेले रूपांतर म्हणजेच अहंमात्र. आंधळ्या इच्छांना अहंमात्र आवर घालतो, त्यांच्यावर नियंत्रण ठेवतो आणि वास्तवाच्या पातळीवर जेवढया इच्छा पूर्ण करता येणे शक्य आहे तेवढयाच तो पूर्ण करतो. अहंमात्राचे स्वरूप दुहेरी असते. बाह्य जगाची त्याला जाणीव असते. म्हणून, बाह्य जगाशी संबंध ठेवणारा अहंमात्र हा प्रकट असतो, प्रज्ञासुलभ असतो; परंतु वासनापिंडाशी व्यवहार करणारा

अहंमात्र हा प्रज्ञादुर्लभच असतो. त्याची जाणीव आपल्याला होत नसते. वस्तुतः वासनापिंडाच्या इच्छा पुरविण्यासाठीच त्यातून अहंमात्राचा जन्म होत असतो.

फ्रॉईडने अहंमात्राच्या संदर्भात म्हटले आहे की, वासनापिंडाच्या इच्छा पुरविणे हे अहंमात्राचे काम. ही इच्छापूर्ती करण्याजोगी बाह्य परिस्थिती असेल अथवा निर्माण करता येत असेल तरच तो हे काम पार पाडतो. अहंमात्रभाव आणि वासनापिंडभाव यांची तुलना घोडेस्वार आणि घोडा यांच्याशी करता येईल. धावण्याचे काम घोडा करीत असतो आणि कुठे जायचे हे ठरविण्याचा व वाहकाची गती तिकडे वळविण्याचा अधिकार घोडेस्वाराचा असतो. ही नेहमीची स्थिती; परंतु अहंमात्र आणि वासनापिंड यांच्याबाबत हे आदर्श चित्र दिसत नाही. इथे कुठे जायचे हे घोडाच ( वासनापिंड ) ठरवितो आणि तिकडे कसे जाता येईल याबद्दल घोडेस्वाराला मार्गदर्शन करणे भाग पडते. स्वतःची आणि जगाची आठवण ठेवणारी मनाची जी कार्यशक्ती व जिला आपण व्यवहारात समग्र मन समजतो ते म्हणजे अहंमात्र.

## नियंत्रक अहंमात्र ( सुपर इगो )

अगदी बाल्यावस्थेत बालकाच्या इच्छा ज्या वेळेस बाह्य परिस्थिती-मुळे असफल व्हायला लागतात आणि जेव्हा या अपयशाची जाणीव निर्माण होते तेव्हा नियत्रक अहंमात्राचा जन्म होतो. या काळात मूल मातापितरांशी भावनेने बद्ध असते. वासनापिंडाच्या इच्छा पुरविण्याचे बळ मुलाच्या अहंमात्रामध्ये नसते. त्यासाठी अधिक प्रबल सामर्थ्याची गरज असते आणि ते बळ त्याला वडीलधाऱ्यांच्या मार्गदर्शनात व अधिकारात सापडते.

सुरुवातीला आईवडिलांचे मार्गदर्शन आणि आज्ञा यांचा मुलावर परिणाम घडत असतो, तो बाह्य परिस्थितीतील घटक म्हणून. उदाहर-

णार्थ, उन्हाचा चटका बसतो म्हणून मूल जसे सावलीत येते त्याप्रमाणे आईवडिलांनी अमुक करू नको म्हणून सांगितले म्हणजे ती गोष्ट करण्याचे थांबविते; परंतु पुढे पुढे अशी काही एक प्रक्रिया घडत जाते की, वडीलधाऱ्यांचा दृष्टिकोन, त्यांची वागण्याची पातळी मुलाच्या मनावर ठसते. आणि त्याच्या मनाशी एकमेळ होऊन जाते.

ही प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची असते आणि काही एक जाणीव न होता घडत असते. ज्यांच्याबद्दल भीतियुक्त आदर असतो अशांचे न कळत अनुकरण केले जाते, त्यातला हा प्रकार. वडीलधाऱ्यांचा आत्मसात् केलेला हा दृष्टिकोन म्हणजेच नियंत्रक अहंमात्र. अहंमात्र ज्या वेळेस वासनापिंडाच्या इच्छा तृप्त करू शकत नाही, बाह्य परिस्थितीला तोंड देऊ शकत नाही, त्या वेळेस अहंमात्राचा जणू काय एक अंश रूपांतर पावून 'नियंत्रक अहंमात्र' उत्पन्न होतो. आईवडील आणि इतर वडिलधारी माणसे यांचे मानसिक प्रतिबिंब नियंत्रक अहंमात्रात असते. वडीलधाऱ्यांच्या ठिकाणी जे गुण आहेत व त्यांचा जो दृष्टिकोण आहे असे बालकाला वाटत असते त्याचे हे प्रतिबिंब असल्यामुळे स्वाभाविकपणेच ते अतिशयोक्त असते. वडीलधाऱ्यांचा आदर्श समोर ठेवून त्याच्या अहंमात्राचा काही भाग घडतो.

फ्रॉईडने रेखाटलेले मनाच्या घडणीचे हे चित्र काही जणांना चमत्कारिक वाटेल. वस्तुतः तसे वाटण्याचे कारण नाही. त्याला एवढेच सांगावयाचे आहे की, मुलाच्या वाढीबरोबर त्याचे आईवडील आणि इतर वडीलधारी माणसे यांचा त्याच्या मनावर न कळतपणे प्रभाव पडत असतो. हा प्रभाव त्याच्या प्रौढ वयातही टिकून राहतो आणि त्याच्या वागण्याची रीत व दिशा ठरवीत असतो. थोडक्यात, मुलाला आई वडिलांचा आणि वडीलधाऱ्यांचा जो अनुभव आलेला असतो त्यातील बराचसा अज्ञात असा टिकून राहिलेला भाग म्हणजे नियंत्रक अहंमात्र. हा

आपल्या कधीच ध्यानात येत नाही. अंतर्मुख होऊनही कळत नाही. मात्र आपल्या वागण्यावर त्याचा अनेक प्रकारे परिणाम घडत असतो. प्रौढ वयातही माणसे बालसदृश कशी वागतात याचा हिशोब या सिद्धान्ताने लागतो. माणसे कधी कधी चमत्कारिक वर्तन कसे करतात तेही कळते. ज्यूंचा छळ करणे हे नाझींना आपले कर्तव्य वाटत होते. फ्रॉईडच्या सिद्धान्ताने हे दाखवून दिले आहे की, लहानपणी जेव्हा बुद्धी कमकुवत असते त्या काळात तयार झालेली मते, मनोवृत्ती, समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोण आणि वागण्याची रीत, अनेक जण आयुष्यभर टिकवतात. त्यांचा हेका धरतात व अवलंब करतात.

## मनोविश्लेषणशास्त्र आणि विवेकशीलता

मनोविश्लेषणशास्त्रातील वरील कल्पना आणि विवेकशीलता यांचा कोणत्या प्रकारचा संबंध आहे ते पाहू. फ्रॉईडने रेखाटलेल्या मनाच्या चित्रणाचा मतितार्थ असा: व्यक्तीच्या मानसिक जीवनावर बाह्य जगातील वस्तुस्थितीशी मिळते घेत असता परिणाम होतो व त्याच्या मानसिक विकासात रूपांतरे घडत असतात. अहंमात्र ही जगातील वस्तुस्थितीबद्दल जाणीव असणारी, मानसिक गरजा आणि बाह्य परिस्थितीतील शक्यता यांचा मेळ घालणारी कार्यशक्ती अथवा मनाचा पैलू आहे. विवेकशीलतेचा धर्म वाढत असतानाच नियंत्रक अहंमात्रही तयार होत असतो आणि त्याचा परिणाम पुढच्या जीवनावर घडत राहतो. मानसिक घडणीची ही गुंतागुंत फ्रॉइडच्या सिद्धान्ताने दाखवून दिली आहे.

## फ्रॉईडच्या सिद्धान्तावरील आक्षेप

मनाचा प्रज्ञासुलभ भाग आणि मनाचा प्रज्ञादुर्लभ भाग यांचा फ्रॉईडने ज्या प्रकारचा संबंध चित्रित केलेला आहे त्यावरून त्याच्या सिद्धान्तावर पुढे दिल्याप्रमाणे टीका केली जाते. अज्ञात मनाच्या इच्छा व उद्दिष्टे सफळ करणे हेच जणू काय जाणीवयुक्त मनाचे ( अहंमात्राचे ) काम

आहे, असे मनोविश्लेषणशास्त्र म्हणते. जाणीवयुक्त मन अज्ञात मनावर नियंत्रण ठेवीत नाही; त्याला जणू काय स्वतंत्र अस्तित्वच नाही. साध्या भाषेत सांगायचे झाले तर विवेकावर विकाराचे आणि भावनेचेच आधिपत्य असते; शक्यतो बाह्य जगाशी फारसा विरोध होऊ न देता वासना-विकारांची तृप्ती करणे एवढेच जाणीवयुक्त मनाचे कार्य ठरते. जाणीवयुक्त मनाची गुणाच्या दृष्टीने, विवेकशीलतेच्या दृष्टीने काही वाढ होते असे हा सिद्धान्त सांगतच नाही. हा सिद्धान्त प्रमाण मानला तर जाणीवयुक्त मन हा प्रज्ञादुर्लभ मनाचाच; परंतु काहीसा वर डोकावणारा, भाग ठरतो.

वस्तुस्थिती अशी आहे की, जितके विवेकशील होणे माणसांना आवडेल तितकी ती नसतात. अनेक विवेकदुष्ट हेतू सफल करण्यासाठीच आपले जाणीवयुक्त मन व बुद्धी कार्य करीत असते. शास्त्रीय शोधाच्या गैरवापराने आतापर्यंत किती जीवित-वित्तहानी झाली आहे हे बघितल्यावर ध्यानात येते की, बुद्धी ही फार मोठ्या प्रमाणात विकाराचे दास्य करते. सुदैव एवढेच की, मनोविश्लेषणशास्त्राकडे पाहिल्यावर वाटते की, ही गुलामगिरी शंभर टक्के नाही. मानसशास्त्र वस्तुतः मनाचे निराशाजनक चित्र रेखाटत नाही; उलट आशेचा किरण दाखविते. कारण विकार-वासनांच्या दास्यातून सुटका करून घ्यायला मदत होते ती याच शास्त्राची. या शास्त्राने मनाच्या गुलामगिरीची जाणीव करून दिली आहे. मुक्तीसाठी पहिली आवश्यक अट ही की, आपण गुलाम आहोत याची जाणीव झाली पाहिजे. ज्याला आपल्या गुलामगिरीची जाणीवच नसते तो गुलामगिरीलाच स्वाभाविक स्थिती समजून तसाच गुलाम राहतो. तर्कबुद्धीचा वापर विवेकदुष्ट हेतू सफल करण्यासाठी केला जातो हे मनोविश्लेपणशास्त्राने दाखवून दिले आणि त्यामुळेच विवेकशीलतेच्या विकासाचा मार्ग खुला झाला. फ्रॉईडने रेखाटलेले मनाचे चित्र आक्षेपक समजतात तसे नाही, हे पुढील विवेचनावरून ध्यानात येईल.

## अहंमात्राची भावरूप बाजू

फ्राईडने अहंमात्राचा दुबळेपणा सांगितला असला तरीसुद्धा त्याने संपूर्ण निराशाजनक दृष्टिकोण स्वीकारलेला नाही. उलट, जे मानसशास्त्रज्ञ अहंमात्राच्या दुबळेपणावरच भर देतात त्यांच्यावर त्याने टीकाच केली आहे. अहंमात्रमात्र हा वासनापिंड आणि नियंत्रक अहंमात्र यांच्या सर्वस्वी दबावाखाली असतो असे म्हणणे चूक ठरेल. वासनापिंडाच्या विवेकदुष्ट बंधनातून अहंमात्राची सुटका करणे शक्य आहे. वासना-पिंडाच्या जागी अहंमात्राची प्रतिष्ठापना करणे हे आपले उद्दिष्ट असावयास पाहिजे, असे त्याने म्हटले आहे. फ्रॉम, हॉर्नेल, या मानसशास्त्रज्ञांच्या मते अहंमात्र हा वासनापिंडातून निर्माण होत असला तरी अहंमात्राच्या द्वारा व्यक्त होणारी विवेकशीलता ही वासनापिंडाहून गुणांनीच भिन्न असते. आपण सगळेच माणुसकीच्या नात्याने बद्ध आहोत ही सामाजिक जाणीव विवेकशीलतेच्या मुळाशी आहे. परस्पर सहकार्य, देवाणघेवाण यातून सामाजिक जाणीव व्यक्त होत असते. इतरांशी असलेल्या संबंधाची ही सामाजिक जाणीव वस्तुतः लहानपणीच मुलात दिसायला लागते; परंतु वासनापिंड आणि नियंत्रक अहंमात्र यांच्या विवेकदुष्ट प्रभावापासून ती पूर्णपणे मुक्त नसते. सामाजिक जाणीवेचा दुबळेपणा अनेक बाबतीत प्रत्ययाला येत राहतो. व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधाची गल्लत केली जाते. मनुष्य प्रचाराला बळी पडतो. समाजात अंतर्गत संघर्ष होत राहतात. राजकीय व सामाजिक क्षेत्रातले माणसाचे वर्तन पाहिले तर हे दिसून येते की, बालपणीच्या सवयी आणि विचार करण्याची रीत लोकांनी सोडलेली नसते. अहंमात्राच्या ठिकाणी सामाजिक जाणीवेचा जास्त प्रमाणात विकास होत नसल्यामुळे मनुष्याच्या वर्तनात अविवेकच जास्त दिसून येतो.

अहंमात्र हा मनाचा प्रकट, ज्ञात असा पैलू आहे. त्याच्या ठिकाणी

जाणीवेचा धर्म असतो, विवेकशीलता निर्माण होत असते आणि विवेकशीलता ही जाणीवेचा एक विशेष प्रकार आहे. सामाजिक जाणीवेशी निगडित असणे हा अहंमात्राचा धर्म आहे असेही म्हणता येईल.

एकंदरीत अहंमात्राचा विकास म्हणजे जाणीवेची वाढ. व्यक्ती आणि बाह्य जग यामध्ये असलेला एक विशेष प्रकारचा संबंध म्हणजे जाणीव होय. जाणीव निर्माण होते याचा अर्थ मनुष्य बाह्य जगाचे आकलन करतो. बाह्य जगाकडे विशेष लक्ष पुरवतो.

अर्भकावस्थेत मुलाला स्व आणि स्वेतर यातला फरक कळत नाही. ते स्वतःचे अंग ओरबाडते आणि रडते याचे कारण आपल्या शरीराची व आपल्या वेगळेपणाची जाणीवच त्याला असत नाही. नंतर त्याला बाह्य जगाची जाणीव व्हायला लागते. याचाच अर्थ त्याच्या ठिकाणी अहंमात्र वाढीस लागतो. जितके मूल लहान तितका त्याचा अहंमात्र अविकसित असतो. त्याला स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव कमी असते. आपल्याहून जगाला वेगळे अस्तित्व आहे हे समजणे ही अहंमात्राच्या वाढीची पहिली पायरी. आपल्या इच्छा सहज पुऱ्या होत नाहीत याची जाणीव व्हायला लागल्यावर अहंमात्राच्या विकासाला सुरुवात होते. जिथे बाह्य परिस्थितीत फारसा फरक पडत नाही, तिथल्या व्यक्तीत अहंमात्राची वाढ कमी प्रमाणात होते. आपल्या शरीरयंत्रणेचे येथे उदाहरण देता येईल. जोपर्यंत आपली पचनक्रिया सुरळीत असते तोपर्यंत पचनक्रियेची, ती करणाऱ्या इंद्रियाची आपल्याला जाणीव होत नाही. परंतु पोट बिघडल्यानंतर पोट असल्याची जाणीव विशेषत्वाने होते. माणसाला ही बाह्य जगाची जाणीव होते म्हणजे काय ? बाह्य जगाची जाणीव होणे याचा अर्थ डोंगर, नद्या, झाडी यांचे ज्ञान होणे असा नाही, तर मनुष्य ज्या समाजात वावरत असतो तेथील सगळ्या सामाजिक गुंतागुंतीची जाणीव होणे. बाह्य जगाच्या या जाणीवेबरोबर व्यक्तीच्या

अहंमात्राचा विकास होत असतो. व्यक्ती जन्माला येण्याआधीच समाज अस्तित्वात असतो. त्याचे वागण्याचे संकेत असतात. हे सामाजिक संकेत व्यक्तीने पाळावेत ही अपेक्षा असते. या सामाजिक संकेताची जाणीव कुटुंब, विद्यालय, धर्म अशा संस्थेच्याद्वारा व्यक्तीला होत असते. सामाजिक व्यवहार व्यक्तिमनावर ठसत असतो आणि अखेर तो व्यक्ति-मनाचा भाग बनून जातो. समाजाशी, या बाह्य जगाशी व्यक्तीला जस-जसे तोंड द्यावे लागते, विरोध करावा लागतो, मिळते घ्यावे लागते, तसतसा व्यक्तीचा अहंमात्र विकसित होत जातो.

**अहंमात्राचे एक वैशिष्ट्य**

विवेकशीलता हा सामाजिक जाणीवेचा, अहंमात्राचा एक विशेष पैलू आहे. आत्मकेंद्रित वृत्तीच्या ऐवजी इतरांचा विचार करणारी सामाजिक वृत्ती निर्माण होणे म्हणजे विवेकशीलता. आपण सारे माणुसकीच्या बंधाने बांधले गेलो आहोत. देवाणघेवाण करणे, सहकार्य करणे आवश्यक आहे असे वाटणारी सामाजिक जाणीव म्हणजे विवेकशीलता. विवेकशीलतेच्या विकासासाठी जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे आणि ही जाणीव सामाजिक जाणीव असायला पाहिजे.

**विवेकशीलतेचा विरोधी घटक**

व्यक्तीच्या ठिकाणी वर सांगितलेली स्पृहणीय अशी सामाजिक जाणीव निर्वेधपणे निर्माण होत नाही. म्हणजेच व्यक्तीच्या विवेकशीलतेची वाढ होत नाही. या विवेकशीलतेच्या वाढीला विरोध होतो तो नियंत्रक अहंमात्राचा. नियंत्रक अहंमात्राचे स्वरूप फार फसवे आहे. नियंत्रक अहंमात्र ही व्यक्तीच्या बाबत पहिली नैतिक सत्ता होय. चांगल्या-वाईटाबद्दलचे, वडीलधाऱ्यांचे मुलाने आत्मसात केलेले दृष्टिकोण म्हणजे नियंत्रक अहंमात्र होय. चांगले काय ? वाईट काय ? हे नियंत्रक अहंमात्र सांगत असल्यामुळे त्याचे स्वरूप नैतिक असते. मात्र त्यांचे स्वरूप

नैतिक असले तरी विवेकशील नव्हे. कारण विवेकशीलता ही व्यक्तीच्या स्वतःच्या मानसिक प्रगल्भतेतून, स्वतःच्या सामाजिक जाणीवेतून प्रकट होत असते. याच्या उलट नियंत्रक अहंमात्र म्हणजे व्यक्तीने आत्मसात केलेले दुसऱ्याचे दृष्टिकोण. चांगल्या-वाईटाबद्दलच्या दुसऱ्याच्या तयार कल्पना, साचेबंद विचार होत. चांगल्या–वाईटाबद्दलचे वडीलधाऱ्यांचे हे दृष्टिकोण अथवा नियंत्रक अहंमात्र फार प्रभावी असतात. व्यक्ती नियंत्रक अहंमात्राचा निर्णय चांगल्या-वाईटाबद्दल प्रमाण मानते व त्यामुळे तिच्या ठिकाणी विवेकशीलतेचा विकास होणे कठीण होऊन बसते.

आपण मागे पाहिले की मूल जेव्हा आईवडिलांवर अवलंबून असते त्या काळात म्हणजेच मनाच्या अविवेचक अवस्थेत नियंत्रक अहंमात्र हा निर्माण होत असतो. प्रौढपणी जेव्हा चांगले काय ? वाईट काय ? याचा ते विचार करते तेव्हा या विचारावर लहानपणीच न कळत झालेल्या संस्कारांचा, व्यक्तीला अज्ञात असणाऱ्या नियंत्रक अहंमात्राचा परिणाम झाल्यावाचून राहत नाही. प्रौढपणी मनुष्याला वाटत असते की, आपण चांगले याचा निर्णय जाणीवपूर्वक, विचारपूर्वक घेत असतो, परंतु या निर्णयावर अज्ञात असणाऱ्या नियंत्रक अहंमात्राचा बराच परिणाम झालेला असतो, याचा जाणीवयुक्त मनाला पत्ताही लागत नाही. नियंत्रक अहंमात्राचा परिणाम कोणत्या स्वरूपाचा असतो याची कल्पना काही उदाहरणांवरून येऊ शकते. विवेकाची बैठक मुळीच नसणाऱ्या, माणुसकीला न शोभणाऱ्या काही चालीरीती, परंपरा समाजात टिकून असलेल्या दिसून येतात. आपल्या हिंदू समाजाने अस्पृश्यांना दिलेल्या वागणुकीत नियंत्रक अहंमात्राचाच प्रभाव आपल्याला दिसून येईल. गेल्या पंचवीस–पन्नास वर्षांपूर्वी अस्पृश्यांना फार वाईट तऱ्हेने वागविले जात होते. ते तुच्छ आहेत, गुणहीन आहेत, त्यांचा स्पर्श होणेही अमंगल, ही समजूत सार्वत्रिक होती. उच्चवर्णीय आणि अस्पृश्यही ही स्थिती स्वाभाविक आहे असे समजून

वागत होते. वडीलधाऱ्यांची अस्पृश्याशी होणारी वागणूक, त्यांचा अस्पृश्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन मूल न कळत आत्मसात करी आणि मग त्याच्या प्रौढपणे अगदी सहजपणे अस्पृश्यांना हीन लेखूनच वागणूक देई. वडीलधाऱ्यांचा हा दृष्टिकोण मुलांच्या ठिकाणी आत्मसात् होऊन नियंत्रक अहं मात्रात रूपांतरित होत असे. अस्पृश्यांना अशा तऱ्हेने वागविणे चूक आहे, अयोग्य आहे अशी जाणीव त्यांच्या प्रकट मनाला होत नसे आणि यदाकदाचित् झाली तरी अज्ञात मनातील संस्कार आणि प्रेरणा त्यांना वेगळे वर्तन करू देत नसत. कारण अज्ञात मनातील संस्कार अथवा नियंत्रक अहंमात्र हा जाणिवयुक्त मनाकडून घडणाऱ्या वर्तनावर परिणाम करीत असतो.

गेल्या पन्नास-साठ वर्षांपूर्वीची सामाजिक स्थिती डोळ्यासमोर ठेवून व्यक्तीच्या खाजगी आणि सामाजिक जीवनाचे निरीक्षण केले तर नियंत्रक अहंमात्राचा परिणाम ध्यानात आल्यावाचून राहणार नाही. स्त्रियांनी शिक्षण घेऊ नये, पुरुषांच्या बरोबरीने वागू नये, सामाजिक जीवनात भाग घेऊ नये, त्यांची योग्यता पुरुषापेक्षा केव्हाही कमीच, ही धारणा सार्वत्रिक स्वरूपात बघायला मिळत होती. वडीलधाऱ्यांचे वर्तन पाहून त्यांचा दृष्टिकोन न कळतपणे आत्मसात केल्यामुळेच अशी धारणा बनत होती, हे उघड आहे. धर्माबद्दल, देवाबद्दल, सामाजिक संस्थांबद्दल ज्या कल्पना बनतात त्या मुख्यतः नियंत्रक अहंमात्राच्या प्रभावामुळे, असे स्थूलमानाने म्हणता येणे शक्य आहे.

मनुष्य कृतीला प्रवृत्त होतो तो केवळ बौद्धिक निश्चयामुळे नव्हे. विचाराच्या किंवा निश्चयाच्या पाठीमागे मानसिक बळ असावे लागते. विशिष्ट कृती करण्याकडे व्यक्तीचा मानसिक कल असावा लागतो. कृतीला अनुकूल अशी मनाची घडण नसेल तर केवळ तर्कबुद्धीचे समाधान होऊन मनुष्य कृती करायला प्रवृत्त होत नाही. अशा तऱ्हेने विवेकशील आचरणाच्या आड नियंत्रक अहंमात्र येण्याची शक्यता असते. पन्नास

साठ वर्षांपूर्वी पुनर्विवाहाची चाल नव्हती. पुनर्विवाह ही घटना वर्तमानपत्रात छापून येण्याजोगी ठरावी, तिच्यावर टीकेची वादळे उठावीत असा तो काळ. त्या काळातील अनेक सुशिक्षित माणसांच्या विवेकबुद्धीला पुनर्विवाहाची इष्टता निःसंशय पटलेली होती; परंतु असा सुशिक्षित विधुर मनुष्य स्वतः विधवेशी लग्न करायला तयार होत नसे, अथवा आपल्या तरुण विधवा बहिणीचा पुनर्विवाह करायला तर मुळीच तयार नसे. पुनर्विवाह करावा ही गोष्ट त्याच्या विवेकबुद्धीला पटत असे; परंतु मनाला भावत नसे. याचाच अर्थ त्याचा नियंत्रक अहंमात्र विवेकशील वर्तनाला विरोधी होता. त्याच्या ठिकाणी विवेकशीलतेचा विकास झालेला नव्हता. विवेकयुक्त आचरण करण्यासाठी पुरेसे मानासिक बळ आधीच्या विरोधी संस्कारांमुळे निर्माण झालेले नव्हते.

वडीलधाऱ्यांचे आज्ञापालन करण्याची अगदी लहानपणीची सवय प्रौढ वयांत वेगळ्या तऱ्हेने टिकून राहते. सनातन सामाजिक रूढी, धर्मसंस्था, राज्यसत्ता याचे निर्बंध-आदेश निमूटपणे मनुष्य पाळतो. त्यांच्या अधिकाराच्या प्रामाण्याबद्दल त्याच्या मनात शंका येत नाही किंवा आली तरीही तो आज्ञापालन करतोच. ही आज्ञापालनाची सवय त्याच्या नियंत्रक अहंमात्राचा अविभाज्य घटक बनलेली असते.

कशा तऱ्हेने काय करावे ? किंवा काय करू नये ? चांगले काय ? अथवा वाईट काय ? याबद्दल आदेश देणारी पहिली नैतिक सत्ता म्हणजे माणसाचा नियंत्रक अहंमात्र होय.

### प्रभाव टाळण्याची शक्याशक्यता

वरील विवेचन वाचून असा मात्र ग्रह होऊन देऊ नये की, चांगल्या वाईटाचा निर्णय करणारी नैतिक जाणीव केवळ नियंत्रक अहंमात्रातून प्रेरित होते मागील एका प्रकरणात विवेकशीलतेची, नैतिकतेची वाढ कशी होते हे आपण पाहिले. बालपणातील परावलंबित्व, दुबळेपणा नष्ट

होणे, इतरांशी आपला परस्पर सहकार्याचा, देवाणघेवाणीचा संबंध आहे याची जाणीव होणे म्हणजेच मानसिक प्रगल्भता येणे. वडिलधाऱ्यांवर अवलंबून असण्याच्या काळात नियंत्रक अहंमात्राची निर्मिती होत असते. हा अवलंब सुटून सामाजिक जाणीव निर्माण होणे याचा अर्थ नियंत्रक अहंमात्राच्या नैतिक कल्पनांऐवजी अहंमात्राच्या सामाजिक जाणिवेवर आधारलेल्या नैतिक कल्पनांचा स्वीकार करणे. स्थूलमानाने सामाजिक जाणीव यथार्थ स्वरूपात होण्याला नियंत्रक अहंमात्राचा अडथळा होत असतो ही गोष्ट मात्र खरी.

व्यक्तीच्या जीवनात नियंत्रक अहंमात्र ही मानसिक अवस्था पूर्णपणे टाळणे कठीण असले तरी ती अधिक काळपर्यंत टिकायला मात्र नको आहे. म्हणजेच व्यक्ती नियंत्रक अहंमात्राच्या प्रभावातून लवकरात लवकर मुक्त व्हायला हवी, मुक्त होणे शक्यही आहे. ज्या समाजात आर्थिक दुःस्थिती विशेष असते, सामाजिक संघर्ष तीव्र असतात तिथे नियंत्रक अहंमात्राचा प्रभाव विशेष प्रमाणात दिसतो. कारण कुटुंब हा सर्वात महत्त्वाचा सामाजिक घटक असतो आणि त्या द्वारा आईवडिलांकडून मुलांवर संस्कार घडत असतात. आर्थिक, सामाजिक संघर्ष समाजातच जर कमी प्रमाणात असतील तर त्याच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा विकास लवकर घडणे शक्य होईल. नियंत्रक अहंमात्राचा प्रभाव भिन्नभिन्न परिस्थिती असलेल्या समाजात वेगवेगळा आणि वेगवेगळ्या प्रमाणात पडत असतो असे अलीकडच्या संशोधनावरून दिसून आले आहे. एकंदरीत समाजातच विवेकवादी दृष्टिकोण निदान तत्त्वतः मान्यता पावला, तरी त्याचा परिणाम पुढच्या पिढीवर दिसून आल्यावाचून राहात नाही. समाजात ज्या चालीरीती, संकेत, चांगल्या-वाईटाकडे बघण्याचे दृष्टिकोण असतात ते वडीलधाऱ्यांच्या वागणुकीतून व्यक्त होत असतात. वडीलधाऱ्यांचे हे दृष्टिकोण मुले, वाढीच्या वयात आत्मसात्

करतात आणि त्यांचा नियंत्रक अहंमात्र बनत असतो. म्हणून एकंदरीत समाजातच विवेकवादी दृष्टिकोण मान्यता पावणे आवश्यक आहे.

समाजात विवेकवादी दृष्टिकोण मान्यता पावला तर त्याचे प्रतिबिंब व्यक्तीच्या जीवनात उमटल्यावाचून राहत नाही, हे आपल्याला साठ वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र आणि आजचा महाराष्ट्र यांची तुलना केली तर काहीसे लक्षात येईल. अनेक सामाजिक प्रश्नांकडे बघण्याचा आजचा दृष्टिकोण बराचसा विवेकशील झाला आहे, असे म्हणता येईल. साठ वर्षांपूर्वी शहरात आणि खेड्यात अस्पृश्यता अतिशय तीव्र स्वरूपात होती. अस्पृश्य आणि सवर्ण हिंदू याचे एका बैठकीत बसणे, सहपान करणे, सहभोजन करणे केवळ कल्पनेच्या पलीकडचे होते, इतकी अस्पृश्यांबद्दल हीनपणाची भावना लोकांच्या मनात वसत होती. आज निदान शहरांत तरी बऱ्याच प्रमाणात वरील गोष्टी शक्य झाल्या आहेत. या प्रश्नांकडे बघण्याचा सुशिक्षितांचा दृष्टिकोण अधिक विवेकशील झाला आहे. पन्नाससाठ वर्षांपूर्वी ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यामध्येही सामाजिकदृष्ट्या फार मोठी दरी होती ब्राह्मण ब्राह्मणेतरांकडे काहीशा तुच्छतेच्या भावनेने बघत होते. आज तशी स्थिती फारशी राहिलेली नाही. एकंदरीत जातिसंस्थेकडे बघण्याचा दृष्टिकोण काहीसा विवेकशील झाला आहे. माणसाची योग्यता तो ज्या जातीत जन्मतो त्यामुळे आपोआपच ठरते हा पूर्वीचा विवेकदुष्ट दृष्टिकोण आता बऱ्याच प्रमाणात नष्ट झालेला आहे.

पन्नाससाठ वर्षांपूर्वीचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोण आणि आजचा दृष्टिकोण यातही असेच महदंतर पडले आहे. स्त्रियांना शिक्षण देणे, सामाजिक कार्यात पुरुषांच्या बरोबरीने वाव देणे, नोकऱ्या करू देणे, वराची निवड करू देणे, कौटुंबिक जीवनात बरोबरीने वागविणे या एकेकाळी अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी आज बऱ्याच प्रमाणात शक्य

झालेल्या आहेत. समाजसुधारकांची शिकवण या स्थित्यंतरास बरीच कारणीभूत झाली आहे. एका पिढीने अमुक अमुक गोष्टी व्हाव्यात असे तत्त्वतः मान्य केले तरी त्याचा पुढील पिढीवर अनुकूल परिणाम होतो आणि पुढीलांचा दृष्टिकोण अधिक विवेकशील होतो. आचरणातही ही विवेकशीलता दिसून यायला लागते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नवीन पिढीच्या नियंत्रक अहंमात्रात हे विवेकविरुद्ध दृष्टिकोण आत्मसात केले जात नाहीत.

**नियंत्रक अहंमात्राकडून विवेकशीलतेकडे**

मुलांच्या आत्मकेंद्रित अवस्थेत मूल सामाजिक चालीरीतींचे पालन करीत असते, परंतु त्यात त्याची विवेकबुद्धी नसते. हे पालन वडीलधाऱ्यांच्या आज्ञा पाळण्याच्या स्वरूपाचे असते. हे पालन करणे आपले कर्तव्य आहे; कारण न केले तर आपल्या वडीलधाऱ्यांचा रोष पत्करावा लागेल असा धाक त्याला असतो. 'शेजारच्या मुलाशी गोडीने वागावे, भांडू नये ' ही वडीलधाऱ्यांची आदेशरूप अपेक्षा असते. मूल तसे वागते; पण असे वागण्याचा हेतू आज्ञापालनाचा असतो. आपण असे वागलो नाही तर वडिलधाऱ्यांची नाराजी पत्करावी लागेल, कदाचित शिक्षाही होईल, असे मुलाला वाटत असते. मुलाच्या या वर्तनात जी नैतिक कल्पना असते ती नियंत्रक अहंमात्रातून निर्माण झालेली असते.

मुलाच्या ठिकाणी प्रगल्भता निर्माण झाल्यावर त्याच्या नैतिक कल्पनेला नियंत्रक'अहंमात्राच्या आदेशाचे, निर्बंधाचे स्वरूप राहत नाही. त्याची नैतिक कल्पना विवेकशीलतेतून उत्स्फूर्तपणे निर्माण होते. मुलाच्या ठिकाणी मानसिक प्रगल्भता आल्यानंतर परस्पर सहकार्य, देवाण-घेवाण या सामाजिक वृत्तीचे महत्त्व त्याला पटायला लागते. शेजारच्या मुलाशी गोडीने वागावे, भांडू नये हे त्याला पटते व त्या-प्रमाणे तो वागतो. याचे कारण आपण खेळण्याच्या, एकत्र राहण्याच्या

आनंदाला मुकू हे त्याला जाणवते व तो मुलगा उत्स्फूर्तपणे, स्वतःच्या जाणीवेने शेजारच्या मुलाशी गोडीने वागतो. हे त्याचे वागणे अहं-मात्राच्या विवेकशीलतेतून प्रेरित झालेले असते.

व्यक्तीच्या ठिकाणी जितक्या अधिक प्रमाणात सहकार्याची, परस्पर देवाण-घेवाणीची, इतरांबद्दल विचार करण्याची, वृत्ती निर्माण होईल, प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्रपणे सर्वांगीण विचार करण्याची प्रवृत्ती निर्माण होईल, तितक्या प्रमाणात तिच्या मनावरील नियंत्रक अहंमात्राचा प्रभाव कमी होईल, आणि खरीखुरी नैतिक दृष्टी, डोळस विवेकशीलता अधिकाधिक विकसित होईल. अहंमात्रातून निर्माण होणारा विवेक-शीलतेचा धर्म अधिकाधिक कसा विकसित करता येईल याबद्दल आपला कटाक्ष असायला पाहिजे. नियंत्रक अहंमात्राच्या प्रभावाने काही बाबतीत मनुष्य चांगला वागेलही, परंतु नियंत्रक अहंमात्राच्या प्रभावापासून व्यक्तित्व स्वतंत्र करणे हीच गोष्ट स्पृहणीय आहे. असे झाले तरच व्यक्तीच्या ठिकाणी विवेकशीलता अधिक प्रमाणात निर्माण होईल आणि मग ही विवेकशीलता आचरणाच्या प्रत्येक बाबतीत जाणीवपूर्वक, डोळस-पणे वर्तनाला प्रेरणा देईल. त्यातच मनुष्यत्वाचे गमक आणि सार्थक आहे.

◎ ◎ ◎

# ७ विवेक आणि श्रद्धा

आजच्या शास्त्रीय युगात आणि बौद्धिक वातावरणात श्रद्धेचा विचार अनेकांना विसंगत वाटतो. तसे वाटण्याचे कारण श्रद्धेचा एक विशिष्ट अर्थ घेतला जातो. श्रद्धा म्हणजे परमेश्वरावरील श्रद्धा, धर्मावरील श्रद्धा, आध्यात्मिक सामर्थ्य असणाऱ्या विभूतींवरील श्रद्धा असाच सामान्यपणे अर्थ घेतला जातो. वैचारिक बंधने लादणाऱ्या धर्मसत्तेशी गेल्या शे-दीडशे वर्षांत जो झगडा झाला त्याचा परिणाम म्हणून श्रद्धेबद्दलचा हा विशिष्ट अर्थच आपल्या मनात असतो.

वस्तुतः ही श्रद्धा म्हणजे अंधश्रद्धा होय, विवेकशून्य श्रद्धा होय; परंतु विवेकयुक्त श्रद्धा म्हणून एक वेगळी मनोवृत्ती आहे, एक वेगळी गोष्ट आहे, ही बाब ध्यानात घेणे आवश्यक आहे. ‘ त्याची साईबाबांवर श्रद्धा आहे ’ आणि ‘ त्याची लोकशाही मूल्यांवर श्रद्धा आहे ’ असे म्हणताना श्रद्धा या एकाच शब्दाचा वापर केलेला असतो; परंतु पहिल्या वाक्यातील श्रद्धा हा शब्द अंधश्रद्धा या अर्थाने वापरला गेलेला असतो तर दुसऱ्या वाक्यातील श्रद्धा या शब्दाचा विवेकयुक्त, डोळस श्रद्धा असा अर्थ वक्त्याला अभिप्रेत असतो. अंधश्रद्धा ही विवेकाच्या विरुद्ध असणारी, त्याज्य अशी गोष्ट अथवा मनोवृत्ती आहे; तर विवेकयुक्त श्रद्धा ही अंधश्रद्धेहून गुणाच्या दृष्टीनेच निराळी असणारी इष्ट, स्पृहणीय व आवश्यक अशी गोष्ट वा मनोवृत्ती आहे. विवेकयुक्त श्रद्धा हा विवेकशील माण-

साच्या मनाचा एक पैलू आहे, एक मनोधर्म आहे आणि विवेकशील आचरण घडण्याच्या दृष्टीने विवेकयुक्त श्रद्धा असणे ही महत्त्वाची गोष्ट आहे.

शास्त्रीय युगाचा आरंभ झाल्यानंतर खोट्या आध्यात्मिक बंधनाच्या विरुद्ध, भ्रमाविरुद्ध, वेगवेगळ्या प्रकारच्या जुलुमांविरुद्ध लढा दिला गेला. विवेकबुद्धीवरील विश्वासाचा त्यात आविष्कार होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा स्वीकार करून आपण एक नवी सामाजिक घडण करू, या उमेदीचा तो आविष्कार होता; परंतु आज जीवनाच्या अनेक क्षेत्रात एक प्रकारची अनिश्चितता वाढलेली दिसते. श्रद्धेच्या अभावात एक प्रकारचा गोंधळ दिसतो. अनिश्चिततेचे समर्थन करण्यासाठी विवेक-बुद्धीचा वापर होतो. बुद्धिवादाची ढाल पुढे करून कोणत्याही प्रभावी मताचा स्वीकार करण्याकडे कल दिसतो. इष्ट, स्पृहणीय अशा विवेक-युक्त श्रद्धेचा अभाव दिसतो.

आपण जी मूल्ये स्वीकारतो त्यावर श्रद्धा असल्याशिवाय चांगल्या तऱ्हेने जगणे शक्य आहे काय? श्रद्धेशिवाय मनुष्य पोचट, निराशावादी, दुबळा, भित्रा होईल. म्हणून जीवनात श्रद्धेला–विवेकयुक्त श्रद्धेला–महत्त्वाचे स्थान आहे.

श्रद्धा हा मनुष्याचा मनोधर्म आहे, ही गोष्ट ध्यानात घेऊन आपण श्रद्धेचा विचार करू. सामान्यपणे श्रद्धा ही विषयसापेक्ष असते अशी आपली कल्पना असते. उदाहरणार्थ, अमूक देवावर श्रद्धा, बुवावर श्रद्धा, इत्यादी. वस्तुतः श्रद्धा हा माणसाचा मनोधर्म आहे व त्याचा आविष्कार विशिष्ट माणसाबाबत अथवा विषयाबाबत झालेला असतो. म्हणून या मनोधर्माचे स्वरूप काय असते ते पाहणे आवश्यक ठरते. श्रद्धेचे हे स्वरूप नीट ध्यानात यावे यासाठी अश्रद्धेचे अथवा शंकेचे स्वरूप आपण पाहू.

### विवेकशून्य शंका

शंकेखोरपणा हा एखाद्याच्या व्यक्तित्वाचा विशेष असू शकतो आणि त्यामुळे तो वेगवेगळ्या गोष्टींबद्दल शंका घेत असतो. कोणत्या गोष्टीबद्दल शंका घेतो, ही दुय्यम बाब आहे. त्याचे मन सदैव शंकाकुल असते. शंका घेण्याची त्याची मनोवृत्तीच बनलेली असते आणि तीमधून ज्या शंका निर्माण होतात त्या विवेकशून्य शंका असतात. ( शंका ही विवेकयुक्त असू शकते. तिचा विचार पुढे केलेला आहे. ) विवेकशून्य शंका ही चुकीच्या गोष्टींबद्दल आलेली प्रतिक्रिया नसते; तर शंकेखोरपणातून निर्माण झालेली असते. अशा व्यक्तींचे मन व बुद्धी शंकेखोरपणामुळे डागळून गेलेली असते. तिला कोणतीच गोष्ट निश्चयात्मक स्वरूपाची न वाटता साऱ्याच गोष्टी शंकास्पद वाटतात. लग्नासाठी मुलगी पसंत करण्याचा प्रश्न असो की, फिरायला जाताना कोणते कपडे घालायचे हा प्रश्न असो, अशा व्यक्तीच्या मनाची अवस्था शंकित असते.

मनोविश्लेषणशास्त्राने आता हे सिद्ध केले आहे की, अज्ञात अशा भावनिक संघर्षातून अशा प्रकारचा शंकेखोरपणा निर्माण होतो. अशा माणसाच्या व्यक्तित्वाला सुसंवादी समतोल आलेला नसतो. शंकेखोरपणाचे मूळ माहीत होणे हा तो नष्ट करण्यावरील उपाय. तो उपाय जर शक्य झाला नाही तर असा मनुष्य मानसिक दृष्ट्या अप्रगल्भ, दुबळा राहतो आणि आपल्या दुबळेपणाचे समर्थन करण्यासाठी तो एक तर शंका काढीत राहतो अथवा दुसऱ्या कशावर तरी श्रद्धा ठेवतो आणि त्यात स्वतःला, स्वतःच्या शंकांना विलीन करून टाकतो व आपल्या दुबळेपणातून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करतो.

### विवेकयुक्त शंका

विवेकयुक्त शंकेचे स्वरूप वरच्याहून भिन्न असते. कोणत्या तरी ग्रंथाला अथवा व्यक्तीला प्रमाण मानून आपल्या अनुभवास न येणाऱ्या

गोष्टी खऱ्या म्हणून पुढे मांडल्या जातात. अशा गोष्टींच्या प्रामाण्याबद्दल, यथार्थतेबद्दल व सत्यतेबद्दल जेव्हा शंका घेतली जाते ती सयुक्तिक, विवेकयुक्त शंका होय. अशा ठिकाणी जी शंका घेतली जाते ती विचारपूर्वक असते. शंका घेणाऱ्याची निश्चित अशी भूमिका असते. विधान आणि आधार यात त्याला विसंगती दिसून आलेली असते. अशी शंका ही विवेकयुक्त शंका असते. मूल लहानपणी आई-वडिलांना प्रमाण मानून त्यांच्या सगळ्या कल्पना मान्य करीत असते, परंतु ते जसजसे अधिक विवेचक बनते तसतसे आई-वडिलांच्या अधिकारापासून स्वतःची हळूहळू सुटका करून घेते. व्यक्तित्वाची वाढ होण्याच्या दृष्टीने येथे अशा शंकेचे महत्त्व विशेष आहे. अशा शंकेमुळे प्रगल्भता वाढीस लागते. विवेकयुक्त शंका हेच, आधुनिक विचार, तत्त्वज्ञान व शास्त्र यांच्या विकासाचे मूळ आहे.

**विवेकशून्य श्रद्धा**

शंकेचा ज्याप्रमाणे विवेकशून्य शंका व विवेकयुक्त शंका असा भेद करावा लागतो तसाच फरक श्रद्धेच्या बाबतीतही करावा लागतो. श्रद्धा ही विवेकयुक्त व विवेकशून्य असते. कोणत्या तरी व्यक्तीवर वा कल्पनेवर अनुभवावाचून बसलेला प्रगाढ विश्वास ही विवेकशून्य श्रद्धा होय. ईश्वराच्या अस्तित्वाचा, त्याच्या सामर्थ्याचा वा चांगुलपणाचा अनुभव आलेला नसतो तरी त्याच्यावर श्रद्धा असते. एखाद्या कल्पनेची सत्यता पटलेली नसते, तिचा अनुभव आलेला नसतो, तरी तीवर श्रद्धा ठेवली जाते. साईबाबा वा मेहेरबाबा यांच्या सामर्थ्याचा प्रत्यय आला आहे असे स्वानुभवाने फार थोडेजण म्हणतील. तरी त्यांचे भक्त सहस्रावधी पाहावयास मिळतात. हुकूमशाही नेत्यांवर राष्ट्रच्या राष्ट्र श्रद्धा ठेवताना दिसते.

एक प्रकारची भावनिक शरणागती हे अशा श्रद्धेचे मूळ असते.

आपण दुबळे आहोत या जाणिवेतून, आत्मप्रत्ययाच्या अभावातून ही श्रद्धा निर्माण होते. स्वतःला वाटणाऱ्या भीतीतून मुक्तता करून घेण्यासाठी माणसे तथाकथित समर्थ व्यक्तीवर, विवेकशून्य सत्तेवर श्रद्धा ठेवतात. ही श्रद्धा विवेकशून्य श्रद्धा होय.

शरणागतीची वृत्ती आणि बौद्धिक, भावनिक प्रक्रिया यांचा काय संबंध आहे ते जरा बारकाईने पाहू. [अप्रगल्भ मनाची, दुबळी व्यक्ती स्वतःचे आंतरिक स्वातंत्र्य सोडून देते व प्रभावी व्यक्तीची शरणागती पत्करते, प्रभावी व्यक्तीचा अनुभव स्वतःचा मानायला लागते. प्रगल्भ, विवेकशील मनुष्य स्वतःचा अनुभव प्रमाण मानतो व त्याला अनुसरून वर्तन करीत असतो. लहान मूल अप्रगल्भ दुबळे असते आणि ते वडील-धाऱ्यांचा अनुभव प्रमाण मानून चालते. शरणागतीची मनोवृत्ती अस-णाऱ्या अंधश्रद्ध माणसाचे वर्तन काहीसे लहान मुलासारखेच असते. अथवा त्याची तुलना संमोहनातील व्यक्तीशी करता येईल. संमोहनातील व्यक्तीवर संमोहन करणाऱ्याची सत्ता चालते. ती व्यक्ती संमोहनात असताना संमोहक त्या व्यक्तीला जे जे सूचित करतो ते ते त्या व्यक्तीला पटत जाते व त्याप्रमाणे त्या व्यक्तीचे वर्तनही घडू लागते. एवढेच नव्हे तर संमोहनात दिलेल्या भविष्यकालात अंमलात आणावयाच्या सूचना संमोहन संपल्यानंतरही ती व्यक्ती अंमलात आणते. पण तिची कल्पना मात्र अशी असते की, आपण होऊन स्वतःच्या बुद्धीने या गोष्टी करीत आहोत. उदाहरणार्थ, संमोहक मनुष्य संमोहित व्यक्तीला सूचना करतो, 'तुला अमूक वाजता थंडी वाजायला लागेल. त्या वेळी तू कोट घाल.' संमो-हनेतून जागी झाल्यानंतर ती व्यक्ती त्या विशिष्ट वेळी कोट घालते तिला जर विचारले, "हवा एवढी गरम असता तू कोट का घातलास?" तर ती उत्तरते, "मला थंडी वाजते म्हणून मी कोट घातला आहे." त्या व्यक्तीची कल्पना मात्र अशी असते की, आपण आपल्या मताप्रमाणे वागत आहोत.

लोकांच्या मनावर हुकूमत गाजविणाऱ्या हुकूमशहाच्या आदेशांचा परिणाम काहीसा वरच्याप्रमाणे असतो. लोकांनी आधी हुकूमशहाची सत्ता मान्य केलेली असते, त्याच्या पुढे शरणागती पत्करलेली असते व नंतर त्याचे विचार अविवेचकपणे स्वीकारलेले असतात. पण त्यांची भ्रामक कल्पना मात्र अशी असते की, आपल्याला त्याचे विचार पटलेले आहेत. प्रभावी वक्त्याने रात्रीच्या वेळी प्रचारसभा घ्याव्या असे हिटलरचे मत होते. कारण रात्रीच्या वेळी लोकांची इच्छा-शक्ती, विरोध करण्याची ताकद कमी झालेली असते. मानसशास्त्रीय सत्याचा आपल्या भीषण महत्त्वाकांक्षेसाठी उपयोग करून घेण्याचे कसब हिटलरपाशी होते हे मानावे लागेल.

विवेकशून्य श्रद्धेचे स्वरूप आहे ते असे. लोक दुबळेपणाने विशिष्ट देवकल्पनेला, धर्मकल्पनेला, आध्यात्मिक बुवाला, हुकूमशाही नेत्याला शरण जातात. त्यांची विवेकशक्ती लोप पावते आणि या मनोवृत्तीतून विवेकशून्य श्रद्धा निर्माण होते.

## विवेकयुक्त श्रद्धा

अविवेकी सत्तेपुढे विनम्र होण्याच्या वृत्तीतून, शरणागतीतून निर्माण होणारा विश्वास म्हणजे विवेकशून्य श्रद्धा. तर याउलट, व्यक्तीच्या स्वतःच्या विचारातून, परिपक्व व्यक्तिमत्त्वातून, विवेचकतेतून निर्माण होणारा अढळ विश्वास म्हणजे विवेकयुक्त श्रद्धा होय. ही श्रद्धा स्वतःच्या अनुभवातून निर्माण झालेली असते. 'पूर्ण विचारांती बनविलेले आपले मत बरोबर आहे ' असा विश्वास विवेकशील माणसाला वाटत असतो व तो त्या मतावर श्रद्धा ठेवतो. मानवी जीवनाचा विकास होण्याच्या दृष्टीने लोकशाही जीवनपद्धती अवलंबिणे आवश्यक आहे अशी त्याची स्वतःची श्रद्धा बनते. अमूक नेत्याने सांगितलेला मार्ग बरोबर आहे किंवा नाही

याचा पूर्ण विचार करून तो त्या नेत्यावर व त्याच्या आदेशावर श्रद्धा ठेवतो. तो बाह्य सत्ता प्रमाण मानीत नाही तर स्वतःची विवेकशीलता प्रमाण मानतो आणि मग व्यक्तीवर, तत्त्वावर वा मूल्यांवर श्रद्धा ठेवतो. स्वतःची अनुभवनिष्ठता आणि विवेकबुद्धीचा कौल हे विवेकयुक्त श्रद्धेचे विशेष होत.

विवेकशील विचारात श्रद्धेला स्थान नसते अशी एक सर्वसामान्य समजूत आढळते. वस्तुतः विवेकशील विचारातही श्रद्धा हा महत्त्वाचा घटक असतो. शास्त्रज्ञाच्या ठिकाणीही श्रद्धा असावी लागते. भरपूर अभ्यास, चिंतन, निरीक्षण यामुळे काही एक विशिष्ट शोध लागू शकेल या श्रद्धेतूनच शास्त्रज्ञ अपार श्रम करीत असतो. त्याची तर्कबुद्धीवर श्रद्धा असते, शास्त्रीय पद्धतीवर श्रद्धा असते आणि त्याची ही श्रद्धा स्वतःच्या अनुभवावर आधारलेली असते.

विचार आणि निर्णय एवढेच श्रद्धेचे क्षेत्र नाही. मानवी आचरणातही श्रद्धेला फार मोठे स्थान आहे. मैत्री, प्रेम, चांगुलपणाचे वर्तन श्रद्धेशिवाय अशक्य आहे. दुसऱ्या व्यक्तीवरील श्रद्धा वा विश्वास म्हणजे तिच्या स्थिर विश्वसनीय मनोवृत्तीवरील विश्वास. दुसऱ्याच्या चांगुलपणावर विश्वास अथवा श्रद्धा नसेल तर आपल्याला इतरांशी चांगले वर्तन करणे अशक्य होईल. आपल्या आचरणात सुसंगती राहणार नाही. एकंदर मानवजातीच्या प्रतिष्ठे-बद्दल विश्वास असणे हा माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग असतो.

**स्वतःवरील श्रद्धा**

इतरांवर जशी आपली श्रद्धा असते त्याच अर्थाने आपली आपल्यावर श्रद्धा असते. स्वतःबद्दलची, बदलणाऱ्या परिस्थितीतही अचल राहू पाहणाऱ्या आपल्या सत्प्रवृत्तीची, आपल्या व्यक्तित्वाची आपल्याला जाणीव असते. त्यावर आपली श्रद्धा असते. ‘ मी ’ हा आपल्या व्यक्तित्वाचा गाभा. त्यावर जर आपली श्रद्धा नसेल तर आपण परावलंबी होऊ, स्वतः-वर अवलंबून न राहता एखाद्या बाह्य सत्तेवर, दुसऱ्या व्यक्तीवर अवलं-

वून राहू व स्वत्व विसरू. ज्याचा स्वतःवर विश्वास असतो तो दुसऱ्यावर विश्वास ठेऊ शकतो; दुसऱ्यासाठी काही एक करू शकतो. म्हणून स्वतः-वरची श्रद्धा व इतरांवरची श्रद्धा या एका अर्थाने एकरूप होत.

इतरांबद्दल वाटणाऱ्या विश्वासाची परिणती अखिल मानवजातीबद्दल वाटणाऱ्या विश्वासात होते. गेल्या दीडदोनशे वर्षांत राजकीय, सामाजिक क्षेत्रात जे नवीन विचार आले ते या श्रद्धेचाच अविष्कार म्हणून. आपले मूल हळूहळू वाढेल, चालेल, बोलू लागेल, प्रेम करू शकेल अशी आईची श्रद्धा असते, त्याप्रमाणेच हा विचार आहे. अनुकूल परि-स्थिती प्राप्त करता आली तर मनुष्य स्वतःच्या ठिकाणी असणाऱ्या सामर्थ्याच्या साहाय्याने समता, न्याय, प्रेम यांवर आधारलेली समाज-रचना करू शकेल या श्रद्धेतून प्रयत्न होत आले आहेत; ते अधिका-धिक होण्याची गरज आहे. त्यासाठी अशा श्रद्धेची नितान्त आवश्यकता आहे. ही श्रद्धा म्हणजे काही स्वप्नरंजन नाही की, भोळसट आशावाद नाही. त्याला आतापर्यंतच्या प्रगतीचा आधार आहे. मनुष्याच्या ठिकाणी असणाऱ्या विवेकशीलतेचा, सत्प्रवृत्तींचा आधार आहे.

**श्रद्धेची प्रेरकता**

श्रद्धेबद्दलचा एक गैरसमज दूर होणे आवश्यक आहे. श्रद्धा असलेला मनुष्य आपल्याला इच्छित गोष्टीची प्राप्ती आपोआप होईल असे समजून स्वस्थपणे वाट पाहात बसतो, असा एक समज आहे. विवेकशून्य श्रद्धेच्या बाबत हा समज खराही आहे. मात्र विवेकयुक्त श्रद्धा अशी नसते. ती माणसाच्या अनुभवातून निर्माण होत असल्याने अशा माणसाच्या ठिकाणी असणाऱ्या आंतरिक विधायक प्रवृत्ती कृतिशून्य राहाणे अशक्य असते. त्याची श्रद्धा असते ती, अमूक केले तर अमूक घडेल, या स्वरूपाची. त्याचा विश्वास जसा विवेकशीलतेवर आणि चांगुलपणावर असतो तसाच तो स्वतःच्या सामर्थ्यावर असतो.

# ८ विवेक आणि धर्मकल्पना

गॅलिलिओ, न्यूटन, बेकन यांच्या शोधांमुळे आणि विचारांमुळे साधारणपणे पंधराव्या–सोळाव्या शतकापासून नवीन शास्त्रीय युगाला सुरुवात झाली असे म्हणता येईल. या शास्त्रीय युगात मानवजातीने आतापर्यंत केली नव्हती एवढी प्रगती ज्ञानाच्या क्षेत्रात केली. विवेकशील दृष्टिकोण बऱ्याच प्रमाणात वाढीस लागला. कित्येक हजार वर्षांत मानवाला जी प्रगती करता आली नाही ती शास्त्रीय विचारपद्धतीमुळे व विवेकवादी दृष्टिकोणामुळे गेल्या तीनशे वर्षांत झाली असे दिसून येईल.

सात हजार वर्षांपासून स्थिर अशा मानव संस्कृती अस्तित्वात आल्या. भौतिक दृष्ट्या अधिक सुखसोयी उपलब्ध करून देणारे काही शोधही या प्रदीर्घ कालखंडात लागले; परंतु खऱ्याखुऱ्या ज्ञानाची प्राप्ती होऊन माणसामाणसातले संबंध सुधारले, त्यांच्या मानवी गुणांचा विकास आणि आविष्कार झाला असे मात्र दिसत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे गेल्या तीन हजार वर्षांपासून सोळाव्या शतकापर्यंत मानवाच्या मनावर असलेले धर्मकल्पनांचे अधिराज्य हे होय. या सबंध कालखंडात धर्मकल्पनांचा मानवी मनावर विलक्षण प्रभाव होता. त्यामुळे केवळ ऐहिक दृष्टीने यथार्थ ज्ञानाची प्राप्ती करून घेण्याचे फारसे प्रयत्न झाले नाहीत. पारलौकिक जीवनाचा विचार बाजूला ठेवून, केवळ मानवी ध्येये, ऐहिक

सुखसंवर्धन यांचा विचार करून मानवी समाजाची रचना करण्याचे फारसे प्रयत्न झाले नाहीत. केवळ मानवी विकासासाठी नीतीचा विचार झाला नाही.

विवेकवादी दृष्टिकोणाचा विकास होण्याच्या बाबतीत धर्मकल्पनांचा दोन प्रकारे अनिष्ट परिणाम झाला. एक यथार्थ ज्ञान मिळविण्याच्या बाबतीत धर्मकल्पनांचा अडथळा निर्माण झाला. दुसरे कारण म्हणजे मानवी जीवनाकडे बघण्याचा चुकीचा दृष्टिकोन धर्मकल्पनेमुळे मानवासमोर ठेवला गेला.

## ज्ञानाला प्रतिरोध

निसर्गातील घटनांच्या सत्य-स्वरूपाचे आकलन, मानवी जीवनासंबंधी आकलन आणि मनुष्य व निसर्ग यांच्या परस्परसंबंधांचे आकलन हे यथार्थ ज्ञानाचे स्वरूप आहे. हे ज्ञान जितके अधिक होईल तितक्या अधिक प्रमाणात मनुष्याचा विकास होतो. निसर्गापासून त्याला स्वातंत्र्य मिळते व त्याच्या ठिकाणी असणाऱ्या मानवी गुणांचा अधिकाधिक विकास होण्याची शक्यता निर्माण होते. परंतु या यथार्थ ज्ञानप्राप्तीच्याच आड धर्मकल्पना आल्या. बहुतेक धर्मात ईश्वराच्या सर्वशक्तिमान अशा कर्तृत्वाचे वर्णन करून विश्वरचनेचे रहस्य उलगडून दाखविलेले आहे. या विश्वाची, पृथ्वीची व पृथ्वीवरील प्राणिमात्रांची निर्मिती ईश्वराने कशी केली, कोणत्या क्रमाने व कोणत्या हेतूने केली हेही सांगितलेले आहे. हे धर्मसंस्थापक शास्त्रज्ञ नव्हते. त्यांना प्रयोगांती अथवा निरीक्षणानंतर विश्वरचनेचे रहस्य खरोखरी कळले अशातील भाग नव्हता; परंतु त्यांचे चारित्र्य निष्कलंक व मानवहिताबद्दलची त्यांची तळमळ उत्कट होती. त्यांच्या उदात्त व्यक्तिमत्त्वाने त्यांचे अनुयायी दिपून गेले. त्यामुळे विश्वरचनेसंबंधी त्यांची मते त्यांच्या अनुयायांनी अतिशय आदरपूर्वक जशीच्या तशी स्वीकारली; इतकी की, धर्माविरुद्ध वैज्ञानिक सत्य मांडणाऱ्या शास्त्रज्ञांचा धर्मपीठांकडून छळ करण्यात आला.

विश्वघटना आणि अध्यात्म यांची सांगड धर्मसंस्थापकांनी घातली. त्यामुळे विश्वाचे खरे स्वरूप समजून घेण्याच्या दिशेने माणसाला प्रयत्नच करता आला नाही; विश्वात आपले स्थान काय याचाही त्याला शोध घेता आला नाही. सृष्टीची निर्मिती विकासक्रमात झालेली आहे; निसर्गात काही एक सुसंगती आहे; निसर्गतत्त्वांच्या मुळाशी एखादी वेगळी अतिभौतिक शक्ती नाही आणि मनुष्य केवळ त्या अतिभौतिक शक्तीच्या हातातील खेळणे नाही, या गोष्टींचे आकलनच त्याला होऊ शकले नाही. धर्मग्रंथात सांगितलेली विश्वाची उत्पत्ती त्याने प्रमाण मानली. स्वतःच्या बुद्धीने त्याने सत्याचा शोध घेतला नाही. या सृष्टीत आपले स्थान अत्यंत क्षुद्र आहे ही दुबळेपणाची भावना त्याने स्वीकारली. आपण आपल्या सामर्थ्याचा विकास करून घेऊन आपण आपल्या कल्पनेप्रमाणे जगू शकतो, हे त्याच्या ध्यानात आले नाही. धर्मग्रंथात सांगितलेल्या ज्ञानावर त्याने विश्वास ठेवला. ते पारखून बघितले नाही. त्यामुळे तो यथार्थ ज्ञानाला मुकला आणि स्वकल्पनानिर्मित बंधनात अडकून राहिला.

**पारलौकिक दृष्टिकोन**

ज्ञान आणि आचरण यांचा अतूट संबंध आहे. ज्ञान जर चुकीचे असेल तर त्यावर आधारलेले वर्तन अर्थातच चुकीचे ठरते. कारण यथार्थ ज्ञानाच्या द्वाराच योग्य आचरणाचे मार्गदर्शन घडत असते. गेल्या अडीच तीन हजार वर्षांत धर्मकल्पनांचा प्रभाव मानवी मनावर व पर्यायाने आचरणावर होता. धर्माने जे ज्ञान म्हणून प्रतिपादले ते अज्ञान होते. म्हणून त्यावर आधारलेल्या मानवी वर्तनाची दिशाच चुकली असे म्हणावे लागते.

आत्मा, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक, आत्म्याची सद्गती, इत्यादी गोष्टी धर्माने गृहीत धरल्या. माणसाच्या ठिकाणी आत्मा असतो या सिद्धांतातून इतर उपसिद्धान्त निघाले. आत्मा नष्ट होत नाही तर तो अन्य

शरीरात प्रवेश करतो वा अन्य लोकात जातो, या कल्पनेतून पुनर्जन्म, स्वर्ग, नरक इत्यादी वेगवेगळ्या कल्पना निर्माण झाल्या. आत्म्याला कर्मसिद्धान्त लागू करण्यात आला. पाप-पुण्याची कल्पना पुनर्जन्माशी निगडित करण्यात आली. अमुक कर्मे केली तर स्पृहणीय अशा स्वर्ग-लोकाची प्राप्ती होते; तमुक दुष्कर्मे केली तर यातनामय नरकात रवानगी होते. मागच्या जन्मातील कर्मांमुळे हा जन्म प्राप्त होतो आणि पुढील जन्मी स्वर्ग प्राप्त व्हावा यासाठी या जन्मात विशिष्ट कर्मे केली पाहिजेत असा विचार सांगण्यात आला. यात व्यक्तीला कर्म करण्याचे स्वातंत्र्यच राहिले नाही. मला अमुक एक चांगले वाटते ते मी करीन असे म्हणण्यात माणसाच्या व्यक्तित्वाचा विकास दिसतो, त्याचे व्यक्तिस्वातंत्र्य प्रत्ययाला येते; परंतु हे स्वातंत्र्य त्याला राहिले नाही. त्याला स्वतःच्या कल्पने-प्रमाणे स्वतःच्या व्यक्तित्वाचा विकास करून घ्यायला अवसर राहिला नाही. तो धर्मकल्पनेच्या हातातील एक खेळणे बनला. पतीच्या मृत देहाबरोबर स्वतःला जाळून घेण्यात पत्नीला व्यक्ती म्हणून अस्तित्वच उरत नाही मग स्वातंत्र्य ते कोणते राहणार ?

धर्माने आपली दृष्टी रोखली ती परलोकावर; ध्यास धरला तो आत्म्याची सुटका करण्याचा आणि उपाय सांगितला तो आत्मक्लेशाचा आणि विरक्तीचा. त्यामुळे या सबंध कालखंडात पारलौकिक दृष्टिकोन हाच प्रभावी ठरला. ऐहिक दृष्टिकोणाची वाढच झाली नाही. आम्हा मानवांना या इहलोकात जगायचे आहे, चांगल्या तऱ्हेने जगायचे आहे; आम्ही मानव एकाच माणुसकीच्या नात्याने बद्ध आहोत; आमच्या गुणांचा विकास करून आम्हा सगळ्यांचे जीवन विकसित, समृद्ध करायचे आहे; ते करण्यासाठी बौद्धिक, मानसिक सामर्थ्य आमच्या ठायी आहे, अशा प्रकारचा इहलोकनिष्ठ विचार प्रबळ झाला नाही.

## धर्मांचे नैतिक आदेश

येशू ख्रिस्त, गौतम बुद्ध, महंमद पैगंबर इत्यादी धर्मसंस्थापकांनी मानवजातीला नैतिक आचरणाचे जे आदेश दिले ते मानवी सद्गुणांची वाढ व्हावी, समाजाचे नियंत्रण सुरळीत व्हावे यासाठी. वस्तुतः धर्मातील महत्त्वाचा भाग हाच. त्यांनी शांती, दया, प्रेम, सहकारित्व इत्यादी सद्गुणांची शिकवण दिली. त्यांची ही शिकवण मानवजातीने ध्यानात घेतली असती तर त्या कल्पनानिर्मित स्वर्गापेक्षा इथे काहीही उणे दिसले नसते. विवेकशील वर्तनाला साहाय्यभूत अशा नीतितत्त्वांचे अथवा मानवी सद्गुणांचे प्रतिपादन बहुतेक धर्मांनी केलेले असताही विवेकशील दृष्टिकोणाची वाढ मात्र झाली नाही. असे का घडले ?

याचे महत्त्वाचे कारण हे की या सद्गुणांच्या आचरणाला आधार दिला गेला तो पारलौकिकाचा; ऐहिकाचा नव्हे. परलोकात इष्ट गती मिळावी हेच उद्दिष्ट सद्वर्तनासाठी पुढे ठेवले गेले. म्हणजे मुख्य भर राहिला तो पारलौकिक ध्येयावर. मानवता हे ध्येय राहिले नाही, तर अनेक साधनांपैकी मानव सेवा हे एक साधन ठरले. आपल्याला मनुष्य-जन्म लाभला ही एक आध्यात्मिक कल्याण साधण्याची संधी होय, हाच मानवी जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोण राहिला. मानवी जीवनाचे स्वतंत्र ऐहिक मोल धर्माने ध्यानात घेतले नाही. सद्गुणांच्या वाढीपेक्षा परलोकाची प्राप्ती डोळ्यांसमोर ठेवून सामाजिक नियमने निर्माण झाली. ही समाजरचना, या सामाजिक संस्था, ही कर्तव्ये आमच्या माणुसकीचा विकास करणारी आहेत, म्हणून ती अशी असावीत हा ऐहिक विचार माणसाच्या डोळ्यांसमोर राहिला नाही. ऐहिक सद्गुणांना दुय्यम स्थान मिळाले. पापांचे क्षालन करून आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गातील अडथळे दूर करण्याच्या युक्त्याही पुढच्या काळात उपलब्ध करून देण्यात आल्या. यामुळे धर्माने सांगितलेली नैतिक शिकवण ही प्रभावी

झाली नाही. एवढेच नव्हे, तर धर्मकल्पनेचा विपर्यास करून माणसे आचरण करू लागली. उदात्त नीतितत्त्वांचा अवलंब होण्याच्या ऐवजी कर्मठ कर्मकांड माजले. सहिष्णुतेचे तत्त्वज्ञान स्वीकारण्यासाठी सक्ती व्हायला लागली. प्रेमाच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार होण्यासाठी लढाया व्हायला लागल्या. पुढच्या जन्मी आत्मा स्वतंत्र व्हावा यासाठी या जन्मात त्याच्यावर बंधने लादण्यात येऊ लागली. धर्मकल्पनेने व्यक्तीच्या व्यक्तित्वाचा विकास न करता त्याचा लोप करून टाकण्याचाच उद्योग आरंभला.

धर्माने दिलेली मानवी सद्गुणांची शिकवण प्रभावी ठरली नाही याचे दुसरे एक कारण आहे. मानवी सद्गुण हे सामाजिक सद्गुण आहेत. आणि ते धर्माने सांगितलेल्या एकांतवास, आत्मक्लेश या तत्त्वांशी विसंगत आहेत. बांधवांवर प्रेम करा, दुर्बलांना साहाय्य करा, इत्यादी आदेश हे सामाजिक सद्गुणांचा परिपोष करणारे आहेत. या गुणांचा आविष्कार आणि विकास समाजातच व्हावयाचा व त्यामुळेच मानवी जीवन अधिक उन्नत व्हावयाचे; परंतु या आदेशाबरोबरच आध्यात्मिक उन्नतीसाठी एकांतवास करा, देहदंड सोसा हेही आदेश दिले गेले. यात विसंगती आहे. एकांतवास, आत्मक्लेश हे मार्ग वरवर पाहताही अधिक खडतर वाटणारे. या मार्गात ज्यांनी प्रगती केली त्यांच्याबद्दल आदर आणि वचक इतरांना अधिक वाटणे स्वाभाविक आहे. या कारणामुळे सामाजिक सद्गुणांना गौणत्व प्राप्त झाले आणि धर्माची ही शिकवण उपेक्षितच राहिली.

बहुतेक धर्मांत पुरोहितवर्ग हा प्रभावी राहिलेला दिसतो. सर्वसामान्य लोकांवर बौद्धिक गुलामगिरी लादण्याचे फार मोठे अपश्रेय या वर्गाकडे जाते. लोकांच्या अज्ञानाचा, भोळसटपणाचा आणि श्रद्धेचा फायदा पुरोहितवर्गाने स्वार्थासाठी घेतला. धर्मातील चांगल्या भागाकडे लोकांचे

लक्ष वळविणे त्यांना शक्य होते; परंतु धर्मातील नैतिक मूल्यांवर पुरोहितांनी भर दिला नाही. त्यांनी लोकांची भीती वाढविली, आचारधर्म अधिकाधिक गुंतागुंतीचा केला, मोक्षाचे वा पापक्षालनाचे आमिष सतत दाखविले व कर्मकांडाचे महत्त्व वाढविले. लोकांच्या अंधश्रद्धा बळकट केल्या व बौद्धिक गुलामगिरी अधिक पक्की केली.

आतापर्यंत आपण धर्माच्या सर्वसामान्य परिणामांचा विचार केला. आता प्रमुख धर्मांचा विचार करू. या धर्मातील विवेकशीलतेला विरोधी ठरणाऱ्या मूळ कल्पना काय आहेत, इतर विशेष कोणते आहेत यांचा विचार करू.

**सनातन आर्य धर्म**

इसवी सन पूर्व २,००० हा ऋग्वेदाचा कालखंड स्थूलपणे प्रमाण मानला जातो. वेदकाळात देवतांची कल्पना निर्माण झाली आणि प्रभावी ठरली. निसर्गातील घडामोडी पाहून माणसाचे मन थक्क होत होते. सृष्टीत जे जे विस्मयकारक आढळले त्याच्याकडे माणसाचे मन आकृष्ट झाले. या सर्व घटनांच्या वा चमत्कारांच्या मुळाशी यातुशक्ती आहे असे त्याला वाटले व त्याने विविध यातुप्रधान देवतारूपे कल्पिली. कल्याणप्रद घटनांवर वायू, अग्नी, पर्जन्य या देवतांची व अडथळा करणाऱ्या घटनांवर वायू, द्रुह इत्यादी अनिष्ट देवतांची कल्पना निर्माण केली.

ऋग्वेदकाळात सृष्टीचे त्रिलोकात्मक रूप कल्पिले गेले. पृथ्वी, अंतराळ व स्वर्ग हे तीन लोक व या तीन लोकांत निरनिराळ्या देवता मानल्या. पृथ्वी, अग्नी, सोम इत्यादी पृथ्वीवरील देवता; इंद्र, वायू, पर्जन्य इत्यादी अंतराळातील देवता; तर वरुण, मित्र, उषा इत्यादी स्वर्गातील देवता.

या देवतांना अखेर मानवी बुद्धीनेच निर्माण केले असल्यामुळे त्यांना आकारही मानवसदृश प्राप्त झाला. त्यांच्या गरजा व भावना मानवीच गणल्या गेल्या. यज्ञात दूध, तूप, मांस यांची आहुती टाकल्यानंतर ती

५५११८


या देवतांना पोहोचते व त्या संतुष्ट होतात, आपल्या इच्छा तृप्त करतात, पापांचा नाश करतात व जगाचा कारभार नीट चालवितात; त्या सज्जनांचे संरक्षण व दुष्टांचे निर्दालन करतात, अशी प्राचीन आर्यांची देवताविषयक समजूत होती.

आर्यांच्या देवतांना उद्देशून केलेल्या प्रार्थना अशा प्रकारच्या असत : "आम्हाला विपुल पशुधन मिळो, उत्तम निवासस्थान प्राप्त होवो, शंभर वर्षे एवढे आयुष्य आम्हास लाभो, वीरपुत्रांनी युक्त अशा आम्हास मोठमोठ्या सभांतून उच्चरवाने, हे देवतांनो ! तुमची प्रार्थना करण्याचे भाग्य लाभो. आम्ही हे नवीन अधिक सामर्थ्यसंपन्न असे स्तोत्र, हे देवा ! तुला उद्देशून रचिले आहे, पूर्वीही आम्ही सतत तुझे यशोगान करीत आलो. तर मग आमची प्रार्थना ऐकून तू येथे यावेस, आमच्या शत्रूंचे निर्दालन करावेस, आमचे अभीष्ट आम्हास द्यावेस हे उचित नव्हे काय ?"

ऋग्वेदातील अनेक प्रार्थनांमधून आर्यांची समृद्धीची इच्छा हा ऐहिक भाग दिसतो; परंतु याचबरोबर हीच समृद्धी मिळविण्यासाठी देवतांची प्रार्थना करण्याचा, अलौकिक शक्तीला शरण जाण्याचा मार्गही ते स्वीकारतात हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. निसर्गाचे अधिकाधिक ज्ञान वास्तव पातळीवरून मिळविण्याचा प्रयत्न दिसत नाही. म्हणून अधिक समृद्धीसाठी 'नवीन सामर्थ्यसंपन्न स्तोत्र' रचावे हा मार्ग त्यांनी अवलंबिलेला दिसतो. देवतांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञसंस्था अस्तित्वात आली.

आर्यांच्या मते मृत्यूनंतर मनुष्य यमलोकात जातो व तेथून कर्मानुसार सुखदायक पितृलोकात अथवा यातनामय नरकात जातो.

प्राचीन आर्य ऐहिकाची उपासना करणारे होते; परंतु परलोक, देवता इत्यादी अतिभौतिक कल्पनांवरच ते अंध पण दृढ विश्वास ठेवीत. हेतू ऐहिक आणि तो साध्य करण्याचे साधन अतिभौतिक असा प्रकार

त्यांच्या बाबतीत झाला. या कालखंडात निर्माण झालेल्या देवता, परलोक, कर्मवाद या कल्पनांनी पुढच्या प्रदीर्घ कालखंडात भारतीय मनावर अधिराज्य गाजविले.

**बौद्ध धर्म**

वैदिक धर्मातील यज्ञसंस्था व कर्मकांड यांची प्रतिक्रिया म्हणून गौतम बुद्धांनी (इ. स. पूर्व ५६३ ते ४८७) बौद्ध धर्माची स्थापना केली असे म्हटले जाते.

गौतम बुद्धाने शाश्वत सत्याची ओळख करून घेण्यासाठी व अज्ञान, तृष्णा आणि भोगविलास यांचा नाश करण्यासाठी पुढील चार तत्त्वे सांगितली. (१) संसार हा दुःखपूर्ण आहे. (२) तृष्णा, लोभ, भोग ही या दुःखाची कारणे आहेत. (३) यांचा निरोध करून या दुःखातून मुक्त होता येईल व जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमची मुक्तता मिळेल.(४) दुःखाचा नाश करण्याचा एक मार्ग आहे. तो म्हणजे 'आर्य अष्टांगमार्ग' होय.

गौतम बुद्धांनी सांगितलेला आर्य अष्टांगमार्ग म्हणजे चांगल्या आचरणाबद्दलचे नीतिनियम होत. ते असे : कोणालाही दुःख होईल असे बोलू नये; परनिंदेपासून अलिप्त असावे; कोणालाही त्रास होईल असे वागू नये; चांगल्या कर्माने व्यवसाय चालवावा; रागद्वेषापासून दूर राहावे; नीतीच्या आणि परहिताच्या चिंतनात काळ घालवावा; सदाचार ठेवावा व हिंसा करू नये; आणि शेवटचे तत्त्व, संसार दुःखपूर्ण आहे हे लक्षात ठेवून चार आर्यसत्यांवर विश्वास ठेवावा.

गौतम बुद्धांनी सांगितलेला अष्टांगमार्ग म्हणजे उदात्त नीतितत्त्वांची शिकवण होय. परंतु इतर धर्मात आढळते तीच विसंगती बौद्धांच्या तत्त्वज्ञानात आहे. त्यांनी सामाजिक सद्‌गुण वाढीस लागून मानवी जीवन अधिक विकसित आणि सुखद व्हावे असे आचरणाचे नियम सांगितले; परंतु या ऐहिक, सामाजिक विचाराला अत्यंत विरोधी अशा निवृत्तीच्या

किंवा वैराग्याच्या तत्त्वज्ञानाची बैठक दिली. संसार हा दुःखमय आहे, त्यातून सुखाची अपेक्षा करणे चूक; म्हणून प्रत्येकाने जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होण्याचे ध्येय ठेवावे, हे तत्त्वज्ञान ऐहिकाबद्दल अरुची निर्माण करणारे आहे. जीवनाबद्दल विरक्ती व सामाजिक सद्गुणांची वाढ या दोन विरोधी गोष्टी बौद्धांनी आपल्या तत्त्वज्ञानात एकत्र आणल्या. ऐहिक जीवनाची उन्नती हे ध्येय असेल तरच सामाजिक सद्गुणांना अर्थ प्राप्त होतो. म्हणून ज्यांनी गौतम बुद्धांचा आध्यात्मिक विचार स्वीकारला त्यांना त्यांच्या नैतिक शिकवणीचे तितकेसे मोल वाटले नसावे. तसेच, सदाचरणाने मनुष्य जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून का व कसा सुटतो हेही त्यांनी दाखविले नाही. या कारणांनी गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान, ज्ञानप्राप्ती आणि मानवी जीवनाकडे बघण्याचा योग्य दृष्टिकोन या बाबतीत फारसे मदत करू शकले नाही.

**ख्रिश्चन धर्म**

येशू ख्रिस्ताने प्रस्थापित केलेल्या धर्माचे वैशिष्ट्य त्यात असलेल्या नैतिक शिकवणुकीत आहे आणि या बाबतीत त्याचे बौद्ध धर्माशी विशेष साम्य आहे. ईश्वराचे प्रेम संपादन करणे हे मानवी जीवनाचे उद्दिष्ट होय आणि आपल्या बांधवांवर प्रेम करणे हा ईश्वराचे प्रेम संपादन करण्याचा मार्ग आहे, अशी येशू ख्रिस्ताची मुख्य शिकवण आहे. प्रेमाप्रमाणेच सहिष्णुता, औदार्य इत्यादी नैतिक गुणांचे प्रतिपादन येशूने केले. रोमन साम्राज्यातील पाशवीपणाला विटलेल्या सामान्य जनांना येशूचे हे तत्त्व-ज्ञान फार आकर्षक वाटले. परमेश्वर एकच आहे, उच्च-नीचांच्या, म्हण-जेच सर्वांच्या आत्म्याला स्वर्ग लाभू शकतो, यांसारख्या इतरही आक-र्षक वाटतील अशा कल्पना ख्रिस्ती धर्मात आहेत. या कारणाने येशूने प्रवर्तित केलेल्या धर्माने त्या काळची गरज भागू शकत होती. म्हणून पुष्कळ छळ आणि विरोध होऊनही या धर्माचा प्रसार झाला.

इतर धर्मांप्रमाणेच ख्रिस्ती धर्माचा परिणामही शास्त्रीय ज्ञानाला व ऐहिक जीवनदृष्टीला विरोध करण्यात झाला. ख्रिस्त शतकापासून तेराव्या शतकापर्यंत युरोपमध्ये ज्ञानाच्या दृष्टीने जे तमोयुग निर्माण झाले त्याचा दोष काही अंशी ख्रिश्चन धर्माकडे जातो, असे काही विद्वानांचे मत आहे. शरीरशास्त्राची उभारणी करणाऱ्या गेलनचा मृत्यू इ. स. २०० मध्ये झाला. ' शब्दप्रामाण्यावर विसंबून राहू नका, धर्माचा व शास्त्रज्ञानाचा काही संबंध नाही; तेव्हा स्वतः प्रयोग करा व ज्ञान मिळवा ' असे सांगणारा रॉजर बेकन ( इ. स. १२१० ते १२९३ ) तेराव्या शतकात होऊन गेला. या दोघांच्या मधल्या एक हजार वर्षांच्या कालखंडात युरोपमध्ये एकही नाव घेण्याजोगा शास्त्रीय विचार निर्माण झाला नाही. येशू ख्रिस्त हा काही शास्त्रज्ञ नव्हता. जगाच्या निर्मितीसंबंधी त्याने जे मत सांगितले ते त्याने संशोधिलेले मत नव्हते, तर त्याच्या काळात प्रसृत असलेल्या मताचाच तो प्रतिध्वनी होता; परंतु धर्मसंस्थापकाचा शब्दन् शब्द प्रमाण मानणाऱ्या नंतरच्या अनुयायांनी बायबलमधील जगाच्या निर्मितीबद्दलची व स्वरूपाबद्दलची माहिती प्रामाण्य बुद्धीने खरी मानली. चौकस बुद्धीच्या निरीक्षणाला आणि स्वतंत्र विचाराला ख्रिस्ती धर्माच्या प्रभावामुळे अवसरच राहिला नाही. बुद्धिमंतांची प्रज्ञा धर्मातीत विषयाकडे वळली नाही. पाप, पापक्षालन, मुक्ती इत्यादी कल्पना ख्रिश्चन धर्माने नव्याने मांडल्या नसल्या तरी त्यांच्यावर भर दिला होता. या विषयाकडेच बुद्धिमतांची बुद्धि वळली व ते ईश्वरचिंतनात मग्न होत राहिले.

शास्त्रीय ज्ञानापासून मने पराङ्मुख करणारा आणखी एक विचार सेंट पॉलने मांडला. शरीर आणि शरिराशी संबंधित असे जे जे असेल ते ते चिंतनास अयोग्य या विचारामुळे गूढ, अतिभौतिक तत्त्वांना महत्त्व आले. गरजेपुरते शरीरसुख घ्यावे व बौद्धिक कार्यात रममाण व्हावे, हा ग्रीकांचा विचार होता. तर सेंट पॉलने शरीर हा आध्यात्मिक ध्येय-

प्राप्तीतील अडथळा आहे म्हणून देहदंडन करणे आवश्यक आहे हा विचार सांगितला. परमेश्वराशी सख्य जोडणे हे मानवी जीवनाचे ध्येय. त्यासाठी आत्म्याची शुद्धी होणे आवश्यक. ही शुद्धी आत्मक्लेशाच्या द्वारे होऊ शकते. या विचारातून देहदंडन, विरक्ती, विजनवास या कल्पना निर्माण झाल्या. मठ-संस्था निर्माण झाली. पुढील काळात सेंट बेनेडिक्टने ( ६ वे शतक ) आज्ञापालन, दारिद्र्य व ब्रह्मचर्य या गोष्टींवर भर दिला.

ख्रिश्चन धर्मात दोन परस्परविरुद्ध गोष्टींना महत्त्व दिले गेले. एक स्वसुखत्याग वा आत्मक्लेश व दुसरी गोष्ट सहिष्णुता व प्रेम इत्यादी सामाजिक सद्गुण. या दोन तत्त्वांतील विसंगतीमुळे प्रेम, सहिष्णुता अशा सामाजिक गुणांची वाढ झाल्याचे दिसत नाही. जीवनाकडे बघण्याचा ऐहिक दृष्टिकोन प्रभावी झाला नाही.

**इस्लाम धर्म**

सहाव्या शतकात महमद पैगंबरांनी इस्लाम धर्माची स्थापना केली. आपण ईश्वराचे प्रेषित असून ख्रिस्तादी धर्मसंस्थापकांच्या श्रेणीतील शेवटचे प्रेषित आहोत अशी त्यांची श्रद्धा होती. परमेश्वरी आज्ञेवरून आपण कुराणाची रचना करीत आहोत अशी त्यांची भूमिका असून कुराण हे परमेश्वराचे वचन मानले गेले आहे.

अज्ञान, मूर्तिपूजा आणि अपवित्रता यांचा नाश करणे हे महमदांनी आपले कार्य मानले. सत्य बोलावे, आतिथ्यशील असावे, एकच परमेश्वर मानावा; जे अपवित्र, अन्याय्य, आसुरी असेल त्यापासून अलिप्त असावे अशी त्यांची शिकवण आहे. परलोकाचे अस्तित्व, प्रार्थनेचे सामर्थ्य, पाप आणि पापमुक्ती अशा इतर धर्मांना जुळणाऱ्या कल्पनाही इस्लाम धर्मात आहेत.

इस्लाम धर्म इतर धर्मांहून वेगळा पडतो तो समाजरचनेच्या बाबतीत. मुसलमानांचा कायदा, विवाहविषयक चालीरीती, कुटुंबपद्धती या सर्वस्वी कुराण व हादीस ( परंपरा ) या ग्रंथांवर आधारलेल्या आहेत. मुसलमानांना

हादीस हा धर्मग्रंथ कुराणाइतकाच प्रमाण आहे. परमेश्वर नुसता कुराणाच्या रुपाने आविर्भूत झाला नसून प्रत्यक्ष पैगंबराच्या वर्तनातूनही त्याचा आविष्कार झाला आहे, अशी मुसलमानांची श्रद्धा आहे. म्हणून पैगंबरांचे वर्तन अनुसरणीय मानले गेले. वेगवेगळ्या प्रसंगी पैगंबर कसे वागले याबद्दल त्यांचे शिष्य व निकटवर्ती यांनी माहिती सांगितली; व ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला मिळत गेली. असे एक शतकभर चालले. पुढे काहीजण आपल्या सोयीच्या 'परंपरा' शोधून काढण्याचा उद्योग करू लागले. याला प्रतिबंध बसावा यासाठी आठव्या व नवव्या शतकात 'हादीस' हा ग्रंथ लिखित स्वरूपात तयार करण्यात आला. मुसलमानांच्या चालीरीती या दोन प्रमाण ग्रंथांवर आधारलेल्या आहेत याचा अर्थ, मुसलमानांची समाजरचना अपरिवर्तनीय आहे. सहाव्या-सातव्या शतकातील चालीरीती आज विसाव्या शतकातही आदर्श मानून पाळल्या जातात.

मुसलमान समाजरचनेत स्त्रियांना हलके, गौण स्थान दिले गेले. पुरुष हा स्त्रीपेक्षा स्वाभाविकपणेच श्रेष्ठ समजला गेला. बहुपत्निकत्वाला धर्माने मान्यता दिली व घटस्फोटाचे पुरुषाला स्वातंत्र्य दिले. त्यामुळे स्त्रीची स्वत्वाची, सुरक्षितपणाची भावना कमी झाली. नवरा आपल्याला घटस्फोट देईल वा सवत आणील या भीतीचे दडपण स्त्रीच्या मनावर राहिले. याशिवाय स्त्रीला समाजात मोकळेपणाने वावरण्याचे स्वातंत्र्य नाही. परपुरुषासमोर बुरखा घ्यावा असाही धर्माचा आदेश आहे. स्त्रियांवरील या निर्बंधामुळे त्यांची मानसिक वाढ कुंठित झाल्यावाचून राहात नाही.

इस्लामने आत्यंतिक धर्मनिष्ठा शिकविली. कुराणाच्या बाहेर सत्य असू शकत नाही. इस्लाम हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. परधर्मियांना मुसलमान करणे हे मुसलमानांचे कर्तव्य आहे. धर्मप्रसारासाठी युद्धही करावे. या शिकवणुकीमुळे मुसलमान समाज अत्यंत असहिष्णु राहिला, असा इतिहासाचा निष्कर्ष निघतो.

○ ○ ○

# १ विवेकवादाचा विकास

पृथ्वी विश्वाच्या केंद्रस्थानी नसून सूर्याभोवती फिरणारा एक ग्रह आहे हे मत इ. स. १५४३ मध्ये कोपर्निकसने मांडले. तेव्हापासून मानव जातीच्या इतिहासात एक नवीन युग सुरु झाले. धर्मग्रंथात ग्रथित केलेल्या ज्ञानाबद्दल लोक साशंक झाले. विश्वाचे शोधक बुद्धीने निरीक्षण व्हायला लागले. जुन्या कल्पना, श्रद्धा, ढासळू लागल्या. अनेकजण सृष्टीच्या आणि मानवाच्या व्यवहाराकडे नवीन दृष्टिकोणातून पाहू लागले आणि अशा रीतीने शास्त्रीय युगाला आरंभ झाला. यथार्थ ज्ञानप्राप्तीसाठी शास्त्रीय विचारपद्धतीचा अवलंब होऊ लागला. मानवी व्यवहाराचा विवेकवादी दृष्टिकोणातून विचार होऊ लागला.

कोणत्या विचारांपासून व घटनांमधून विवेकवादी दृष्टिकोणाचा विकास होत गेला, हे आता आपण पाहणार आहोत.

**ग्रीकांचा तत्त्वविचार**

नवीन शास्त्रीय युगाला आणि विचारपद्धतीला युरोपमध्ये सोळाव्या शतकात खरीखुरी सुरुवात झाली. हे जरी खरे असले तरी शास्त्रीय विचार-पद्धतीची काही वैशिष्टये तीन हजार वर्षांपूर्वीच्या ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या विचारात पाहायला सापडतात. इसवी सनापूर्वीच्या सहाव्या शतकात ग्रीसमध्ये थेल्स नावाचा तत्त्वज्ञ होऊन गेला. आजूबाजूच्या नैसर्गिक सृष्टीत सदैव फरक पडत असतो. या फरकाच्या मुळाशी संबंध [illegible] [illegible] [illegible] [illegible],

व्यापक असे तत्त्व आहे काय? या प्रश्नाचा थेल्सने विचार केला व या बदलाच्या मुळाशी जल हे तत्त्व आहे असे त्याने प्रतिपादन केले.

थेल्सचा हा विचार मान्य होण्याजोगा नसूनही त्याच्या विचार-पद्धतीत शास्त्रीय दृष्टी होती हे ध्यानात घेण्याजोगे आहे. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणत्याही शास्त्रीय उपपत्तीमध्ये अतिभौतिक तत्त्व येता कामा नये. थेल्सने नैसर्गिक परिवर्तनाचे स्पष्टीकरण करताना अतिभौतिक कल्पनेचा आश्रय घेतला नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की, त्याने आपला विचार गृहीत तत्त्वाच्या (a priori) आधारे मांडला नाही तर तो विगमनात्मक स्वरूपाचा आहे. प्राण्यांच्या अन्नात, वनस्पतींच्या अन्नात जलांश असतो, पाण्याचे बाष्प होते इत्यादी घटनांच्या निरीक्षणावरून त्याने हा विचार मांडला असावा.

इसवी सन पूर्व पाचव्या शतकात लिसिप्पस आणि डेमॉक्रिटस यांनी अणूविषयक सिद्धान्त मांडून थेल्सचा विचार आणखी पुढे नेण्याचा प्रयत्न केला. वस्तूंच्या स्वरूपाचा शोध घेण्याचा अथवा आपल्या अनुभवाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न त्यांनी शास्त्रीय दृष्टिकोनातून केला. त्यांचा सिद्धान्त या स्वरूपाचा : वस्तू या असंख्य, अतिसूक्ष्म अणूंनी बनलेल्या असतात. अणू हेच सर्व वस्तूंचे मूलद्रव्य होय; परंतु वस्तू भिन्न वाटतात याचे कारण त्या ज्या अणूंनी बनलेल्या असतात त्यांचे आकारमान, आकृतिबंध, विशिष्ट स्थान आणि गती यामध्ये फरक असतो. म्हणून जे द्रव्य एका वेळेस पाणी दिसते ते अन्य वेळेस बर्फ दिसते. आपल्याला पिवळे फूल दिसते ते अणूचे विशिष्ट आकारमान, स्थान, आकृती, गती यामुळे. विश्वातील सर्व घटनांचा उलगडा या सिद्धान्ताने होतो असे या विचारवंतांचे मत होते. त्यांच्या मते चैतन्यालाही हा सिद्धान्त लागू पडतो.

लिसिप्पस व डेमोक्रिटस यांचा हा विचार एका दृष्टीने शास्त्रीय परंपरेचा उगम होय. वस्तू आणि वस्तूधर्म यांमध्ये त्यांनी फरक केला.

भौतिक घटनांचा अर्थ एका सूत्रात गुंफण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांचा विचार केवळ कल्पनाजन्य (स्पेक्यूलेटिव्ह) होता. पुढेही त्याला प्रयोगाची जोड मिळाली नाही.

इसवी सन पूर्व पाचव्या-सहाव्या शतकात शास्त्रीय विचाराला एवढी प्रभावी सुरुवात झाली. पण एक गोष्ट राहिली होती, ती म्हणजे या विचाराला प्रयोगाची जोड देण्याची. आणि ती घडली असती तर सोळाव्या-सतराव्या शतकात जे साध्य झाले ते आधी दोन हजार वर्षे मिळाले असते. परंतु असे घडले नाही हे खरे आणि त्याला थोड्या फार प्रमाणात सॉक्रेटिस व प्लेटो हे कारण ठरले. त्यांनी निरीक्षण, अनुभव अथवा प्रयोग यांचा आधार न घेता मानवी जीवनाचा विचार केवळ तात्त्विक पद्धतीने केला. भूमितीशास्त्राचा विचार स्वतःसिद्ध (सेल्फ एव्हिडंट) गृहीत कृत्यांच्या आधाराने केला जातो. तीच पद्धती मानवी जीवनाचा विचार करताना या विचारवंतांनी अवलंबिली. पदार्थांची गती आणि मानवी वर्तन या दोन गोष्टी भिन्न आहेत. अणुसिद्धान्त मानवी वर्तनाला लागू पडत नाही, हे सॉक्रेटिसने सांगितले हे ठीक; परंतु मानवी जीवनाबद्दलचा विचार करताना त्याने भूमितीचा आदर्श पुढे ठेवला. मानवी जीवनाचा विचार करताना भूमितीतल्याप्रमाणे त्याने काही गोष्टी गृहीत धरल्या व त्यावरून अनुमाने काढली. गरजा पुरविणारी साधने (वस्तू) न मिळणे हे माणसाच्या दुःखाचे एक कारण असते. ही वस्तुस्थिती पूर्वीपासूनच आहे; परंतु मनुष्य सुखी कसा होईल याचा विचार करताना सॉक्रेटिस म्हणतो, " कशाचीच गरज न पडणे ही गोष्ट भाग्याची. कमीत कमी गरजा असणे हा त्या भाग्याकडे जाण्याचा मार्ग. "

तात्पर्य, प्राचीन ग्रीकांचा भौतिक शास्त्राचा विचार कल्पनारम्य राहिला. त्याला प्रयोगाची जोड मिळाली नाही. म्हणून सृष्टीच्या यथार्थ आकलनात भर पडली नाही. ग्रीक तत्त्वज्ञांनी मानवी जीवनाबद्दलचा विचार

काही गृहीत तत्त्वांच्या आधारे केला व प्रत्यक्ष मानवी स्वभाव ध्यानात घेऊन केला नाही या कारणाने तो विचार यथार्थ झाला नाही. प्रत्यक्ष जीवनापासून तो विचार बाजूलाच राहिला. विवेकशील आचरणाच्या दृष्टीने त्याचा उपयोग होऊ शकला नाही.

**धर्मसुधारणेची चळवळ ( रेफर्मेशन )**

पश्चिम युरोपमध्ये सोळाव्या शतकात प्रॉटेस्टंट पंथीयांनी धर्मसुधारणेची चळवळ करून मठसंस्थेच्या व पुरोहितवर्गाच्या अधिकाराविरूद्ध आणि जुलमाविरूद्ध बंड उभारले. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक बाबतीत नवीन विचार मांडून सुधारणा सुचविल्या. मार्टिन ल्यूथरने इ. स. १५२० मध्ये जाहीर रीत्या धर्माज्ञेच्या पुस्तकाची प्रत जाळली व पुरोहितवर्गाचा अधिकार अमान्य केला.

युरोपमध्ये मध्ययुगात, म्हणजे सुमारे पंधराव्या शतकापर्यंत चर्चची सत्ता निरंकुशपणे जीवनाच्या सर्व क्षेत्रात चालली होती. सगळ्या चर्चवरचा प्रमुख रोमचा पोप हाच जणू काय यूरोपमध्ये सर्वसत्ताधिकारी झाला होता. आध्यात्मिक दृष्टया राजाच्या आत्म्यावर पोपची सत्ता होती. कारण पोपच्या दृष्टीने राजा हा सुद्धा सर्वसामान्य पातकी मनुष्य होता आणि त्याच्या आत्म्यालाही इतरेजनांप्रमाणे मुक्तीची आवश्यकता होतीच. या कारणाने पोपचा अधिकार नुसता आध्यात्मिक क्षेत्रातच राहिला नाही तर राजदरबारीही तो चालू लागला. तो प्रत्यक्ष राज्यकारभारात ढवळा-ढवळ करू लागला. किंबहुना पोपचे एक स्वतंत्र साम्राज्यच होते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. राजाला जे जे अधिकार असतात त्या सर्वांचा वापर त्या काळात चर्च करीत असे. तेराव्या शतकात इंग्लंडमध्ये एक तृतियांश जमीन चर्चच्या मालकीची होती. चर्चचे स्वतःचे कायदे होते, कायदे करणारे होते. न्यायालये होती, वकील होते. कायदा पाळायला लावण्यासाठी बळाचा वापर केला जात होता. चर्चचे धर्मन्यायमंडळ

( इन्क्विझिशन ) होते. पाखंडीपणासाठी देहदंडाची शिक्षा सुनावली जात होती. चर्चच्या या सत्तेला काही लोक विटले होते. जॉन वायक्लीफने ( १३२४–१३४४ ) चौदाव्या शतकात चर्चच्या काही रूढींना ( उदाहरणार्थ, स्वर्गद्वाराच्या किल्लीची [ इंडल्जन्सची ] विक्री, धर्मोपदेशकाचे ब्रह्मचर्य, इत्यादी ) विरोध केला होता; परंतु चर्चने तो विरोध मोडून काढला. मात्र सोळाव्या शतकात परिस्थिती काहीशी भिन्न झाली होती. चर्चच्या सत्तालोभाला आणि पोपच्या कराला राजेलोकही विटले होते. त्यांनी मठसंस्थेकडून जमिनी काढून घेतल्या. पोपच्या कराचा बोजा धुडकावून लावला. सरंजामशाही मोडकळीला येऊन राजसत्ता अधिक प्रबळ झाली व अशा तऱ्हेने प्रॉटेस्टंटाच्या सुधारणांना परिस्थिती काहीशी अनुकूल झाली.

ल्यूथर, केल्व्हिन् हे धर्मसुधारक पूर्णपणे विवेकशील होते अशातला भाग नाही. काही बाबतीत ते अंधश्रद्धच होते. मेरी, संत-संतिणी, त्यांच्या प्रतिमा यांना त्यांनी महत्त्व दिले नाही; परंतु ख्रिस्ती धर्मातील तीन तत्त्वत्रयी ( ट्रिनिटी ), आत्म्याचे अमरत्व, बायबलचे प्रामाण्य त्यांनाही मान्य होते. त्यांचे महत्त्वाचे कार्य हे की, धर्माधिकाऱ्यांच्या सत्तेला त्यांनी विरोध केला, त्यांचे प्रामाण्य झुगारले व प्रत्येकाने आपापली सद्सद्विवेक बुद्धी प्रमाण मानावी असे प्रतिपादिले.

सत्तेचे प्रामाण्य झुगारण्याचा परिणाम केवळ धर्माच्या क्षेत्रात नव्हे तर विचाराच्याही क्षेत्रात झाला. आतापर्यंत केवळ पारलौकिक कल्पनांना महत्त्व होते ते इहलोकाला प्राप्त होऊ लागले. वैवाहिक जीवन ब्रह्मचर्यापेक्षा कनिष्ठ समजले जायचे, त्या ऐवजी ब्रह्मचर्य हे अस्वाभाविक आणि कनिष्ठ समजले जाऊ लागले. मठसंस्थेत दारिद्र्य महत्त्व पावले होते, ध्येय समजले गेले होते. आता संपत्तीकडे ऐहिक दृष्टिकोणातून पाहण्याची शिकवण दिली जाऊ लागली. प्रॉटेस्टंट पंथीयांच्या सुधारणेचा परिणाम

विशेषत्वाने झाला तो शिक्षणाच्या क्षेत्रात. पूर्वी धर्मगुरु आणि राजकारणी लोकांनी शिक्षण घेतल्याने भागत असे. परंतु आता शिक्षण हे थोड्या लोकांना सुसंस्कृत होण्याचे साधन नसून प्रत्येक ख्रिस्ती मनुष्याला बायबल वाचता यावे यासाठीही सार्वत्रिक झाले पाहिजे असे प्रतिपादण्यात येऊ लागले. इ. स. १५२१ मध्ये जर्मन चर्चने रोमच्या चर्चशी असलेला संबंध तोडून टाकला. ल्यूथरने जर्मन भाषेत बायबलचे भाषांतर करायला सुरवात केली. प्रॉटेस्टंट पंथीयांनी अनेक शाळा काढल्या. शिक्षणाचा अधिक प्रमाणात प्रसार व्हायला लागला.

या सुधारणावादी चळवळीने व्यक्तीला महत्त्व दिले. व्यक्तीची धर्मगुरूंच्या जाचातून सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला. म्हणून व्यक्तिस्वातंत्र्याच्या झगडयात या चळवळीचे कार्य फार मोलाचे आहे.

### भौतिक शास्त्रांचा उदय

मध्ययुगाच्या अखेरीच्या काळात युरोपमध्ये अशा काही घटना घडल्या की, ज्यांच्यामुळे मानवी इतिहासास वेगळे वळण मिळाले. तेराव्या शतकात अॅव्हरॉज या अरब पंडिताच्या ग्रंथाचा अभ्यास ऑक्सफर्ड व पॅरिस या विश्वविद्यालयात होत होता. त्याच्या मते शास्त्रीय ज्ञानाप्रमाणे धर्मग्रंथात सत्यज्ञान नाही. त्याने धार्मिक ज्ञान व शास्त्रीय ज्ञान यात फरक केला. त्याच्या मते आचाराला प्रेरणा देण्याचे सामर्थ्य हे धर्माचे वैशिष्ट्य; परंतु ज्या गोष्टीचा विचार केवळ शास्त्रांनी करावयाचा तो धर्मग्रंथांनी केला.ही फार भयंकर गोष्ट झाली. अॅव्हरॉजच्या या मताचा थोडा फार परिणाम चर्चचे महत्त्व कमी होण्यात झाला.

तेराव्या–चौदाव्या शतकात होकायंत्राचा वापर सुरु झाला. कोलंबस व वॅस्को दिगामा यांनी नवीन प्रदेश शोधून काढले. मार्को पोलो सारखे प्रवासीही अन्य देश बघून परतले. परकीय देश, तेथील लोक, त्यांच्या चालीरीती, त्यांचा धर्म यांचे ज्ञान व्हायला लागले. तेव्हा

ख्रिस्ती धर्म हाच खरा एकमेव सर्वव्यापक धर्म या समजुतीवर विश्वास ठेवणे कठीण जाऊ लागले.

मध्ययुगात अभ्यास फार थोडया लोकात व मर्यादित ग्रंथांचाच होत असे. ग्रीक भाषा येणारे पंडित तेवढे हा व्यासंग करीत. पंधराव्या शतकात ॲरिस्टॉटलच्या अनेक ग्रंथांची भाषांतरे अरबीमधून झाली व नवीन ग्रंथांची माहिती झाली. १४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्स्टॅन्टिनोपलचा पाडाव केल्यानंतर अनेक ग्रीक पंडित जुनी हस्तलिखिते बरोबर घेऊन युरोपमध्ये आले. तत्त्वज्ञान व निसर्गशास्त्रे याबाबत साधकबाधक विचार करून सत्य जाणून घेण्याची तळमळ त्यांच्या ठिकाणी होती. त्याचाही परिणाम युरोपमधील पंडितांवर होऊ लागला. मुद्रणाच्या वापरामुळे विचारांचा प्रसार अधिक प्रमाणावर होऊ लागला. सोळाव्या शतकाच्या मध्यापर्यंत नवीन ज्ञानप्रसार होण्याच्या दृष्टीने असे अनुकूल वातावरण निर्माण झाले होते. आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भौतिक शास्त्रांचा उदय होऊ लागला. प्राचीन विद्योपासक हे इंद्रियानुभवाचा आधार न घेता केवळ तात्त्विक विचारातच रमले होते. प्रबोधनाच्या (रेनसांसच्या) कालखंडात निसर्गाची कार्यपद्धती समजून घेण्याचा प्रयत्न होऊ लागला. भौतिक शास्त्रांना महत्त्व प्राप्त होऊ लागले. शास्त्रज्ञ एकेक विजय संपादित सुटले. मानवी जीवनाचा ठसाच यापुढे ओळखू न यावा इतका बदलला. नवीन शास्त्रीय युगाला आरंभ झाला.

यातील पहिली क्रांतिकारक घटना म्हणजे कोपर्निकसने १५४३ मध्ये प्रसिद्ध केलेला पृथ्वीच्या गतीसंबंधीचा ग्रंथ. पृथ्वी ही विश्वाच्या केंद्रस्थानी नसून सूर्याच्या भोवती फिरणारा एक ग्रह आहे, हे मत त्याने या ग्रंथात मांडले. शास्त्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आज आपल्याला या मताची क्रांतिकारकता डोळ्यासमोर आणणे कठीण आहे; परंतु १५४३ च्या

सुमारास परिस्थिती फार भिन्न होती. कारण प्रत्येकाची खात्री होती की, स्वर्ग अक्षरशः पृथ्वीच्या वर असून तिथे देव, देवदूत, मुक्तात्मे राहतात. त्याचप्रमाणे नरक पृथ्वीच्या अक्षरशः खाली असून पापी माणसांचे आत्मे तिथे यातना भोगतात व सैतान त्यांच्यावर देखरेख करतो. अशा काळात पृथ्वी भ्रमण करते हे मत लोकांना भावणे फार कठीण होते. कारण पृथ्वी भ्रमण करते म्हणजे तिच्याबरोबर देव आणि देवदूतही भ्रमण करतात असे मानावयाची पाळी आली. स्वर्ग आणि नरकाचे भौगोलिक स्थान निश्चित करणे कठीण झाले. बायबल व ॲरिस्टाटल खोटे ठरू लागले. बायबलमध्ये सांगितलेले विश्वरचनेचे ज्ञान खोटे ठरल्याने ख्रिस्ती धर्मसंस्था पहिल्यांदा अस्वस्थ झाली. मानवजातीच्या शिक्षणातला हा अतिशय महत्त्वाचा कालखंड ठरला. ख्रिस्ती धर्माची शिकवण व शास्त्रीय ज्ञान याची फारकत होणे अटळ दिसू लागले.

कोपर्निकसनंतरच्या दीडशे वर्षांत शास्त्रज्ञानात झपाट्याने भर पडत गेली, व निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. गिल्बर्टने चुंबकाबद्दल व हार्वेने रुधिराभिसरणासंबंधी मौलिक शोध लावले. कोपर्निकसच्या सिद्धान्तापासून गॅलिलिओने स्फूर्ति घेतली. फिरणाऱ्या पृथ्वीच्या भागाचे वर्णन गणिती पद्धतीने करणे शक्य आहे, असे त्याला वाटले. निसर्गाकडे पाहण्याचा हा बदललेला दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. निसर्गातील घटना का घडतात हे पाहण्याच्या आधी त्या कशा घडतात ते निरीक्षण करणे आवश्यक आहे, असा गॅलिलिओचा शास्त्रीय दृष्टिकोन होता. निसर्गघटनेचे सत्य शोधावयाचे असेल तर ॲरिस्टॉटलला प्रमाण मानणे अथवा गृहीत गोष्टी आधाराला घेणे चूक असून प्रत्यक्ष निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे असे त्याने प्रतिपादिले. निसर्गाकडे खऱ्याखुऱ्या शास्त्रीय दृष्टीने पाहणारा गॅलिलिओ हा पहिला शास्त्रज्ञ होय.

गॅलिलिओने शास्त्रीय दृष्टिकोनाला चालना दिली, बेकनने तो तात्त्विक

स्वरूपात मांडला तर न्यूटनने त्याला भक्कम पायावर उभे केले. शास्त्रीय विचारपद्धती परिपूर्ण करण्याची कामगिरी न्यूटनने (१६४२ ते १७२७) केली. शास्त्रीय नियमाबद्दलची त्याची कल्पना अशी: शास्त्रीय सिद्धान्त अथवा नियम सबंध विश्वाला लागू पडणारा असतो, अबाधित असतो. या नियमाची सत्ता बारीक वालुकाकणावर जशी असते अगदी तशीच मोठ्यातल्या मोठ्या ताऱ्यावरही असते.

विश्वाचे गणिती पद्धतीने वर्णन करणे शक्य आहे असे गॅलिलिओला वाटले होते, परंतु एकच नियम पृथ्वीवरच्या वस्तूला आणि आकाशातील ताऱ्यांना लागू पडतो असे न्यूटनने पहिल्यांदा दाखविले. ज्या शक्तीने चंद्र आपल्या कक्षेत फिरतो त्याच शक्तीने झाडावरचे फळ जमिनीवर पडते हे न्यूटनने दाखविले. शास्त्रीय नियमाची अबाधित विश्वव्यापकता त्याने सिद्ध केली व त्याच्याच मार्गाने पुढे दोनशे वर्षे शास्त्रज्ञानाचा विकास होत राहिला. विश्वात योगायोगाने काही घडत नाही. विश्वघटनांमध्ये नियतता आहे व प्रयोगाने विश्वात्मक नियम शोधून काढणे शक्य आहे, हे न्यूटनने सिद्ध केले. विश्वाचे आकलन अधिक सुलभ केले व विश्वालाच अभ्यासाचा विषय बनविले.

धर्मग्रंथातील ज्ञानावर, सन १८५९ मध्ये अखेरचा आघात केला तो डार्विनने (१८०९-१८८२) विकासवादाचा सिद्धान्त मांडून. डार्विनच्या सिद्धान्तामुळे नीतिशास्त्राचा विचार वेगळ्या पद्धतीने करण्याची जरूरी निर्माण झाली. बायबलमध्ये जो आत्म्याचा विचार केला होता त्याचा आधारच डार्विनने नष्ट केला. डार्विनने आपला सिद्धान्त मांडला त्याच्या आधी परिस्थिती होती ती अशी. न्यूटनचा सिद्धान्त जड वस्तूबाबत साधारणपणे मान्यता पावला होता. मात्र परमेश्वर आणि माणसाचा आत्मा यांना निसर्गनियम लागू पडतो हे मान्य नव्हते. परमेश्वर आणि माणसाचा आत्मा यासंबंधीचे सत्य बायबलमध्ये ग्रथित केलेले आहे;

आत्म्यासंबंधीचे नियम परमेश्वराने जगाच्या निर्मितीच्या वेळीच तयार केले आहेत; शास्त्रज्ञांनी आत्म्याच्या प्रांतात ढवळाढवळ करू नये, असे मानले जात होते.

डार्विनच्या मते मनुष्यप्राणी हा इतर प्राण्यातून उत्क्रांत होत होत आजच्या स्वरूपाला आला. त्याच्या स्वाभाविक प्रतिक्रिया इतर प्राण्यांसारख्याच असतात.

कोपर्निकसने पृथ्वीला विश्वाच्या केंद्रस्थानातून उचलले. न्यूटनने पृथ्वी आणि इतर ग्रहतारे यांना एकच नियम आहे हे दाखवून दिले तर डार्विनने मनुष्य आणि मनुष्याचे मन विशेष कृपादृष्टीने (स्पेशल क्रिएशन) ईश्वराने निर्माण केले आहे हे बायबलचे मत खोटे ठरविले. याचा परिणाम धार्मिक श्रद्धेवर फार भयंकर झाला. आर्चबिशप अशरने तर बायबलमधल्या पुराव्या-वरून पृथ्वीच्या निर्मितीचे इ. स. पूर्व ४००४ हे सालही निश्चित केले होते. रूढ कल्पना अशी होती की, परमेश्वराने ही पृथ्वी आता असलेल्या प्राणिविशेषांसह निर्माण केली. डार्विनच्या शोधामुळे पृथ्वीच्या निर्मितीचा काल फार मागे लोटला गेला. त्याचप्रमाणे असेही कळून आले की, आज ज्या प्राणिजाती दिसत आहेत त्या पूर्वी तशा नव्हत्या. उत्क्रांती होत होत आजची रूपे प्राणिजातींना लाभलेली आहेत.

डार्विनच्या सिद्धान्ताचा महत्त्वाचा परिणाम हा झाला की, त्यामुळे मनुष्यप्राणी हाही शास्त्राचा विषय बनला. मनुष्याची विशेषता गृहीत धरून त्याच्या आध्यात्मिक, पारलौकिक उन्नतीचा विचार करण्याला धर्म आणि धर्मशास्त्र प्रवृत्त झाली होती. त्यांचा फोलपणा आता ध्यानात आला.

# १० भारतातील विवेकवाद

भारतीय संस्कृती ही एके काळी अतिशय प्रगत होती. भारतात तत्त्वज्ञानाचा विकास झाला होता. चित्र–शिल्पादी कलात भारत अग्रसर होता. उत्तमोत्तम वाङ्मय इथे निर्माण झाले. भारताच्या उज्ज्वल भूतकाळाचे असे गौरवपूर्ण वर्णन केले जाते. दोन हजार वर्षांपूर्वीच्या इतर संस्कृतींशी तुलना केली तर बऱ्याच अंशी ते सार्थही ठरते. चित्र, शिल्प, वाङ्मय या कलात भारतीयांनी फार प्रगती केली होती. धातुकामासारख्या विद्येत केलेल्या या प्रगतीचे काही पुरावे आजही बघण्यास सापडतात. आयुर्वेद, ज्योतिष, गणित या शास्त्रांमध्ये आपल्या पूर्वजांनी बरीच मजल मारली होती. आयुर्वेदातील ज्ञान अरब, ग्रीक वगैरे लोकांनी आपल्याकडून नेले. खिस्तपूर्व दोन हजार वर्षे भूमितीचा उगम येथे झाला असे काही विद्वानांचे मत आहे. शून्यलब्धी गणित ( डिफरेन्शियल कॅल्क्युलस ) भास्कराचार्यांना ( बारावे शतक ) माहीत होते. पाचव्या शतकात आर्यभट्टाला पृथ्वीची दैनंदिन गती व ग्रहणांची उपपत्ती आजच्या कल्पनेप्रमाणे माहीत होत्या. भास्कराचार्यांनाही पृथ्वीची दैनंदिन गती माहीत होती. भारताच्या इतिहासात शास्त्रज्ञानाचे स्फुल्लिंग दिसतात ते असे.

ज्योतिष व गणित या शास्त्रात दोन हजार वर्षांपूर्वी आपले पूर्वज हे शोध लावू शकले. मग ही परंपरा टिकून का राहिली नाही ? याचे कारण म्हणजे उत्तरकालात पारलौकिक दृष्टिकोण जास्त प्रभावी होत गेला. शास्त्राचा. आणि जीवनाचा मेळ घालण्याचा विचारच स्फुरला नाही. पारमार्थिक विचाराने शास्त्रीय विचार कुंठित केला. आर्यभट्टाचा पृथ्वी भ्रमणविषयक-सिद्धान्त खोडून काढू पाहणारा ब्रह्मगुप्त ( सातवे शतक ),

पृथ्वी जर खरोखरच फिरत असती तर तिच्यावरचे डोंगर-पर्वत ढासळले नाहीत कसे ?—असे विचारताना दिसतो. ग्रहताऱ्यांची गती माहीत असलेले भास्कराचार्य मुलीच्या लग्नाचा मुहूर्त टळू नये याची काटेकोर दक्षता घेताना दिसतात. भूमितीचा उपयोग यज्ञभूमी सिद्ध करतानाचा होतो. सारांश; पारलौकिक विचाराने शास्त्रीय दृष्टिकोणाला बीजच धरू दिले नाही.

सामाजिक संस्थांच्या निर्मितीबाबतही पारलौकिक दृष्टिकोनच प्रभावी ठरला. धर्मशास्त्राची म्हणजे आचाराबाबत मार्गदर्शन करणाऱ्या शास्त्राची उभारणी समाजाच्या निरीक्षणावर व माणसामाणसातील संबंध विचारात घेऊन व्हायला हवी होती; परंतु तशी ती न होता काही पारमार्थिक कल्पनांच्या आधारावर झाली. कर्मविपाकत्व पावित्रश्रेणीवर आधारलेली आनुवंशिकता ही तत्त्वे भारतीय समाजरचनेच्या मुळाशी होती व त्यांना पारमार्थिक कल्याणाचाच आधार देण्यात आला. इसवी सन पूर्व पहिल्या शतकापासून इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंत अनेक श्रुति-स्मृतिग्रंथ निर्माण झाले. त्यात थोडी का होईना मतमतान्तरे दिसतात; परंतु ही मतभिन्नताही पारलौकिकाच्या चौकटीतच नांदत राहिली.

बालविवाह, अस्पृश्यता, सतीची चाल, इत्यादी रूढी दृढ झाल्या. व्यक्ती म्हणून व्यक्तीला महत्त्वच राहिले नाही. ऐहिकाबद्दल इतकी उदासीनता निर्माण झाली की, आठ नऊ शतके भारत परकीय अमलाखाली बिनतक्रार राहिला.

भारतातील विवेकवादी विचाराचा आणि चळवळीचा इतिहास उण्यापुऱ्या दीड शतकाचा आहे. ब्रिटिश अंमलामुळे भारतीयांचा पाश्चात्य ज्ञानाशी परिचय झाला व या पाश्चत्य 'ज्ञानामुळेच नवी दृष्टी आली. नवीन ज्ञानाच्या प्रकाशात भारतीय समाजाचे निरीक्षण व्हायला लागले. आपले दोष दिसू लागले व समाज-सुधारकांना सुधारणेची नवी दृष्टी व

सामर्थ्य आले. या सुधारकांत राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, महात्मा फुले, रानडे, आगरकर हे प्रमुख होत. यांतील आगरकरां-व्यतिरिक्त पूर्णपणे विवेकवादी कोणीच नव्हते. तरीही त्यांनी सामाजिक प्रश्नांबाबत विवेकवादी दृष्टिकोण स्वीकारला व विवेकाच्या पायावर समाजाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला, म्हणून त्यांचे कार्य महत्त्वाचे ठरते. या सुधारकांनी कोणते विचार प्रसृत करण्याचा प्रयत्न केला हे आपण थोडक्यात पाहू.

## राजा राममोहन रॉय

### रूढी आणि कर्मकांड यांवर आघात

महाराष्ट्रात पेशव्यांची सत्ता नष्ट होऊन इंग्रजांची सत्ता सुरू झाली. त्या सुमारास बंगालमध्ये राजा राममोहन रॉय भारतीयांच्या धर्मविचारात आणि आचारात क्रांती करून भारताची सर्वांगीण उन्नती करावयाच्या प्रयत्नाला लागले होते. तत्कालीन भारतीय समाज हा युरोपातील मध्य-युगीन समाजाच्या अवस्थेसारख्या एका अवस्थेत होता. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र यांसारखी शास्त्रे असू शकतात याची त्याला स्पष्ट कल्पना नव्हती. धर्मशास्त्राचाच अधिकार जीवनाच्या सर्व अंगांवर चालत होता. निदान चालायला हवा अशी त्याची श्रद्धा होती. अशा भारतीय समाजाची सुधारणा करावयाची असेल तर प्रथम, त्याच्या धर्म-विचारात क्रांती होणे आवश्यक आहे, हे ध्यानात घेऊन राजा राममोहन रॉय यांनी कर्मकांडाचा त्याग करणाऱ्या उदारमतवादी ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. त्यांची आस्तिक्य बुद्धी आणि एकेश्वरवाद कोणाला मान्य होण्याजोगा नसला तरी रूढ हिंदू धर्माचे दोष दाखविण्याचे आणि त्यात सुधारणा करण्याचे त्यांचे कार्य फार महत्त्वाचे ठरले. हिंदू धर्मातील मूर्ति-पूजा ही हिंदूंना बौद्धिकदृष्ट्या गुलाम बनवीत आहे, भूतदयेच्या आणि परोपकाराच्या सद्धर्मापासून त्यांना दूर ठेवीत आहे आणि अनेक निष्ठूर,

विषम आणि वेडगळ रूढींचे दास बनवीत आहे हे पाहून त्यांचे अंतःकरण रूढ हिंदू धर्माविरुद्ध बंड करून उठले.

**भौतिक दृष्टिकोनाचा अवलंब**

आधुनिक भारताचा उद्धार प्राचीन संस्कृत विद्येचे अध्ययन करून होणार नाही, तर बेकनच्या काळापासून युरोपात स्वीकारला गेलेला भौतिक दृष्टिकोन स्वीकारून होईल अशी त्यांची खात्री पटली होती. कलकत्त्याला व्याकरण, न्याय, वेदान्त इत्यादी संस्कृत विद्येचे शिक्षण देण्यासाठी नवी संस्कृत पाठशाळा इंग्रजांनी काढली त्याबद्दल सरकारला निवेदन देताना त्यांनी म्हटले, " आत्मा परमेश्वरात कसा विलय पावतो किंवा परब्रह्माच्या स्वरूपाशी त्याचा संबंध कशा प्रकारचा आहे, असल्या वेदांतातील विषयांच्या चर्चेपासून काही सुधारणा होणार नाही. तसेच सर्व दृश्य वस्तुजात हे मिथ्या आहे, मातापिता इत्यादींना वास्तविक अस्तित्वच नाही, म्हणून ते प्रेम करण्यास पात्र नाहीत आणि म्हणून त्यांच्यापासून आम्ही जितक्या लवकर पळून जाऊ आणि संसारातून मुक्त होऊ तितके उत्तम, अशा सारख्या वेदान्तातील सिद्धान्ताच्या शिक्षणापासून तरुणांना समाजाचे उत्कृष्ट घटक कसे बनावे, याचे शिक्षण मिळणे शक्य नाही ... सत्य ज्ञानापासून ब्रिटिश समाजाला दूर ठेवावे, असाच जर हेतू असता तर मध्ययुगीन पंडितांची शिक्षणपद्धती काढून तिच्या जागी बेकनच्या तत्त्वज्ञानाची स्थापना ब्रिटनमध्ये करण्यात आली नसती; कारण मध्ययुगीन पद्धती अज्ञान चिरंतन करण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त होती. या देशाला अंधारात ठेवावे, असा ब्रिटिश पार्लमेंटचा उद्देश असल [illegible]

[illegible] केली.

**लोकहितवादी**

महाराष्ट्रातील आद्यसुधारकांमध्ये लोकहितवादी ( सरदार गोपाळ हरि देशमुख : १८२१–१८९२ ) यांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे.

संस्कृत विद्या निरुपयोगी आहे. बेकनप्रणीत शास्त्रीय विचारपद्धतीचा अवलंब व्हावा व भौतिक शास्त्रांचा अभ्यास व्हावा असा त्यांचा दृष्टिकोण होता. ग्रंथप्रामाण्याच्या विरुद्ध बंड करून व शास्त्रीय विचार–पद्धतीचा पुरस्कार करून विवेकयुगाला प्रारंभ करण्याचे श्रेय राजा राममोहन रॉय यांच्याकडे जाते.

**सतीची चाल व जातिभेद**

राममोहन रॉय यांनी स्त्रीस्वातंत्र्याच्या व्यापक प्रश्नाला चालना दिली. स्त्रियांचे आर्थिक दास्य दूर व्हावे यासाठी वडिलार्जित मालमत्तेत स्त्रियांना हक्क मिळावा, आईबापांनी कन्याविक्रय करू नये, बहुपत्निकत्वाची चाल नष्ट व्हावी यासंबंधी त्यांनी विचार प्रसृत केले. त्यांना अभिप्रेत असलेल्या स्त्रियांच्या सुधारणांपैकी सती जाण्याची चाल कायद्याने बंद झाली. पुनर्जन्माची कल्पना व पुरुषांची स्त्रीवर असणारी सत्ता यातून सतीची चाल रूढ झाली. मनुष्य मृत झाल्यावर लिंगदेहाने स्वर्गात जातो, व तेथे त्याला सर्व ऐहिक भोगही पाहिजे असतात या कल्पनेतून त्याच्या पत्नीने सहगमन करण्याची चाल पडली. १८२९ मध्ये लॉर्ड बेंटिंकने ही चाल कायद्याने बंद केली व त्यासाठी राजा राममोहन यांचे प्रयत्न कारणीभूत झाले. त्या सुमारास जवळजवळ आठशे स्त्रिया दरवर्षी सती जात. भावजयीला आपल्या मृत [illegible]
काळी [illegible]

[illegible] संस्कृत [illegible] मिळालेले ज्ञान कोणत्या योग्यतेचे असते याबद्दल लिहिताना ते म्हणतात, “ तेव्हा आता संस्कृत शिकणारांच्या हाती कोणते ज्ञान येते हे पाहिले पाहिजे. तर हा विचारा या ज्ञानाने तीन चार हजार वर्षांचा जुना होतो. त्याचा हल्लींच्या काळात जन्मलेलेपणा जातो. कसा म्हणाल तर त्यास म्हटले की, लंकेत कोलंबो

नसले तरी जातिभेदाची अनिष्टता त्यांनी अशी प्रतिपादिली : " अनेक जाती–उपजाती निर्माण करणाऱ्या जातिभेदाने त्यांची ( भारतीयांची ) राष्ट्रभावना नष्ट केली आहे....निदान राजकीय हित आणि सामाजिक सुख यांसाठी तरी त्यांच्या धर्मात काही बदल होणे अवश्य आहे असे मला वाटते. "

**महाराष्ट्रातील विवेकवादी विचार**

सामाजिक प्रश्नांकडे बघण्याचा विवेकशील दृष्टिकोण मांडण्याचे कार्य बाळशास्त्री जांभेकर ( १८१२-१८४६ ) यांनी महाराष्ट्रात १८९२ मध्ये 'दर्पण' या मासिका द्वारे सुरू केले. बालविधवांना पुनर्विवाह करण्याची मुभा असावी, स्त्रियांना शिक्षण मिळावे अशा मतांचा प्रचार त्यांनी केला.

१८४५ च्या सुमारास घडलेली एक विशेष घटना म्हणजे 'परमहंस मंडळी'ची स्थापना. दादोबा पांडुरंग, डॉ. आत्माराम पांडुरंग, भाऊ महाजन इत्यादी समाजसुधारकांच्या प्रेरणेने धर्मसुधारणेचे व सामाजिक सुधारणेचे कार्य गुप्त रीतीने करण्यासाठी या मंडळाची स्थापना झाली. जातिभेद मानू नये, विधवांच्या पुनर्विवाहास संमती असावी, मूर्तिपूजा करू नये अशी या मंडळाची मते होती. मंडळाचे काम गुप्तपणे चाले. ही गोष्ट चमत्कारिक वाटत असली तरी त्या काळी लोकमताचा वचक किती दांडगा होता याचे हे निदर्शक आहे. १८६० मध्ये एका उपद्व्यापी गृहस्थाने या गुप्त मंडळाची वाच्यता केल्यानंतर ही संस्था मोडली. या संस्थेतील सभासदांनीच पुढे १८६७ मध्ये मुंबईस प्रार्थनासमाजाची स्थापना केली.

**लोकहितवादी**

महाराष्ट्रातील आद्यसुधारकांमध्ये लोकहितवादी ( सरदार गोपाळ हरि देशमुख : १८२१–१८९२ ) यांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे.

धार्मिक, सामाजिक व राजकीय विषयावरचे आपले विचार त्यांनी विस्ताराने व प्रभावीपणाने मांडले. धार्मिक व सामाजिक श्रद्धांवर कडाडून हल्ला केला व लोकांना व्यक्तिस्वातंत्र्यप्रधान मानवतावादी दृष्टिकोनातून जीवनाकडे पाहण्याची शिकवण दिली.

धर्माचा किंवा ईश्वराचा उगम मनुष्याच्या बुद्धीमध्ये झाला. म्हणूनच धर्मकल्पना व ईश्वरकल्पना बदलत आल्या हे त्यांनी प्रतिपादिले. रूढी व कर्मकांड यांवर आधारलेला धर्म खरा नसून सार्वत्रिक नीतिमूल्यांवर आधारलेला धर्म खरा; या नैतिकतेची वाढ होण्यावरच व्यक्तीचे व समाजाचे सुख अवलंबून आहे असे त्यांनी प्रतिपादिले व कर्मकांडावर हल्ला केला.

आपल्या समाजात जी अनेक वैगुण्ये निर्माण झालेली आहेत याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्याला भौतिक शास्त्रांचे ज्ञान नाही. ग्रंथप्रामाण्यामुळे अनेक वेडगळ समजुती रूढ होऊन समाजाची हानी होत आहे. आपल्याला शहाणे होऊन सुधारणा करावयाची असेल तर इंग्रजांकडून भूगोल, खगोल, राज्यशास्त्र, इतिहास, इत्यादिकांचे ज्ञान संपादन करणे आवश्यक आहे. संस्कृत विद्येने आपणास भ्रमात ठेवले म्हणून लोकहितवादी संस्कृत विद्येचा वारंवार निषेध करतात. संस्कृत विद्येच्या सर्व अंगांचे परीक्षण करून त्यातील मिथ्यत्व व हानिकारकता त्यांनी दाखविली. वेदांनी अनुष्ठाने, जप, तप, मंत्रसामर्थ्य इत्यादी भ्रामक कल्पना निर्माण केल्या व लोकांना आचरणाचा चुकीचा मार्ग सांगितला. पुराणांनी चुकीचे ज्ञान दिले. संस्कृत ग्रंथांपासून मिळविलेले ज्ञान कोणत्या योग्यतेचे असते याबद्दल लिहिताना ते म्हणतात, " तेव्हा आता संस्कृत शिकणारांच्या हाती कोणते ज्ञान येते हे पाहिले पाहिजे. तर हा विचारा या ज्ञानाने तीन चार हजार वर्षांचा जुना होतो. त्याचा हलींच्या काळात जन्मलेलेपणा जातो. कसा म्हणाल तर त्यास म्हटले की, लंकेत कोलंबो

शहर आहे. तर हा म्हणतो की, लंका कोणास सापडावयाची नाही. तिच्या सभोवती सुदर्शन फिरत आहे.

" धर्मशास्त्राने श्राद्ध, शौचनिर्णय व इतर संस्कार असल्या निरुपयोगी गोष्टींशिवाय काही कळावयाचे नाही. वेदान्त, मीमांसा शिकल्याने तर, मग हे जग दिसते ते खरे किंवा खोटे, याचीच भ्रांती त्यास पडून त्याविषयी तो वाद घालीत बसतो. कोणी म्हणतो, मी आणि ईश्वर एका जातीचे, मध्ये भावना मात्र आहे. कोणी म्हणतो सुखदुःख हे मनातही आणू नये, आळसात बसावे. प्रारब्धी आहे, ते घडतच आहे.

" तसेच ज्योतिषशास्त्र चांगले; परंतु त्याजवरून भविष्ये पाहाण्याची रीती व नियम काढले आहेत, ते अगदी खोटे. आकाशातील जे तारे, त्यांच्याने पृथ्वीवरील मनुष्याच्या नशिबाचा फेरफार कसा होईल? शनी पाहिजे तिकडे गेला व गुरु कोणत्याही राशीस आला तर मी पृथ्वीवर राहणार, माझे तो काय करील? व माझ्याशी त्याचा संबंध काय? "

एकंदर संस्कृत विद्येबद्दल ते लिहितात, " या प्रमाणे कोणत्याही भागात पाहिले तरी, संस्कृत विद्या निरुपयोगी व नाना प्रकाराने कुतर्क उत्पन्न करणारी व संसारातील चित्त उडवून आळशी करणारी व निरुपयोगी कर्मे करणारी आहे. सांप्रत काळी जे ज्ञान पाहिजे ते त्यात नाही. " यासाठी लोकहितवादींनी पाश्चात्य देशात ज्या प्रमाणे भौतिक शास्त्रांचे अध्ययन होते त्याप्रमाणे इथेही होण्याची आवश्यकता प्रतिपादिली.

### सामाजिक विचार

अनेक सामाजिक प्रश्नांचा उहापोह लोकहितवादींनी अत्यंत कळकळीने केला. त्यांच्या सामाजिक विचारामागे व्यक्तिस्वातंत्र्य व सामाजिक हित हीच प्रेरणा होती. व्यक्तीच्या व समाजाच्या उन्नतीचा विचार ते नीतिप्रधान मानवतेच्याच दृष्टिकोणातून करतात. प्रत्येक व्यक्ती ही महत्त्वाची समजून तिला सुख मिळेल अशा प्रकारची समाजरचना असावी. त्यातूनच

समाजाचीही प्रगती होईल असा त्यांचा दृष्टिकोण होता. व्यक्तीच्या विकासाला प्राधान्य देण्याच्या कल्पनेतूनच त्यांनी स्त्रियांच्या सुधारणेचा प्रश्न, जातीनिर्मूलनाचा प्रश्न व इतर रूढींच्या निर्मूलनाचा प्रश्न यांची चर्चा केली.

लोकहितवादींनी पुनर्विवाहाचा पुरस्कार अत्यंत तळमळीने, नीतिमूल्यांच्या, माणुसकीच्या व तर्कांच्या आधारे केला. वैधव्यदशेनंतर केशवपन करून विद्रूप केलेल्या बालिकांकडे पाहून त्यांचे अंतःकरण विदीर्ण होत होते. विधवांचा विवाह न करणाऱ्यांना 'आपल्या कन्यांचे वध करणारे ' असे ते संबोधतात. विधवांच्या दुःखाचे त्यांनी मर्मभेदक वर्णन केले आहे. " परशुरामभाऊ पटवर्धन यांनी आपल्या विधवा मुलीचा विवाह करावा असे ठरविले होते; परंतु नाना फडणवीस आड आले. तुम्ही हे करून नका; कारण एकाने केले म्हणजे सर्व करतील ही भीती नानांना वाटली. लोक सांगतात, पानशे हे तोफखान्यावरील सरदार होते. त्यांच्या घरी सत्तावन बोडक्या होत्या. हे मोठे शहाणपण समजतात; परंतु मला वाटते, हा मोठा अनर्थ व मनुष्ययज्ञ आहे. "

विधवांचा विवाह करू नये हे सांगण्यासाठी मनूचा आधार घेणारांना ते विचारतात, " परंतु त्यांस मी एक प्रश्न करतो. मनूने असे ठरविले आहे की, ब्राह्मणाच्या स्त्रीने एक वेळ नवरा मेला तर पुनरपी लग्न करू नये, तिने आयुष्य तसेच घालवावे किंवा आपल्यास जाळून घ्यावे; परंतु मनू हा जर ईश्वरांश होता तर त्याने अशीही सत्ता पृथ्वीवर का प्रकट केली नाही की, जर आपण असे शास्त्र केले तर असेही करू की, कोणा एकाही ब्राह्मणाच्या स्त्रीचा नवरा मरणार नाही ! प्रथम स्त्री मरावी, नंतर नवरा मरावा, असा क्रम जर पृथ्वीवर घातला असता तर मी म्हटले असते की, मनू हा ईश्वर होता व ब्राह्मण हे ठीक करतात. " पुढे ते असेही म्हणतात, " तेव्हा एखाद्या ब्राह्मणास मी जर सांगितले की, तुम्ही यज्ञोपवित घेतले आहे, हे अखेरीचे आहे; जर हे तुमच्या

अंगावर तुटले तर त्या दिवशी तुम्ही ह्यासह वर्तमान जाळून घ्यावे किंवा आम्ही तुमचे पाच पाट काढून तुम्हास विद्रप करून जन्मपर्यंत तुमचे हाल करू व बोडकीप्रमाणे तुम्हास ठेवू, तर त्या ब्राह्मणास ते आवडेल काय ? रूढी आणि ग्रंथप्रामाण्य बाजूला ठेवून बुद्धिप्रामाण्याचा स्वीकार करावयास पाहिजे. मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेही असो. ब्रह्मदेवाचे का असेना, बुद्धिरेव बलीयसी असे आहे... शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धी चालवा, विचार करून पाहा. ”

लोकहितवादींच्या काळातच नव्हे तर नंतर पाऊणशे वर्षांनीही बालविधवांचा प्रश्न किती दुःखदायक स्वरूपाचा होता याची कल्पना १९२१ च्या शिरगणतीतील बालविधवांच्या आकड्यावरून येईल. या अहवालानुसार बालविधवांची वयानुसार संख्या अशी : एक वर्षाच्या आतील विधवा ६१२, पाच वर्षांच्या आतील २,००४, दहा वर्षांच्या आतील ९७,१५७, आणि पंधरा वर्षांच्या आतील ३,३२,०२४. एवढी ही मोठी संख्या होती.

जुलूम करणाऱ्या सरकारविरुद्ध बंड करणे जसे आवश्यक तसे लोकसुखाच्या विरुद्ध जाणाऱ्या शास्त्राविरुद्ध बंड करावयास पाहिजे. सुखास जे आडवे येईल ते दूर करावे. लग्नाचा नियम हा धर्म नव्हे, ही रीत आहे. ती जर वाईट ठरली तर दुसरे नियम करणे आवश्यक आहे. याच दृष्टिकोणातून लोकहितवादींनी बालविवाहास प्रतिबंध करण्याची आवश्यकता सांगितली. बालविवाह प्रचलित झाल्याने अनर्थ ओढवतात. स्त्रीचे व्यक्तित्व खुरटते. बालवयात पतीचा मृत्यू झाला तर सारे आयुष्य वैधव्यदशेत काढावे लागते. त्याचप्रमाणे, अनेकपत्नित्व नको, स्त्रीधन देण्याची चाल रूढ व्हावी, उभयता पती-पत्नीच्या संमतीने त्याग व घटस्फोट व्हावा इत्यादी सुधारणा त्यांनी प्रतिपादिल्या.

स्त्रीशिक्षणावरही लोकहितवादींनी भर दिला. स्त्रिया अज्ञात असल्यामुळे त्यांच्यावर पुरुषांचा इतका अन्याय होतो; स्त्रिया सुशिक्षित झाल्या तर त्यांच्या व्यक्तित्वाचा विकास होईलच, शिवाय त्यांचा पुरुषांच्या चारित्र्यावर व कर्तृत्वावर अनुकूल परिणाम होईल व संततीची वाढ व जोपासना चांगल्या प्रकारे होईल.

जातीच्या निर्बंधामुळे व वर्णश्रेष्ठत्वाच्या कल्पनेमुळे समाजात दुफळी होऊन तो दुबळा झाला हे लोकहितवादींनी सांगितले. विद्या ही ब्राह्मणांची मक्तेदारी झाली व ब्राह्मण या विद्येची वाढ तर करीत नाहीतच, परंतु केवळ पाठांतर करून त्यांनी विद्या अर्थशून्य करून टाकली. हे लोकहितवादींना अयोग्य वाटत होते. "जर मनुष्य अर्थ समजणार नाही आणि शब्दांचा ध्वनि मात्र करील, तर म्हैस रेकली तद्वत् मनुष्याने आक्रोश केला इतकेच. ब्राह्मण संस्कारही पाठ करतात. नमस्कार करावा, विष्णुस्मरण करावे, तांब्यात पाणी ओता, हे देखील शब्द मंत्रात मोडतात." ब्राह्मणांनीच विद्या करावी व इतरांनी करू नये हे त्यांना मान्य नव्हते. जन्मावरून माणसाचे श्रेष्ठत्व मानले जात असल्याने गुणांना स्थान राहिले नाही अशी त्यांची तक्रार होती.

## महात्मा ज्योतिबा फुले

महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाची स्थापना करून सामाजिक समतेचा विचार प्रसृत करण्याचे व ब्राह्मणेतरांच्या ठिकाणी आत्माभिमान जागृत करण्याचे कार्य म. फुले यांनी (१८२८–१८९०) केले. सामाजिक समता स्थापन होऊन स्त्रिया, अस्पृश्य व ब्राह्मणेतर यांची उन्नती व्हावी असा त्यांचा प्रयत्न होता. म. फुले यांनी या विषयावरील आपले विचार वेळोवेळी प्रकट केले असले तरी त्यांचे खरे महत्त्व या सुधारणांना हात घालण्यात आहे. १८४२ मध्ये त्यांनी पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. १८६३ मध्ये बालहत्याप्रतिबंधक गृह

काढले. १८६४ साली पुण्यात सारस्वत जातीतील पहिला पुनर्विवाह घडवून आणला. अस्पृश्यांसाठी शाळा काढली. त्यांना चांगले पाणी प्यायला मिळावे यासाठी हौद बांधला. समानतेच्या तत्त्वावर आधारलेल्या या सुधारणा आचरणात आणण्यास अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये महात्मा फुले यांनी सुरवात केली, हेच त्यांच्या कार्याचे थोरपण आहे.

**'सुधारक'कर्ते आगरकर**

विवेकवाद या शब्दाच्या सर्वार्थाने महाराष्ट्रात विवेकवादाचे युग निर्माण करण्याचे श्रेय गोपाळ गणेश आगरकर (१८५६–१८९५) यांच्याकडे जाते. लोकहितवादी, न्या. रानडे, म. फुले यांनी विशिष्ट प्रश्नांकडे विवेकशील दृष्टिकोणातून पाहिले असले तरी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण म्हणून त्यांनी विवेकवादाचा स्वीकार केलेला नव्हता. हे सगळेच ईश्वरी कर्तृत्वावर विश्वास ठेवणारे म्हणून कच्चे विवेकवादी होते. जीवनाच्या सगळ्या अंगांचा विचार विवेकबुद्धीच्या आधारे त्यांना करता आला नाही. काही बाबतीत ते अंधश्रद्धच राहिले. सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करताना रानडे हे जुन्या धर्मग्रंथांचा आधार घेत होते.

मानवी जीवनाकडे पाहण्याचा एक सम्यक दृष्टिकोण म्हणून विवेकवादाची शिकवण आगरकरांनी दिली. विवेकवादाचे तात्त्विक विवेचन करणारे स्वतंत्र लेख आगरकरांनी लिहिलेले नाहीत. वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांवर लिहीत असतानाच त्यांचा विवेकवादी दृष्टिकोण स्पष्ट झाला आहे. तो असा : जीवनातील विविध प्रश्नांचा विचार करीत असता, म्हणजे सत्य–असत्य व चांगले–वाईट यांचा निर्णय घेण्यासाठी माणसाने विवेकबुद्धीचाच निकष वापरणे आवश्यक. ग्रंथप्रामाण्य, रूढी यामुळे अनेक अनिष्ट आचार आपल्या समाजात रूढ झाले आहेत. त्यांची इष्टानिष्टता विवेकबुद्धीच्या साह्याने तपासून अनिष्ट रुढी नष्ट केल्या

४१३८१
१७२०
निवा
१२९७५

पाहिजेत व ज्यामुळे मानवी व्यक्तित्वाचा विकास होईल अशा नवीन चाली पाडल्या पाहिजेत.”

आगरकरांनी बुद्धिवादाचा पुरस्कार केला; पण त्यांच्या बुद्धिवादाचे स्वरूप उथळ नाही. माणसाचे बौद्धिक जीवन तेवढेच सत्य, बुद्धीने सर्व काही ज्ञात झालेले आहे, असे त्यांचे म्हणणे नाही. जीवनाच्या विविध अंगांचे सत्यत्व व विविध प्रेरणांचे अस्तित्व त्यांना मान्य आहे. मात्र माणसाची कृती आणि विचार यांची योग्यायोग्यता विवेकबुद्धीच्या साह्यानेच ठरविणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत असल्याने त्यांच्या या व्यापक विचार-सरणीला बुद्धिवाद या नावापेक्षा विवेकवाद या नावानेच सार्थपणे संबोधता येईल.

आगरकरांच्या विवेकवादी विचारसरणीत व्यक्तिविकास या मूल्याला त्यांनी महत्त्व दिले आहे. व्यक्तिविकासासाठी व्यक्तिस्वातंत्र्य आवश्यक आहे. म्हणून वेगवेगळया सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करताना व्यक्तिस्वातंत्र्याचीच कल्पना त्यांच्या डोळ्यासमोर होती. व्यक्तिस्वातंत्र्या-मुळे व्यक्तीच्या बौद्धिक, मानसिक मानवी गुणांचा विकास होईल व पर्यायाने समाजाची प्रगती होईल, असा त्यांना विश्वास वाटत होता. या त्यांच्या विचारामुळेच सामाजिक सुधारणा लोकांच्या बुद्धीला पटून व्हावयास हवी ही स्थिती त्यांना स्पृहणीय वाटत होती. कायद्याच्या जोरावर नवीन रूढी पाडल्या तर त्यामुळे समाजाचा लवचिकपणा नष्ट होईल व पुढच्या सुधारणा सहजतेने होणार नाहीत. बालविवाहाचा कायदा करून फार तर अपमृत्यूमुळे येणारी काही बालि-कांची वैधव्यदशा टळेल; परंतु एवढयाने खरी सुधारणा होणार नाही. विधवांनी पुनर्विवाह करावा, तारुण्यदशा प्राप्त झाल्यावर कुमारिकांचे प्रीतिविवाह व्हावेत याही सुधारणा आगरकरांना हव्या होत्या. यासाठी

लोकांमध्ये विवेकशील दृष्टिकोन निर्माण करणे व त्यांना आपण होऊन सुधारणेला प्रवृत्त करणे ही गोष्ट आगरकरांना हवी होती. सुधारणा चांगल्या असल्या तरी त्या सक्तीने कायद्याच्या बळावर करू नयेत. कारण त्यामुळे विशिष्ट सुधारणा झाल्या तरी व्यक्तीच्या बुद्धीचा, मनाचा विकास साधणार नाही.

**व्यक्तिस्वातंत्र्य**

आगरकरांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार योग्य त्या भूमिकेवरून केला. व्यक्तीला स्वातंत्र्य दिले तर समाजहिताचे काय होणार ? अशा प्रकारचा आक्षेप घेणारांसाठी व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना त्यांनी स्पष्ट केली. व्यक्ती आणि समाज यामध्ये विरोध कल्पिणे चूक आहे. समाज हा व्यक्तींचाच बनलेला असतो. व्यक्तीच्या हिताहून समाजाचे हित वेगळे असू शकत नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. समाजाचे कल्याण म्हणजे एका काल्पनिक समष्टीचे कल्याण नव्हे, तर तिच्या अवयवांचे कल्याण होय. आगरकरांची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना एकान्तिक स्वरूपाची मात्र नाही. व्यक्तिस्वातंत्र्य हवे ते व्यक्तीचा विकास होऊन एकंदर समाजाची प्रगती होण्यासाठी. यासाठी ते स्वातंत्र्य म्हणजे स्वेच्छाचार नव्हे. दोन माणसे एकत्र आली म्हणजे स्वेच्छाचाराला प्रतिबंध बसणारच असे ते सांगतात. मात्र व्यक्तिस्वातंत्र्य मिळून व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला तरच त्यांच्यात परस्पर सहकार्याची भावना आपोआप निर्माण होईल.

माणसामाणसात सहकारित्वाची भावना निर्माण होणे, आपल्या इच्छेप्रमाणे स्वार्थी आत्मकेंद्रित वर्तन न करणे, आपण वागताना इतरांचा विचार करणे यातच माणसाची प्रगती आहे, मनुष्यत्वाचा विकास आहे, हे आगरकरांनी ओळखले. ते लिहितात, " जो जो मनुष्यांची सुधारणा होत जाते तो तो त्यांच्या अन्योन्यव्यवहारातील बलात्काराचे तत्त्व लयास जाऊन त्याच्या जागी संमतितत्त्व प्रस्थापित होते व या कारणा-

स्तव येथून पुढे राजा व प्रजा, कुलाधिपति व कुलावयव, पती व पत्नी, मातापिता व अपत्ये, स्वामी आणि सेवक, गुरु आणि शिष्य, विक्रेता आणि ग्राहक यातील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्काराने न होता संमतिपूर्वक होत जाणार आहेत."

**ऐहिक दृष्टिकोन**

पारलौकिक ध्येयाकडे डोळे लावून ऐहिकाची अवहेलना करण्याची भारतीयांची दृष्टी आगरकरांना मूर्खपणाची वाटत होती. त्यामुळे त्यांनी वेडगळ आचारांवर टीका केली. पारलौकिक कल्पना कशा निर्माण झाल्या, देवतोत्पत्ती कशी झाली, या कल्पना कशा बदलत गेल्या हे दाखवून त्यांचे खोटेपण सिद्ध केले व लोकांचा दृष्टिकोण ऐहिक करण्याचा प्रयत्न केला. उच्च प्रतीचे ऐहिक जीवन जगण्यातच मनुष्यत्वाचा खराखुरा विकास आहे, हे त्यांनी प्रतिपादिले. 'मनुष्यतेचे ऐहिक सुखसंवर्धन' हाच त्यांच्या दृष्टीने 'धर्म' होता. व्यक्तिस्वातंत्र्याचा त्यांनी पुरस्कार केला तो व्यक्तीचे आणि पर्यायाने समाजाचे जीवन समृद्ध व्हावे यासाठी. ऐहिक या शब्दप्रयोगाने त्यांना सुखवाद वा भोगवाद सांगावयाचा नव्हता. ऐहिक आकांक्षा पूर्ण झाल्याने माणसाच्या ठिकाणी असणाऱ्या माणुसकीचा विकास होऊन तिचा आविष्कार होईल असाच त्यांचा विश्वास होता. ते म्हणतात, "स्वातंत्र्याचा उपभोग प्राप्त होत असलेल्या माणसाचे वर्तन ज्यांनी थोड्या काळजीने पाहिले असेल त्यांना दिसून आले असेल की, स्वातंत्र्याचा नित्य अनुभव घेणारा मनुष्य स्वहितपरायण असत नाही; इतकेच नाही तर, असा माणूस बराच परोपकारी, निदान परहितचिंतक तरी असतो. आपल्या श्रमाचे सारे फल आपणासच उपभोगावयास सापडावे, ही मनुष्याच्या अंतःकरणाची पूर्णावस्था नव्हे. त्या फलाची हवी तशी व्यवस्था लाव-

ण्याची मोकळीक आपणास असावी, ही त्याची आकांक्षा असते व ही जसजशी परिपूर्ण होत जाते तसतशी त्याची स्वार्थबुद्धी जाऊन तो पराकाष्ठेचा परहितैषी होत जातो. ”

आगरकरांना जी जीवनमूल्ये अभिप्रेत होती त्यामुळेच त्यांच्या ऐहिक निष्ठेतून भोगवाद न निघता व्यक्ती व समाज यांच्या सुखासंबंधी मौलिक विचार व्यक्त झाले आहेत.

आगरकरांनी सुधारणांचा पुरस्कार केला तो विवेकवादी पातळीवरून. वेदउपनिषदादी ग्रंथांचे प्रामाण्य मान्य करून सुधारणा सुचविणे त्यांना मान्य नव्हते. ते विवेकबुद्धीच्या कसोटीला लावून सुधारणांची स्वीकारार्हता ठरवीत. अन्य समाजात विशिष्ट सुधारणेचे काय परिणाम झाले याचे अवलोकन करून व निःपक्षपाती दृष्टीने तिच्या इष्टानिष्टतेची आपल्या समाजाच्या दृष्टीने चर्चा करून, समाजाने ती अमलात आणावी असेच त्यांचे मत होते.

## नंतरचे सुधारक व विचारवंत

पुढील काळात विवेकशीलतेवर आधारलेल्या सामाजिक सुधारणा करण्याचे काही प्रयत्न झाले. महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाचा प्रसार करण्याचे फार मोठे कार्य महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केले. त्यांनी स्त्रियांसाठी अनेक वसतिगृहे, शाळा व महाविद्यालये स्थापन केली. त्यांच्या कार्याची परिणती स्त्रियांसाठी स्वतंत्र विद्यापीठ निर्माण होण्यात झाली. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, त्यांचा सामाजिक दर्जा उंच व्हावा यासाठी भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळ स्थापून त्याद्वारा कार्य केले. त्यांच्याच प्रयत्नाने १९१७ साली कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात अस्पृश्यता निवारणासंबंधी ठराव आला व या प्रश्नाला राष्ट्रीय पातळीवर महत्त्व आले. पुढच्या कालात अस्पृश्य समाजात जागृती करण्याचे, त्यांच्यात आत्माभिमान व महत्त्वाकांक्षा

निर्माण करण्याचे, त्यांना माणुसकीच्या हक्काची जाणीव करून देऊन त्यांचा विकास करण्याचे ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य डॉ. भीमराव रावजी आंबेडकर यांनी केले.

१९२० नंतर महात्मा गांधींनी राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवण्यासाठी देशव्यापी आंदोलन सुरू केले. राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ हा विवेकशील वृत्तीचाच आविष्कार आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीने लोकांची मने भारून गेली व सामाजिक प्रश्नांवरील त्यांचे लक्ष कमी झाले. असे असले तरी, या कालखंडात प्रो. वा. म. जोशी, प्रो. श्री. म. माटे, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी जीवनातील अनेक प्रश्नांचा विवेकवादी दृष्टिकोणातून विचार करण्याचे, व विवेकशील वृत्ती वाढीस लावण्याचे कार्य केले.

### आजची स्थिती

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. आपली राजकीय आकांक्षा सफल झाली. आपले भविष्य घडविण्याचे स्वातंत्र्य आणि अनुकूलता आज लोकशाहीत आपल्याला प्राप्त झाली आहे. त्याचे फलित काय दिसते ? लोकांच्या वागण्यात विवेकशीलता दिसते काय ? ' नाही ' असेच उत्तर द्यावे लागेल.

आपल्या सामाजिक आचरणात विवेकशील दृष्टीचा अभाव दिसतो. अस्पृश्यतेचे कायद्याने उच्चाटन झाले परंतु ती लोकांच्या मनात मूळ धरून बसलेली आहे. क्वचित तिचे उग्र रूपही बघावयास मिळते. खेड्यात उच्चवर्णीय हिंदू व नवबौद्ध यांच्यात झगडे होताना दिसतात. सार्वजनिक कामात निष्ठा, तळमळ, निरिच्छपणा या ऐवजी संधीसाधू-पणा, स्वार्थ, लाचखोरी आढळते.

आजच्या काळात लोकांच्या राजकीय आचरणातही विवेकशीलतेचा अभाव विशेषत्वाने जाणवतो. प्रो. व. मं. सिरसीकर यांनी १९६२

मधील पुणे शहरातील निवडणुकीचा अभ्यास करून वरील निष्कर्ष काढला आहे. उमेदवारांची योग्यता, त्यांच्या राजकीय पक्षाचे तत्त्वज्ञान, पक्षाचा कार्यक्रम यांची पुरेशी माहिती घेऊन मत कोणाला द्यावयाचे याचा विचारपूर्वक निर्णय मतदार स्वतः घेत नाही. वरील अभ्यासात असे दिसून आले की, ३३ टक्के मतदारांना राजकीय प्रश्नांची मुळीच माहिती नव्हती; तर २५ टक्के मतदारांना विधानसभा व उमेदवार या दोहोंचीही माहिती नव्हती.

जातीय वृत्ती, अल्पसंख्यांकांना वाटणारी भीती व विभूतीपूजा यांचाही निवडणुकीवर फार मोठ्या प्रमाणात प्रभाव पडतो. मते कोणाला द्यावयाची याचा निर्णय कधी कधी ज्ञातिसंस्थांकडून घेतला जातो. अनेक मतदार कुटुंबप्रमुखांच्या आज्ञेनुसार मतदान करतात. हा व्यक्तिगत निर्णय आहे याची फारशी जाणीव मतदारांमध्ये दिसत नाही.

अशा तऱ्हेने आज जीवनाच्या सर्वच अंगात विवेकशील दृष्टिकोणाचा अभाव दिसतो. विवेकवादी दृष्टिकोणाचा जाणीवपूर्वक अवलंब जर आपण केला नाही, तर स्वतंत्र, लोकशाही राज्यात राहूनही आपला विकास करणे शक्य होणार नाही, व असा परिणाम होण्याचा संभव आहे की त्यामुळे आपली लोकशाही व स्वातंत्र्यही धोक्यात येईल.

# ११ उपसंहार

शंभर-दोनशे वर्षांपूर्वीचे मानवी जीवन आणि आजचे मानवी जीवन यात बराच फरक पडलेला आहे. मनुष्यजातीने निश्चितच विकासाच्या दृष्टीने पाऊल टाकलेले आहे. पूर्वीची जुलुमी राज्यसत्ता आणि पिळवणूक करणारी साम्राज्यशाही बहुतेक संपुष्टात आलेली आहे. आणि बहुतेक देश स्वातंत्र्याचा उपभोग घेताहेत. गरिबांचे निर्दयपणे आर्थिक शोषण करणारा वर्ग सापेक्षतः दुर्बल झालेला आहे. बऱ्याच अंधश्रद्धा, धार्मिक रूढी कमी होऊन मनुष्य त्यापासून मुक्त झालेला आहे. सामाजिक थरांमधील अंतर कमी कमी होऊन समतेकडे वाटचाल सुरू झालेली आहे. उद्योगधंद्यांचा विकास होऊन अधिकाधिक समृद्धता येत आहे. मानवी जीवनाची ही प्रगती निश्चित आशादायक आहे; परंतु समाधानकारक आहे काय ? आपले जीवन सुस्थिर आहे; आपल्या प्रगतीची दिशा सापडली, असे माणसाला वाटते काय ? ज्ञानाच्या कक्षा रुंदावूनही, ऐहिक दृष्ट्या अधिक समृद्ध होऊनही एक प्रकारची अस्थिरता, अशांतताच आजच्या मानवाला वाटते.

मानवी जीवनाची समाधानकारक प्रगती झाली नाही याचे कारण व माणसाच्या अस्वस्थतेचे मूळ एका गोष्टीत आहे. ती म्हणजे मनुष्य पुरेसा विवेकनिष्ठ नाही. तो आजही स्वतःच्या विवेकबुद्धीचा उपयोग न करता एखाद्या बाह्य सत्तेवर विसंबतो.

## अपुरेपणाची जाणीव व दुबळेपणा

मानवी जीवनात विकारांचे प्राबल्य आहे. आपल्या गरजांची, वासनांची तृप्ती करण्यासाठी मनुष्य सतत धडपडत असतो. त्याचबरोबर मानवी मनाबाबतचे दुसरेही एक सत्य ध्यानात घेणे आवश्यक आहे. केवळ गरजा आणि वासना यांची पूर्ती झाल्याने मानवी मनाचे समाधान होत नाही. खायला, प्यायला, राहायला आणि उपभोगायाला मिळाले तरी मनुष्य असमाधानी असतो. आपल्या जीवनाला पूर्णता आली असे त्याला वाटत नाही. प्रत्येक जण आपल्या जीवनाचा आदर्श ठरवीत असतो. कुणी सत्ता-संपादनाच्या तर कुणी संपत्ती मिळविण्याच्या पाठीमागे लागतो. कुणी आध्यात्मिक क्षेत्रातील बुवाच्या भजनी लागतो; तर कुणी देवाची भक्ती करतो. कुणी समाजसेवेत मग्न होतो, तर कुणी राजकारणी नेत्याचा अनुयायी बनतो.

माणसाला आपल्या जीवनातील अपूर्णतेची जशी जाणीव होते तशीच स्वतःच्या दुबळेपणाचीही होते. दुर्बलता ही मानवी जीवनातील वस्तुस्थिती आहे. शारीरिकदृष्ट्या मर्यादित सामर्थ्य, निसर्गाची प्रबलता ( निदान मृत्यूचे भय ), आणि बाह्य परिस्थितीचे दडपण यामुळे माणसाला स्वतःच्या दुबळेपणाचा प्रत्यय सतत येत राहतो.

अपुरेपणाची जाणीव असल्यामुळे मनुष्य स्वतःपुरता आदर्श ठरवितो; त्या आदर्शाच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतो. तो आदर्श साध्य करण्यात खरेखुरे समाधान आहे, अशी त्याची धारणा बनते. त्याचप्रमाणे स्वतःच्या दुबळेपणामुळे दुसऱ्या कोणत्या तरी सत्तेला शरण जाण्याची वृत्ती त्याच्या ठिकाणी निर्माण होते. ही शरणागती पत्करल्यानंतर त्याची भीती कमी होते. त्याला कुठे तरी आधार सापडतो. माणसाच्या या वैशिष्ट्यामुळे तो पारलौकिक कल्याणाची हमी देणारी धर्मकल्पना वा गुरु यांना शरण जातो. व्यावहारिक प्रतिष्ठा देणाऱ्या

अधिकार, यश वा संपत्ती या गोष्टींचा दास बनतो. अथवा सुरक्षिततेचे व समृद्धीचे आश्वासन देणाऱ्या हुकूमशाही नेत्याला शरण जातो.

## हे आदर्श विवेकनिष्ठ नव्हेत

मानवी जीवनाची समाधानकारक प्रगती झाली नाही याचे कारण मानवी जीवनाचे हे आदर्श विवेकनिष्ठ नाहीत. मनुष्य स्वतःच्या मानवी गुणांचा, सामर्थ्याचा विकास करून हे आदर्श ठरवीत नाही. तो स्वतःच्या विवेकबुद्धीचा आवाज न ऐकता एखाद्या बाह्य सत्तेला शरण जातो.

माणसाच्या ठिकाणी सत्य समजून घेण्याचे, चांगुलपणाचा आविष्कार करण्याचे सामर्थ्य आहे. मात्र त्यासाठी त्याच्या व्यक्तित्वाचा विकास होणे आवश्यक आहे. कोणत्याही बाह्य सत्तेची भीती असता कामा नये. मनुष्य जर दुबळा आणि भित्रा राहिला तर त्याची विवेकबुद्धी स्वतंत्रपणे काम करणे अशक्य. तो सत्तेला शरण जातो याचा अर्थ स्वसामर्थ्य गमावतो. त्याच्या मानवी गुणांचा विकास होत नाही. सत्ता सांगेल ते प्रमाण मानल्यामुळे त्याला स्वतः नैतिक निर्णय घेण्याचे सामर्थ्य राहात नाही.

बाह्य सत्तेला शरण जाऊन स्वीकारलेले हे आदर्श माणसाच्या संकुचित, आत्मकेंद्रित वृत्तीतून स्फुरलेले असतात. सत्ता, संपत्ती, यश यांच्या पाठीमागे लागणाऱ्या माणसाचा आदर्श त्याच्या आत्मकेंद्रित वृत्तीतूनच निर्माण झालेला असतो. कधी कधी हे व्यापक, राष्ट्रीय पातळीवर घडते. एखाद्या राष्ट्रातील लोक आपल्या आत्मकेंद्रित वृत्तीचे उदात्तीकरण करतात आणि त्यातून आक्रमक राष्ट्रवाद, वंशश्रेष्ठत्व, धर्मप्रसार हे आदर्श निर्माण होतात.

धर्मनिष्ठ, आध्यात्मिक वृत्तीच्या लोकांचे आदर्श हे मुळी जीवनबाह्य गोष्टींतून स्फुरलेले असतात. परमेश्वर भक्ती, साक्षात्कार, मोक्ष यामुळे आपल्याला हवे असलेले पूर्ण समाधान मिळेल ही त्यांची श्रद्धा असते. म्हणून ते एखाद्या धार्मिक कल्पनेला वा आध्यात्मिक गुरूला शरण जातात.

## दुसरी विधायक बाजू

माणसाच्या अपुरेपणाच्या आणि दुबळेपणाच्या जाणिवेतून वर दाखविल्याप्रमाणे अविवेकी वर्तन घडत असते. असे असले तरी माणसाच्या अपुरेपणाला व दुबळेपणाला दुसरी एक विधायक बाजू आहे. ती विचारात घेणे आवश्यक आहे.

मानवी जीवनातील अपूर्णता ही वस्तुस्थिती आहे आणि ती मानवी गुणांचा, मानवी सामर्थ्याचा विकास करूनच भरून काढणे शक्य. यासाठी माणसाला अपुरेपणाची जाणीव झाली तरी तीमधून दुबळेपणाची भावना निर्माण न होता सहकारित्वाची वृत्ती निर्माण होणे आवश्यक आहे. सगळ्यांच्या मानवी गुणांचा, सामर्थ्यांचा विकास करूनच या दुबळेपणाच्या, अपुरेपणाच्या वैगुण्यावर मात करणे शक्य आहे, प्रेममय सहजीवन कंठणे शक्य आहे. माणसाच्या जीवनाचा आदर्श बाह्य सत्ताधिष्ठित असून चालणार नाही; तर त्याच्या विकास पावलेल्या व्यक्तित्वातून निघणं आवश्यक आहे. हे घडावयाचे असेल तर व्यक्तीला स्वतःच्या सामर्थ्याचा, गुणांचा विकास करण्याचे स्वातंत्र्य आणि संधी मिळावयास हवी. लोकशाही राज्यपद्धतीत आणि समाजरचनेतच हे शक्य आहे.

## लोकशाहीचा आधार

माणसाच्या ठिकाणी असणारी विवेकशीलता हा लोकशाहीचा आधार आहे. कारण प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी सुप्त मानवी सामर्थ्य आहे. स्वातंत्र्य आणि संधी मिळाल्यावर या सामर्थ्याचा विकास होऊ शकतो. चांगले–वाईट निवडण्याची विवेकबुद्धी ही प्रत्येकाच्या ठायी आहे, या विश्वासावर लोकशाही अधिष्ठित आहे. माणसे अधिकाधिक विवेकाने वागतील तर लोकशाही अधिक सुस्थिर, मानवी विकासाला अधिकाधिक अनुकूल होईल.

लोकशाहीची यशस्विता जशी विवेकशीलतेवर अवलंबून आहे तशीच माणसाच्या विवेकशीलतेची वाढ लोकशाहीवर अवलंबून आहे. माणसाच्या

विकासाला आवश्यक असणारे स्वातंत्र्य आणि अनुकूलता केवळ लोकशाही राज्यपद्धतीत आणि समाजरचनेतच लाभू शकते.

**जागतिक शांतता**

आज मानवजातीपुढे असणारी महत्त्वाची समस्या ही आहे की, मानवी अस्तित्वच संकटात आणणाऱ्या युद्धापासून जगाला वाचवून जागतिक शांतता कशी निर्माण करावयाची ? माणसाची विवेकशीलताच ही समस्या सोडवू शकेल.

मानवी जीवनातील संघर्ष मिटविण्याचा मार्ग बळाचा वापर करणे हा नव्हे. बळाचा वापर केल्याने थोड्या काळापुरता प्रश्न मिटेलही; परंतु त्यातच भावी संघर्षांची बीजे असतात. म्हणून संघर्ष जर कायमचा मिटवावयाचा असेल तर परस्परांना समजून घेण्याची दृष्टी, सहकार्याची वृत्ती व सगळ्यांचेच हित पाहण्याचे उद्दिष्ट असणे आवश्यक असते. पाणवठ्यावर होणारे भांडण असो, सीमाप्रश्नावरून घडणारा वाद असो, शेजारच्या राष्ट्राशी होणारे युद्ध असो अथवा जागतिक युद्धाचा प्रश्न असो—या सर्व संघर्षांचा विचार विवेकशील दृष्टिकोणाने केला तरच ते मिटण्याची शक्यता असते.

व्यक्तीने विवेकवादी दृष्टिकोण अवलंबिणे जसे आवश्यक आहे तसेच आंतरराष्ट्रीय व्यवहारात राष्ट्रांनी विवेकवादी दृष्टिकोण स्वीकारणे आवश्यक आहे आणि राष्ट्र विवेकशील बनावयाचे असेल तर अखेर त्या राष्ट्रातील लोक विवेकशील बनणे आवश्यक असते.

गेल्या शंभरएक वर्षांत शास्त्रज्ञानाचा विकास झाला आणि नवनवीन शोध लागले. या शोधांचा एक चांगला परिणाम असा की, उद्योगधंद्यांची वाढ होऊन अधिक समृद्धता निर्माण झाली, तर दुसरा भयावह परिणाम असा की, अण्वस्त्रासारख्या संहारक अस्त्रांचा शोध लागून मानवजात धोक्यात आली.

गेल्या दोन महायुद्धात कित्येक लाख लोकांची प्राणहानी झाली, मालमत्तेचे नुकसान झाले, विकासाला प्रतिबंध झाला. ही महायुद्धे झाली याला जसे हिटलर, मुसोलिनीसारखे हुकूमशहा जबाबदार आहेत त्याच-प्रमाणे जर्मनी, इटली, जपान येथील लोकही जबाबदार आहेत. त्यांनी हुकूमशहांची शरणागती पत्करली. आपल्या विवेकबुद्धीचा वापर केला नाही. संकुचित राष्ट्रवादी दृष्टिकोन स्वीकारला.

आज जग साम्यवादी आणि लोकशाही राष्ट्रांच्या दोन गटांमध्ये विभागलेले दिसते. दोन्ही गट आपापले अण्वस्त्रसामर्थ्य वाढविण्याच्या पाठीमागे लागलेले आहेत. पूर्वीच्या काळी शांततेसाठी सत्तेचा समतोल राखण्याचे तत्त्व मान्य झाले होते व त्याचा अवलंब केला जात असे. आज त्या मार्गाचा अवलंब करून भागण्यासारखे नाही, आजच्या अस्त्रांची संहारकता इतकी प्रचंड आहे की, युद्ध झाले तर मानवजातीचा नाश ओढवल्यावाचून राहणार नाही.

आजच्या काळात जागतिक शांतता हवी असेल तर आंतरराष्ट्रीय संबंधात नैतिकता आणणे, हे संबंध परस्पर समजुतीवर व सहकारित्वाच्या भावनेवर आधारणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय संबंधात जर ही विवेक-शीलता आली तरच जग युद्धाच्या भीतीपासून मुक्त होईल व जगात शांतता नांदू शकेल, आणि उद्याचा मानव अधिक प्रगत, अधिक समृद्ध व अधिक सुखी दिसेल.

o o o

# या विषयावरील काही अभ्यसनीय ग्रंथ व लेख


(1) The Ego and the Id—Dr. S. Freud
(2) Man for Himself—Dr. Erich Fromm
(3) Humanism and Moral Theory—R. Osborne
(4) Background to Modern Thought—C. D. Hardie
(5) The Moral Judgement of the Child—J. Piaget
(6) The Scientific Outlook—Bertrand Russell
(7) Human Society in Ethics and Politics-Bertrand Russel
(8) Belief and Action—Viscount Samuel
(9) Muslim Institutions—M. Gaudfroy-Demombynes
(10) Men, Morals and Society—J. C. Flugel
(११) विज्ञानप्रणीत समाजरचना—डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
(१२) विज्ञानबोधाची प्रस्तावना— श्री. म. माटे
(१३) आधुनिक भारत—शं. द. जावडेकर
(१४) शतपत्रे ( लोकहितवादी )—संपा. डॉ. ना. र. इनामदार
(१५) आगरकर-लेखसंग्रह—संपा. ग. प्र. प्रधान
(१६) ज्ञानोपासना आणि भारतीयांची कर्तव्ये—श्री. ना. बनहट्टी
(१७) महाराष्ट्र- जीवन—संपा. गं. बा. सरदार
(१८) नीतिशास्त्रप्रवेश—वा. म. जोशी
(१९) धर्मशास्त्रप्रवेश—म. म. पां. वा. काणे
(२०) शास्त्रीय विचारपद्धती—अ. भि. शहा
(२१) व्यक्तिमत्त्वाचा विकास—ग. वि. अकोलकर
(२२) विज्ञानाचा समाजधारणेवरील परिणाम,—बर्ट्रांड रसेल, अनु० कमलाकर दीक्षित, समाज प्रबोधन संस्था, पुणे.


## लेख


(१) विवेकवादाचा महाराष्ट्रातील आद्य प्रणेता,—म. गं. नातू, नवभारत, ऑगस्ट १९५६

( २ ) विज्ञानाची विनम्र साधना—दि. के. बेडेकर,–समाज प्रबोधन पत्रिका, सप्टेंबर–डिसेंबर, १९६४.

(२ A) जळगाव येथील चर्चासत्राचा वृत्तांत–समाज प्रबोधन पत्रिका, सप्टें.– डिसेंबर, १९६४

( ३ ) बुद्धिप्रामाण्याची अपरिहार्यता–बा. वि. पोतदार,–नवभारत, मे १९५८

( ४ ) बुद्धिप्रामाण्य आणि जीवननिष्ठा (चर्चा)— श्रीनिवास दीक्षित– सदाशिव आठवले, नवभारत,–सप्टेंबर, १९५५

( ५ ) बुवाबाजीचा भस्मासूर कायमचा कसा गाडला जाईल ?—दि. के. बेडेकर,–किर्लोस्कर, एप्रिल, १९६५

( ६ ) Some Reflections on the Indian Philosophical Tradition, M. P. Rege. Quest, No. 44, (Jan.– March 1965).

दा. क्र.

REFBK-0015117

# गो. मा. पवार

# विवेकनिष्ठ जीवनदृष्टी

विवेकनिष्ठा म्हणजे काय हे सांगणे सोपे नाही. कारण खरी विवेकनिष्ठ ही मानवी तर्कबुद्धीबरोबरच श्रद्धेला, कल्पनाशक्तीलाही सामावणारी असते: ही संग्राहक भूमिका घेऊन विवेकनिष्ठेचा अर्थ व आशय समजावून देण्याचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकात केलेला आहे. तो प्रयत्न यशस्वी झालेला आहे. कारण लेखकाने आपले विवेचन मानसशास्त्रीय ज्ञानाच्या आधाराने व निराग्रही पद्धतीने केलेले आहे. अगदी बाल्यावस्थेतून हळू हळू मुलाच्या मनात विवेकाची जाणीव उत्पन्न होते. साध्या खेळासारख्या सामूहिक आचारातून तिला आकार व दृढता येत जाते. वास्तवाचे ज्ञान आणि आचरण यांचा मेळ घालण्यची प्रवृत्ती मुलामध्ये येते व सदाचरणाचा अर्थ व मूल्ये त्याला समजू लागतात. हे सारे लेखकाने सोप्या भाषेत वर्णन केले आहे.

माणसाची स्वातंत्र्याची इच्छा, समतेची जाणीव व भ्रातृभावाची भावना विवेकाच्या जाणिवेशी कशी संबद्ध आहे? विवेकाला विघातक अशा कोणत्या प्रेरणा व वासना मानवी मनात आहेत? विवेक आणि श्रद्धा यांचे नाते काय? विवेकाचा आणि प्रचलित धर्मपंथांचा व एकंदर पारलौकिकाच्या विचारांचा संबंध कसा येतो? या प्रश्नाची थोडक्यात पण सुबोध चर्चा लेखकाने केलेली आहे.

या पुस्तकाचे लेखक श्री. गो. मा. पवार हे औरंगाबाद येथील सरकारी आर्टस् व सायन्स महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक आहेत.

समाज प्रबोधन संस्था

दोन रुपये